
अतळ
सत्यजित शंकरराव पाटील

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

अतळ

(कादंबरी)

सत्यजित शंकरराव पाटील

अतळ (कादंबरी)

लेखक : सत्यजित शंकरराव पाटील

पत्ता : २५अ, प्रभू कॉलोनी, अमरावती.

फोन : ७५८८८९१९९९

ईमेल : satyajeetwrite@gmail.com

मुखपृष्ठ : AI Generated

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक : - ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)
प्रकाशन : २६ सप्टेंबर २०२६

छापिल प्रत खासगी वितरणासाठी उपलब्ध
देणगी मूल्य- रु. ४७०/- फक्त
(१००% रक्कम लेखकाकडे छपाईचा खर्च म्हणून जाईल.)
(संपर्क- सत्यजित पाटील - ७५८८८९१९९९)

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

अस्वीकरण

ही कादंबरी संपूर्णतः काल्पनिक आहे. यातील सर्व पात्रे, स्थळे, गाव, संस्था, समुदाय, जमाती, चालीरिती, विधी, लोकश्रद्धा आणि घटना लेखकाच्या कल्पनेतून साकारलेल्या आहेत. यांचा कोणत्याही वास्तविक व्यक्तीशी (जिवंत वा मृत), प्रत्यक्ष स्थळ, गाव, जात, धर्म, समाज, जमात, देवस्थान वा घटनेशी काहीही संबंध नाही. कुठे तसा भास झाल्यास तो निव्वळ योगायोग समजावा.

“निवाळी” हे गाव, तेथील देऊळ, देवता, परंपरा व त्यातील सर्व विधी आणि अलौकिक घटक पूर्णतः काल्पनिक असून, कोणत्याही वास्तविक समाजाच्या वा जमातीच्या श्रद्धा, परंपरा वा आचारांचे चित्रण करण्याचा लेखकाचा हेतू नाही. ही एक भयकथा असून तिचा उद्देश निखळ साहित्यिक कल्पनाविष्कार एवढाच आहे.

लेखक परिचय

सत्यजित शंकरराव पाटील हे मूळचे अमरावतीचे. वाणिज्य आणि औषधनिर्माणशास्त्र असं त्यांचं शिक्षण... आकडे आणि रसायनं यांच्यामधून वाट काढत आलेली नजर.

लहानपणापासूनच वाचनाचं आणि सिनेमाचं वेड. आणि वाचता वाचता कधीतरी मनात ऊर्मी दाटून यायची, आपणही असं काहीतरी लिहावं. याच ऊर्मीतून त्यांच्या लेखनाचा प्रवास सुरू झाला. विज्ञानकथा, भय, वैश्विक भय (कॉस्मिक हॉरर) आणि गूढकथा या प्रकारांत ते रमतात. जिथं तर्क संपतो आणि अंधार सुरू होतो, नेमकी तीच सीमारेषा त्यांना खुणावते. माणसाच्या मनातली आदिम भीती आणि आपल्या आवाक्याबाहेरचं अनामिक काहीतरी, यांचा मेळ घालत ते कथा रचतात.

यापूर्वीही त्यांनी लेखन केलं असलं, तरी एखाद्या प्रकाशनाच्या छत्राखाली प्रकाशित होणारी *'अतळ'* ही त्यांची पहिलीच कलाकृती. आणि हा तर केवळ आरंभ आहे.

- ७५८८८९१९९९
- satyajeetwrite@gmail.com

अर्पणपत्रिका

“हे पुस्तक ज्या प्रत्येक लेखकाच्या शब्दांनी माझ्यातला लेखक घडवला,
आणि ज्या आई-बाबांनी अंधारातही माझ्या स्वप्नांवर विश्वास ठेवला...
त्यांना. सप्रेम समर्पित.”

मनोगत

या कथेची ठिणगी एका साध्या कल्पनेतून पडली.

एका पुरातन मंदिरात फिरत असताना कुणीतरी सांगितलं, की त्याच्या खाली पाण्याची एक जुनी बारव वजा विहीर आहे. मी सहज विचारलं, विहीर कशासाठी? तर उत्तर मिळालं, माहीत नाही. त्या "माहीत नाही"नंच माझ्या मनाची पकड घेतली. आणि एक विचार तरळून गेला... समजा, हे मंदिर मुळात देवासाठी बांधलंच नसेल तर? समजा, त्या विहिरीतल्या पाण्याखाली दडलेल्या एखाद्या राक्षसाला बांधून ठेवण्यासाठीच ते घडवलं असेल तर?

तिथून 'अतळ' जन्माला आली. मग पॉलिश करत करत, अनेक फेरवाचनांतून ती आजच्या रूपाला पोहोचली. परंपरा, श्रद्धा आणि विज्ञान, आणि माणसाच्या मनात खोलवर रुतलेलं आदिम भय, हे सगळे धागे या कथेत गुंफण्याचा प्रयत्न मी केला. भय ही माझ्यासाठी नुसती दचकवणारी गोष्ट नाही... आपल्या आवाक्याबाहेर जे अनामिक काहीतरी आहे, त्याच्यासमोर आपण किती लहान आहोत, याची जाणीव करून देणारी ती एक खिडकी आहे.

हे लेखन तुमच्यापर्यंत विनामूल्य पोहोचवण्यासाठी व्यासपीठ दिल्याबद्दल ई साहित्य प्रतिष्ठानचा मी मनापासून आभारी आहे. सोबतच माझ्या घरच्यांचे, ज्यांनी मला सतत प्रोत्साहन दिलं, आणि माझ्या प्रत्येक वाचकाचे... ज्यांच्यासाठी हा सगळा खटाटोप आहे.

ही कथा वाचून तुम्हाला काय वाटलं, ते जरूर कळवा. तुमची प्रतिक्रिया, मग ती कौतुकाची असो वा टीकेची, हीच माझ्या पुढच्या लेखनाची खरी ऊर्जा.

...आता, दिवा मंद करा. आणि त्या अथांग तळाशी डोकावून बघा.

- सत्यजित शंकरराव पाटील

अनुक्रमणिका

प्रकरण एक : परत - १०

प्रकरण दोन : खोदकाम - ३५

प्रकरण तीन : शिळा - ५९

प्रकरण चार : स्पष्टीकरण - ८४

प्रकरण पाच : ओवी - १०६

प्रकरण सहा : आरसा - १२४

मध्यांतर · त्र्यंबक - १४८

प्रकरण सात : कोंडण - १६२

प्रकरण आठ : विष - १८३

प्रकरण नऊ : बळी - २०१

प्रकरण दहा : राखण - २१९

प्रकरण एक : परत

आई राखिते तळीं । जळ निवळो नेदी कदा ।

घाट संपल्याची खूण मागे पडली, आणि निवाळी तिथून अकरा किलोमीटर उरलं होतं.

निलयच्या नजरेनं तो आकडा बोर्डावर टिपला. अकरा किलोमीटरचं अंतर म्हणजे, या खडबडीत रस्त्यावर आणि गाडीच्या सध्याच्या वेगाचा हिशोब केला, तर साधारण पंचवीस मिनिटांचा प्रवास. रस्ता जास्तच खराब निघाला, तर पस्तीस मिनिटं लागू शकतील. आणि रस्ता खराबच असणार याची त्याला खात्री होती, कारण सार्वजनिक बांधकाम विभागाच्या फायलींमध्ये हा भाग गेली सात वर्षं फक्त "प्रस्तावित" यादीत धूळ खात पडून होता. ती फाईल त्यानं स्वतःच्या डोळ्यांनी तपासली होती. सात पावसाळे उलटून गेले होते, आणि प्रत्येक पावसाळ्यात इथला डोंगरउतार थोडा थोडा करत खाली वाहून गेला होता. या सगळ्या गोष्टी त्याला अचूक मोजता येत होत्या, आणि ज्या गोष्टी गणितात बसतात, त्या त्याला नेहमीच एक प्रकारचा दिलासा द्यायच्या. माणसांवर विसंबून राहता येत नसे, ती खोटं बोलू शकायची. पण आकडे कधीच खोटं बोलत नव्हते.

गाडी अचानक एका खोल खड्ड्यात आदळली आणि ड्रायव्हरनं नकळत जीभ चावली.

"सांभाळून, गणपत."

"होय साहेब. रस्ता नाय ना धड."

"नसणारच."

खिडकीच्या काचेबाहेर सातपुड्याच्या पर्वतरांगा झपाट्यानं मागं सरकत होत्या. संध्याकाळची सावली गडद होत चालली होती आणि जंगलाचा हिरवा रंग आता हळूहळू काळोखात विरघळत होता. दूर कुठल्यातरी झाडीत एक पक्षी कर्कश आवाजात ओरडला, आणि तितक्याच अचानक शांत झाला. पण त्यानंतर पसरलेली ती शांतता नेहमीपेक्षा जरा जास्तच ताणलेली वाटली. निलयनं खिशातून फोन बाहेर काढला. सिग्नल नव्हता. त्यानं फोन खिडकीच्या काचेला टेकवून जरा उंच धरून पाहिला. नेटवर्कची एक कांडी चमकली आणि लगेच नाहीशी झाली. त्यानं तो फोन पुन्हा मांडीवर ठेवला आणि काही सेकंदांतच सवयीनं परत हातात घेतला. नागपुरात असताना त्याला असली काही सवय लागली नव्हती, तिथं नेहमीच पूर्ण रेंज असायची. पण या मातीत पाऊल ठेवताच त्याच्या हातांना आणि मनाला ती जुनी अस्वस्थता पुन्हा चिकटली होती, जणू काही मधल्या तेरा वर्षांचा काळ मध्ये कधी गेलाच नव्हता.

तेरा वर्षं. हा एकच आकडा असा होता जो त्याच्या गणितात बसत नव्हता. अकरा किलोमीटरच्या अंतराचे तुकडे मोजता येत होते, पस्तीस मिनिटांच्या वेळाचा हिशोब लावता येत होता, पण

या तेरा वर्षांच्या काळाला कोणत्याही समीकरणात बसवता येत नव्हतं. तो आकडा एखाद्या जड दगडासारखा थेट त्याच्या पोटात जाऊन बसायचा, आणि अशा भावना गुंतवून ठेवणाऱ्या गोष्टी निलयला आवडत नसत. त्यानं गाडीच्या खिडकीची काच थोडी खाली सरकवली. बाहेरची थंड हवा झपकन आत शिरली, आणि त्या हवेसोबत जंगलाचा तो जुनाट वासही आत आला. तो वास त्याच्या ओळखीचा होता, आणि ती ओळख पटणं हीच त्याच्यासाठी सर्वांत नकोशी गोष्ट होती.

वयाच्या अठराव्या वर्षी तो इथून बाहेर पडला होता. पुढच्या शिक्षणासाठी आधी अमरावतीला गेला, आणि मग तिथून नागपूरला. असं बाहेर पडणं अगदी नैसर्गिक होतं, गावातली बरीच मुलं शिक्षणासाठी बाहेर जायचीच, यात वेगळं असं काहीच नव्हतं. पण वेगळी गोष्ट ही होती की, एकदा बाहेर पडल्यावर तो पुन्हा कधीच इथं परत फिरकला नाही. उन्हाळ्याच्या सुट्टीत नाही, की दिवाळीच्या सणालाही नाही. सुरुवातीला वडिलांचे फोन यायचे, मग ते हळूहळू कमी होत गेले, आणि शेवटी तर ते जवळजवळ थांबलेच. निलयनं स्वतःच्या मनाची समजूत घातली होती की तो आता कामात खूप व्यग्र आहे, गावी जाण्यासाठी अंतर खूप आहे, आणि रस्ताही खराब आहे. पुन्हा तेच आकडे आणि तीच कारणं. वरवर पाहता ही सगळी कारणं खरी होती. पण या सगळ्या व्यावहारिक कारणांच्या अगदी तळाशी अशी एक गोष्ट दडलेली होती, जी त्यानं स्वतःलाही कधी स्पष्ट शब्दांत

सांगितली नव्हती. आणि ती गोष्ट म्हणजे, या गावात असं काहीतरी होतं ज्यापासून त्याला कायमचं दूर पळायचं होतं. ते देऊळ नव्हतं. वडीलही नव्हते. त्याहूनही फार जुनं असं काहीतरी होतं. अगदी त्याच्या लहानपणाशी जोडलेलं.

नेहमीच्या सवयीप्रमाणे त्यानं ती नकोशी आठवण मनाच्या एका कोपऱ्यात ढकलून दिली, आणि पुन्हा एकदा खिडकीबाहेर पाहू लागला.

गावाचं पहिलं घर दृष्टीस पडेपर्यंत बाहेर चांगलाच अंधार दाटून आला होता. मग दुसरं घर दिसलं, पाठोपाठ तिसरं. घरांमधले पिवळे दिवे ठिपक्यांसारखे चमकू लागले. आणि मग पुढच्याच वळणावर अख्खं गाव अचानक त्याच्या डोळ्यांसमोर उभं राहिलं, आणि ते दृश्य बघून निलयच्या तोंडातून क्षणभर एकही शब्द फुटला नाही.

त्याच्या जुन्या आठवणींमधलं निवाळी गाव खूपच लहान आणि टुमदार होतं. मातीची घरं, त्यांच्यावरची कौलं, वर उठून दिसणारा देवळाचा कळस आणि आजूबाजूला पसरलेलं घनदाट जंगल. पण आता समोर असलेलं गाव तसं मुळीच उरलं नव्हतं. रस्त्याच्या दुतर्फा आता सिमेंट काँक्रीटची नवी बांधकामं उभी होती, त्यातली काही अर्धी रंगवलेली होती, तर काही उघड्या विटांचीच होती. रस्त्याकडेला एका बोर्डावर "निवाळी ग्रामपंचायत आपले स्वागत करते" असं लिहिलं होतं, आणि

त्याच्याच खाली इंग्रजीतही तेच वाक्य होतं. त्या बोर्डावर कुठल्याशा स्थानिक आमदाराचा हसरा फोटो होता, जो उन्हापावसात भिजून फिकट पडला होता. तिथंच एक नवा लॉज आकाराला येत होता, ज्याचं बांधकाम अद्याप अर्धवट होतं. पिलरचे लोखंडी गज उघडेच होते आणि वरच्या बाजूला निळी ताडपत्री टाकलेली होती. बाहेर पाटी होती: "निवजाई भक्तनिवास, बुकिंग सुरू, संपर्क." आणि खाली एक मोबाईल नंबर लिहिला होता, ज्यावर बहुधा कधीच रेंज लागत नसणार हे उघड होतं. डोंगराच्या काळ्या पार्श्वभूमीवर एक उंच मोबाईल टॉवर उभा होता, ज्याच्या शेंड्यावरचा लाल दिवा मंदपणे लुकलुकत होता. तो चमकणारा लाल दिवा या सगळ्या जुनाट वातावरणात विचित्र वाटत होता, कारण त्या पूर्ण दृश्यात फक्त तो एकटाच दिवा हालचाल करत होता, बाकी सगळं कसं मृतवत आणि स्थिर होतं.

आणि या सगळ्या नवीन विकासाच्या पाठीमागे, उंचावर, तेच जुनं देऊळ उभं होतं. दगडी. काळ्याकुट्ट पाषाणाचं. तस्संच.

"बदललं की नाही गाव, साहेब," गणपत जरा अभिमानानंच म्हणाला. तो स्वतः अमरावतीचा होता, पण या रस्त्यावरून त्यानं याआधीही अनेकदा गाड्या आणल्या असाव्यात, त्यामुळे त्याला हे गाव स्वतःच्या ओळखीचं आणि आपलंसं वाटत होतं. "यात्रा

येतीय ना आठ-धा दिसांत. लाखभर लोक येतात म्हणे. आता बघा कशी रोषणाई होते."

निलयनं त्याला दुजोरा देत हलकेच मान हलवली. यात्रेला अजून आठ-दहा दिवसांचा कालावधी होता. त्याला याची अचूक कल्पना होती, कारण त्यानंच स्वतः या प्रोजेक्टचं वेळापत्रक यात्रेच्या तारखा डोळ्यांसमोर ठेवूनच आखलं होतं. यात्रेआधी मिळणारा हा एक मोकळा आठवडाच खरं काम पूर्ण करण्याची योग्य वेळ होती. भाविकांची गर्दी सुरू होण्यापूर्वीच सगळ्या बांधकामांची मापं घ्यायची, देवळाचा पाया तपासायचा आणि सुरुवातीचं प्राथमिक खोदकाम उरकून घ्यायचं, असा त्याचा प्लॅन होता. एकदा का लाखभर भाविकांचा लोंढा गावात धडकला, की मग देवळाच्या अगदी तोंडावर कुदळ चालवणं केवळ अशक्यच नव्हतं, तर ते खूप धोक्याचंही होतं. म्हणूनच हातातला हा एक आठवडा त्याच्यासाठी महत्त्वाचा होता. त्यानंतर यात्रेचे मुख्य दिवस काम थांबवून द्यायचं, आणि गर्दी ओसरल्यावर पुन्हा सुरुवात करायची. हे सगळं नियोजन कागदावर अगदी चपखल बसलं होतं. आणि कागदावर प्रत्येक गोष्ट नेहमीच अगदी मोजमापात आणि नीट बसायची.

गाडी हळूहळू देवळाच्या खालच्या मोकळ्या पटांगणात येऊन थांबली. इथं पूर्वी एक खूप जुना पिंपळाचं झाड होतं, हे निलयच्या पक्कं लक्षात होतं. एक विस्तीर्ण, प्राचीन पिंपळ,

ज्याच्या पारावर गावचे म्हातारे गप्पा मारत बसायचे आणि लहान मुलं खेळायची. आता मात्र त्या झाडाच्या जागी सिमेंटचं सपाट पार्किंग तयार केलं होतं, ज्यावर गाड्या उभ्या करण्यासाठी पांढऱ्या रंगाच्या आखीव रेषा मारल्या होत्या, आणि तो जुना पिंपळ तिथून गायब होता. त्यांनी पार्किंगची जागा काढण्यासाठी तो नक्कीच तोडून टाकला असणार. गाड्या लावायला जागा हवीच होती. आणि एक इंजिनिअर म्हणून निलयला यात काहीही चुकीचं वाटायला नको होतं, शेवटी याच गोष्टीला तर विकास म्हणतात आणि तो स्वतःही तेच काम करायला इथवर आला होता. पण तरीही, पिंपळाशिवाय उरलेली ती भलीमोठी रिकामी जागा पाहून एका क्षणासाठी त्याला खूप रिकामं वाटलं, पण त्यानं ती भावना लगेचच झटकून टाकली.

तो गाडीचा दरवाजा उघडून खाली उतरला. बाहेरची हवा चांगलीच थंडगार होती, आणि त्या हवेत एक विशिष्ट प्रकारचा वास भरून राहिला होता. पहिल्यांदा तो वास ओल्या मातीचा आणि चुलीत जळणाऱ्या लाकडाचा वाटला, पण त्या वासाच्या खाली आणखीही काहीतरी दडलेलं होतं. काहीतरी अतिशय जुनाट. दगडी. थोडंसं ओलसर आणि किंचित कुबट, अगदी एखाद्या खूप खोल आणि अंधाऱ्या विहिरीतून जसा वास येतो तसा. निलयनं तो वास एका सेकंदात ओळखला आणि दुसऱ्याच सेकंदाला तो विसरून जाण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्नही केला. तो या देवळाच्या काळवंडलेल्या दगडांचा वास होता. लहानपणी

तो रोज पहाटे याच वासात झोपेतून उठायचा, आणि त्या कोवळ्या वयात त्याला तो वास म्हणजे एक प्रकारची सुरक्षितता वाटायची. पण आज, इतक्या वर्षांनंतर, तोच वास त्याला काहीतरी वेगळाच इशारा देत होता, आणि तो इशारा काय आहे हे समजून घेण्याची त्याची अजिबात इच्छा नव्हती.

"साहेब, मी सामान..."

"राहू दे. मी घेतो."

हातातील बॅग घेऊन तो तसाच उभा राहिला. त्याच्या डोक्यावर ते प्राचीन देऊळ होतं, खाली नव्यानं बदलत चाललेलं गाव होतं, आणि त्या दोघांच्या मधे तो एकटा उभा होता. त्याला आता इथून नक्की कुठं जायचं आहे हे पूर्णतः माहीत होतं, पण त्याचे पाय मात्र जणू जमिनीला खिळले होते, ते पुढे पडतच नव्हते.

देवळाच्या मुख्य पायऱ्या डावीकडच्या दिशेनं जात होत्या. यात्रेची तयारी सुरू असल्यामुळे पायऱ्यांवर मोठा मांडव उभारला जात होता. त्यासाठी बांबूंचे भक्कम सांगाडे उभे केले होते, आणि एक माणूस शिडीवर चढून रोषणाईच्या तारा जोडत होता. त्या माणसानं एकदा खाली निलयकडं बघितलं, त्याला काही ओळखलं नाही, आणि तो पुन्हा आपल्या तारा बांधायच्या कामाला लागला. दुसरा एक कामगार खाली उभा राहून ती शिडी घट्ट धरून उभा होता. त्याच्या तोंडात गुटखा भरलेला होता.

त्यानंही निलयकडे पाहिलं, पण त्याची नजर निलयवर जरा जास्तच वेळ रेंगाळली, आणि मग त्यानं तोंडातला गुटखा खाली थुंकला.

"कोण पाहिजे?" त्यानं विचारलं.

"घाटे. प्रकाश घाटे. मी त्यांचा मुलगा."

त्या माणसाच्या चेहऱ्यावरच्या रेषा अचानक बदलल्या. त्याच्या डोळ्यांत ओळख दिसली, की कोणती जुनी आठवण जागृत झाली, की नुसतंच कुतूहल होतं, हे नक्की सांगता येत नव्हतं. "अच्छा. तुम्ही. जे बाहेर शिकण्यास गेले होते." त्यानं पुन्हा एकदा खाली थुंकून तोंड मोकळं केलं. "आले का परत? बरं झालं. गुरुजी एकटेच असतात ना."

निलयनं होकारार्थी मान हलवली आणि तो तिथून पुढे चालू लागला. गुरुजी एकटेच असतात. ते साधंसं वाक्य एखाद्या टोकदार सुईसारखं त्याच्या पाठीत घुसलं आणि तिथंच रुतून बसलं. एका पारख्या, अनोळखी माणसालाही या घरातलं सत्य माहीत होतं. संपूर्ण गावाला ते माहीत होतं. फक्त निलयच असा होता ज्यानं हे सत्य इतक्या स्पष्ट शब्दांत स्वतःला कधी ऐकवलं नव्हतं.

आणि नेमकं तेव्हाच त्याची नजर तिच्यावर पडली.

देवळाच्या पायऱ्यांच्या एका बाजूला, कोपऱ्यातल्या दाट अंधारात एका मोठ्या दगडावर एक म्हातारी बाई बसली होती.

तिची पाठ कमानदार वाकलेली होती, आणि पांढरे केस वाऱ्यानं पूर्ण विसकटले होते. ती स्वतःच्या दोन्ही हातांनी हवेतच काहीतरी कृती करत होती, जणू काही जात्यावर दळतेय किंवा उखळात कांडतेय. एका विशिष्ट लयीत तिचे हात पुढे-मागे होत होते, पण वास्तवात तिच्या हातात काहीच नव्हतं. आणि त्या हालचालींसोबत ती तोंडानं सतत काहीतरी पुटपुटत होती. अगदी स्वतःशीच. एकाच संथ सुरात, पुन्हा पुन्हा, त्याच त्याच ओळी ती रिपीट करत होती. तो सूर नक्कीच गाण्याचा नव्हता. गाण्यात एक प्रकारचा गोडवा असतो, चढ-उताराचं एक वळण असतं. तिच्या आवाजात तसलं काहीच नव्हतं. एखादं यांत्रिक घड्याळ किंवा बिघडलेलं यंत्र जसं एकच आवाज काढतं, तशी ती एकच ओळ ती म्हातारी घोकंपट्टी केल्यासारखी घोकत होती. तिची ती लय एका विशिष्ट ठिकाणी जाऊन अडखळायची, आणि बरोबर तिथूनच ती पुन्हा पहिल्या अक्षराकडे परतायची.

ती नक्की काय म्हणतेय, ते शब्द निलयला स्पष्ट ऐकू आले नाहीत. प्रत्येक गावात अशी एखादी वेडसर म्हातारी असतेच, असं त्यानं स्वतःच्या मनाला समजावलं. देवळाच्या दारात पडून राहणारी, स्वतःशीच काहीबाही बडबडणारी, आणि येणाऱ्या-जाणाऱ्या यात्रेकरूंसमोर हात पसरून त्यांना दुवा देणारी. लहानपणी तो या म्हातारीला खूप घाबरायचा, एवढी एक पुसटशी आठवण त्याच्या डोक्यात तरळून गेली, पण नक्की कशामुळे घाबरायचा ते त्याला आता आठवत नव्हतं. लहान मुलं

अशा विचित्र दिसणाऱ्या म्हाताऱ्या बायांना घाबरतातच. त्यात काही मोठं गूढ नव्हतं.

तो तिथंच जागच्या जागी थांबला. फक्त एका क्षणासाठी.

त्या म्हातारीनं आपली वाकलेली मान हळूच वर केली. तिचे भिरभिरणारे डोळे थेट त्याच्यावर येऊन थांबले. आणि एका सेकंदापुरतं त्याला असं वाटलं की तिची नजर त्याच्यावरच खिळून राहिली आहे, नेहमीपेक्षा जरा जास्तच वेळ. पण पुढच्याच क्षणी तिची नजर तिथून निसटली आणि पुन्हा इकडंतिकडं सैरावैरा फिरू लागली, आणि ती पुन्हा काहीतरी पुटपुटायला लागली. निलयनं स्वतःचीच समजूत घातली की तो फक्त आपला एक भास होता.

"आला," ती पुटपुटली. कुण्या व्यक्तीला उद्देशून नाही, तर नुसतंच हवेत. "आलं लेकरू, निवजाईचं लेकरू, आलं परत..." आणि मग तेच शब्द जात्यावर दळल्यासारखे तोंडात घोळवत ती पुढे म्हणाली, "शिळा... शिळेले हात... झोपू द्या तिले, झोपू द्या ना बाई, माय झोपलीय, उठवू नका..." आणि त्यानंतरचे तिचे शब्द पुन्हा त्या जुनाट ओवीत कुठेतरी विरघळून गेले. तेच जुने अर्धवट सूर पुन्हा सुरू झाले, आणि तिनं निलयच्या दिशेनं पाहणंही सोडून दिलं.

तिच्या त्या बडबडीचा निलयला फारसा काही अर्थ उलगडला नाही, आणि त्यात काही अर्थ दडलेला असेल असंही त्याच्या

प्रॅक्टिकल मनाला वाटलं नाही. आपण तिच्याकडे बघितलंच नाहीये, असा आव आणत तो पायऱ्यांवरून पुढे निघून गेला. उतारवय असेल, त्यानं पुन्हा एकदा स्वतःला तार्किक कारण दिलं. सततच्या एकटेपणामुळे माणूस असंच दिवसरात्र स्वतःशीच काहीतरी निरर्थक बोलत बसतो, आणि मग इथल्यासारखं गाव त्याला सहज वेड्यात काढतं.

पण तरीही, त्या म्हातारीच्या आवाजानं त्याच्या मानेवरचे केस भीतीनं उभे राहिले होते, आणि शरीराची ती प्रतिक्रिया त्यानं जाणीवपूर्वक दुर्लक्षित केली.

चालत चालत तो वडिलांच्या घराच्या दारात येऊन पोहोचला. समोरचं लाकडी दार उघडंच होतं. आतल्या अंधुक समईच्या पिवळ्या उजेडात प्रकाश घाटे शांत बसले होते. त्यांचे डोळे मिटलेले होते आणि पाठ अगदी ताठ होती. त्यांना त्या अवस्थेत बघून निलयला एका क्षणासाठी कळेनाच की ते झोपले आहेत की जागे आहेत, ते ध्यानाला बसलेत की नुसतेच विश्रांती घेत आहेत. तो तसाच उंबऱ्याच्या बाहेर थबकला. आता थेट आत पाऊल टाकावं की बाहेरूनच हाक मारावी, हे त्याला काही केल्या ठरवता येत नव्हतं. आणि ही संभ्रमाची अवस्था त्याला स्वतःचाच राग आणणारी होती, कारण स्वतःच्याच वडिलांच्या उंबऱ्यावर उभं असताना कोणत्याही मुलाला इतकं परकं आणि अवघडल्यासारखं वाटायला नको होतं.

"आलो," तो म्हणाला.

आवाज ऐकताच प्रकाश गुरजींनी डोळे उघडले. त्यांनी समोर उभ्या असलेल्या मुलाकडं पाहिलं. त्या नजरेत पूर्ण तेरा वर्षांचा काळ गोठलेला होता, पण त्यांच्या चेहऱ्याच्या सुरकुत्यांवर मात्र कोणतीही नवी भावना उमटली नाही. ना ओठांवर हसू आलं, ना डोळ्यांत ओलावा दिसला, ना शब्दांत कोणती तक्रार जाणवली. फक्त त्यांची ती स्थिर नजर एक क्षण निलयच्या चेहऱ्यावरून फिरली, त्याच्या गालावर आणि मानेवर रेंगाळली, जिथं शहरी धावपळीत आता हाडं जरा जास्तच वर आली होती. त्यांचे ओठ किंचितसे हलले, जणू त्यांना काहीतरी काळजीपोटी म्हणायचं असावं, पण प्रत्यक्षात तो शब्द बाहेर पडलाच नाही. त्यांचे ओठ पुन्हा घट्ट मिटले गेले. आणि त्यांनी अगदी हलकेच मान हलवली, अगदी रस्त्यात जाणाऱ्या एखाद्या जुन्या ओळखीच्या माणसाला पाहिल्यावर आपण जशी औपचारिक मान हलवतो, तशी.

"बस," ते म्हणाले. "जेवण झालं का?"

"गाडीत खाल्लं काहीतरी."

"बस. वाढतो."

"नको बाबा, मी खाल्लंय खरंच..."

पण तोपर्यंत प्रकाश जागेवरून उठले होते, आणि स्वयंपाकघरात निघून गेले होते. निलयचं ते नकार देणारं वाक्य तसंच अर्धवट हवेत विरघळून गेलं, जशी या घरातली बरीचशी

वाक्यं कायम अर्ध्यावरच राहायची. त्यानं हातातील बॅग फरशीवर खाली ठेवली आणि तो सतरंजीवर जाऊन बसला. समोरच्या भिंतीवर तीच जुनी देवीची फ्रेम लावलेली होती, जिच्यावरचा फुलांचा हार संपूर्णपणे वाळून गेला होता. तोच जुना कोनाडा. कोनाड्यात तीच पितळी समई, आणि तिची वात नेहमीप्रमाणेच अगदी नीट सारलेली होती. या घरातल्या एकाही वस्तूत काहीच बदल झाला नव्हता. बाहेरचं अख्खं गाव बदलून गेलं होतं, पारंब्यांचा पिंपळ मुळासकट तुटला होता, डोंगरावर मोबाईलचा टॉवर उभा होता, पण या घराच्या चार भिंतींच्या आत मात्र तेरा वर्षांचा काळ जसं काही स्तब्ध होऊन थांबला होता. आणि बाहेरचा तो झपाट्याने झालेला बदल जास्त भयानक आहे की आतली ही न बदललेली गोठलेली शांतता जास्त अस्वस्थ करणारी आहे, हे निलयला ठरवता येत नव्हतं.

प्रकाश गुरुजींनी फरशीवर दोन पाट आणि दोन पानं मांडली. अगदी सवयीनं, कुठलाही विचार न करता, जशी ती पानं रोजच मांडली जात असावीत. एक पान या बाजूला, आणि दुसरं त्या बाजूला. मग ते पुन्हा आतल्या खोलीत गेले, आणि एकाच मोठ्या ताटात गरमागरम भात, वरण, भाजी आणि वरून तूप वाढून घेऊन आले. त्यांनी ते भरलेलं ताट निलयच्या समोर असलेल्या पानावर ठेवलं. निलय अगदी नकळत त्याच पानावर जाऊन बसला होता, अगदी जसा तो लहानपणी सवयीनं तिथेच बसायचा. प्रकाश त्याच्या समोरच्या त्या दुसऱ्या पानावर जाऊन

बसले, पण त्यांच्या स्वतःच्या समोर कोणतंच ताट वाढलेलं नव्हतं. ते पान तसंच रिकामं होतं. ते नुसतेच मांडी घालून बसले, आणि समोर जेवणाऱ्या मुलाकडं शांतपणे बघत राहिले.

निलयनं शांतपणे खायला सुरुवात केली. पोटात अजिबात भूक नव्हती, पण या भयाण शांततेत एकमेकांशी बोलण्यापेक्षा जेवणाचं नाटक करणं हे जास्त सोपं होतं, आणि हे दोघांनाही पक्कं माहीत होतं. म्हणूनच पुढचा काही काळ त्या खोलीत फक्त ताटातल्या घासांचा आणि चमच्याचाच आवाज घुमत होता.

"किती दिवस?" प्रकाशनं विचारलं.

"बघू. आठवडा, दहा दिवस. कामावर अवलंबून."

"कसलं काम."

निलयनं हातातला चमचा ताटात खाली ठेवला. ज्या प्रश्नाची त्याला भीती होती तो आलाच, त्यानं स्वतःच्या मनाशीच म्हटलं. अपेक्षेपेक्षा जरा लवकरच आला. "देवळाचं. जीर्णोद्धार. सरकारी प्रोजेक्ट आहे बाबा. तीर्थक्षेत्र विकास. रस्ता होणार, भक्तनिवास, आणि देवळाची डागडुजी. जुनी बांधकामं तपासायची, कुठं धोका आहे का बघायचं, आणि जिथं गरज असेल तिथं..."

"देवळाला हात लावणार."

"डागडुजी आहे फक्त. स्ट्रक्चरल तपासणी. जिथं दगड ढासळायला आलेत तिथं..."

"देवळाला हात लावायचा नसतो."

हे बोलताना त्यांचा आवाज चढलेला नव्हता. उलट, तो नेहमीपेक्षा जास्तच खाली गेला होता, अतिशय शांत आणि संथ झाला होता, आणि त्या आवाजाचं वजनच अधिक होतं. जर ते नेहमीप्रमाणे ओरडले असते, तर निलयला त्यांच्याशी जोरदार भांडता आलं असतं. पण त्यांच्या या गोठलेल्या शांततेशी त्याला काहीच भांडता येत नव्हतं. त्याच्या डोक्यात संतापाची तिडीक उठली. हा राग काल-परवाचा नव्हता, तो पूर्ण तेरा वर्षांपासून साठलेला जुना राग होता. आणि त्या रागाच्या अगदी तळाशी आणखी काहीतरी होतं जे या रागापेक्षाही प्राचीन होतं. ती बहुधा एक प्रकारची भीती होती, पण ते सत्य त्यानं स्वतःकडे कधीच कबूल केलं नाही.

"बाबा, हे बघा." त्यानं स्वतःचा आवाज जाणीवपूर्वक सांभाळला, त्याला एक प्रोफेशनल आणि व्यावसायिक धार दिली. हा अगदी तोच आवाज होता जो तो कॉर्पोरेट मीटिंग्जमध्ये क्लायंट्ससोबत वापरायचा, कारण तोच तांत्रिक आवाज त्याला एक प्रकारची सुरक्षितता मिळवून द्यायचा. "हे सुपरस्टिशन नाही. हे इंजिनिअरिंग आहे. ते देऊळ चारशे वर्षं जुनं आहे. त्याचे पाये कधी तपासले गेलेत का? कागदावर काहीच नाही. आणि आता यात्रेत लाखभर लोक येणार. गर्दी. वजन. एखादा जुना दगड ढासळला, एखादी भिंत गेली, तर माणसं मरतील बाबा. मी ते

होऊ द्यायचं नाही या उद्देशाने आलोय. इट्स अ सेफ्टी ऑडिट. समजतंय का?"

प्रकाश गुरुजींनी काहीच न बोलता त्याच्याकडे पाहिलं. बराच वेळ ते फक्त बघत राहिले. बाजूला जळणाऱ्या समईचा तो पिवळा उजेड त्यांच्या चेहऱ्यावरच्या खोल सुरकुत्यांमध्ये थरथरत होता. आणि मग ते अगदी संथपणे म्हणाले, "तू पाये तपासायला आलास."

"हो."

"देवळाचे पाये." त्यांच्या या तीन शब्दांत असं काहीतरी होतं जे निलयच्या इंजिनिअरिंगच्या मेंदूला वाचता आलं नाही. त्यात उघड उपरोध नव्हता. आणि दुःखही नक्कीच नव्हतं. "बरं."

आणि अनपेक्षितपणे त्यांनी तो विषय तिथेच सोडून दिला. कुठलाही वाद न घालता. निलयच्या मनात पक्की खात्री होती की आता हमखास मोठं भांडण होईल, अगदी नेहमीसारखंच, त्याच जुन्या आणि बोचऱ्या शब्दांत. पण तसलं काहीही भांडण झालं नाही, आणि त्यांच्याकडून आलेला हा थंड प्रतिसाद कोणत्याही मोठ्या भांडणापेक्षा कितीतरी पटींनी वाईट आणि अस्वस्थ करणारा होता. प्रकाश गुरुजी जागेवरून उठले, तांब्यातलं संपलेलं पाणी पुन्हा भरून आणलं, आणि बाजूने जाता जाता फारच सहजपणे त्यांनी कोनाड्यातल्या समईतलं तेल किती उरलंय ते निरखून पाहिलं आणि बोटांनी वात जराशी पुढे सारली.

ही त्यांची नेहमीची रोजची कृती होती. आयुष्यात हजारो वेळा केलेली. त्यांचे हात सवयीने आपोआप चालत होते, पण त्यांचं डोकं मात्र नक्कीच कुठेतरी दुसरीकडे गुंतलेलं होतं.

"तो अभिषेक," निलय अचानक म्हणाला, कारण त्याला स्वतःच्या जिभेला आणि त्या प्रश्नाला थांबवणं शक्यच झालं नाही. "रोजचा. अजून करता?"

"चुकवत नाही."

"कधीच?"

"कधीच." प्रकाश गुरुजींनी समईची वात नीट सारली आणि आपला हात मागे घेतला. "आजोबा करत आले. त्यांचे आजोबा. चुकवायचा नसतो, एवढं माहीत."

"का?"

प्रकाश गुरुजींचा हात मध्येच थांबला. त्या एका क्षणात निलयला मनापासून वाटून गेलं की आता ते त्याला काहीतरी उलगडून सांगतील, काहीतरी असं खरं सत्य जे या अंधाऱ्या परंपरेला एक ठाम तार्किक अर्थ देईल. पण ते फक्त एवढंच म्हणाले, "इचारायचं नसतं, लेकरा. काही गोष्टी करायच्या असतात. का ते इचारलं की त्या मोडतात."

आणि त्यांच्या या उत्तरात असं काहीतरी होतं जे निलयला उपहासात्मक हसू आणणारं होतं. हे सगळं किती घोर अवैज्ञानिक होतं, किती भयंकर आंधळेपणाचं होतं. पण तरीही

निलय मुळीच हसला नाही. कारण त्याच्या वडिलांच्या त्या संथ आवाजात एका आज्ञाधारकाची अशी एक थकलेली निश्चिती भरलेली होती, जिच्यापुढे कुणालाही हसण्याचं धाडस होत नसे.

तो मूकपणे स्वतःचं जेवण जेवत राहिला. आणि नेमकं त्याच वेळी त्याच्या अचानक लक्षात आलं की, प्रकाश गुरुजींनी स्वतःसाठी ताट वाढूनच घेतलेलं नव्हतं. फरशीवर दोन पानं मांडलेली होती, पण जेवणाचं ताट मात्र एकच होतं, आणि ते ताट त्याच्या स्वतःच्या पानावर ठेवलं होतं. वडील त्यांच्या रिकाम्या पानाशी मांडी घालून बसले होते आणि नुसतेच त्याच्याकडे एकटक बघत होते.

आणि मग दुसऱ्याच क्षणी निलयला त्यामागचं कारण लख्ख उमगलं, आणि ते सत्य उमगल्यावर त्याच्या घशाखाली अन्नाचा घास उतरेनासा झाला.

त्याचे वडील इथं रोज रात्री अशीच दोन पानं मांडत असणार. निव्वळ सवयीनं. एक पान स्वतःसाठी, आणि दुसरं पान आपल्या मुलासाठी. तो मुलगा जो गेली तेरा वर्षं या उंबऱ्याच्या आत आला नव्हता, आणि जो भविष्यातही कधी येणार नव्हता, त्याच्यासाठी रोज न चुकता इथं एक रिकामं पान मांडलं जात असावं. आणि आज अचानक तोच मुलगा खरंच दारात उभा राहिला होता, आणि सवयीच्या त्याच रिकाम्या पानावर येऊन बसला होता. ते कायम रिकामं असणारं पान आज खऱ्याखुऱ्या अर्थानं भरलं

होतं. फक्त या अचानक झालेल्या बदलामुळे वडील पूर्णपणे गोंधळून गेले होते. त्यांच्या रोजच्या गणितात आणि हिशोबात आजचा हा बदल बसत नव्हता. एक पान मुलाचं, जे आज भरलेलं होतं, आणि दुसरं पान स्वतःचं. आणि त्या अचानक उडालेल्या मानसिक गडबडीत ते चक्क स्वतःसाठी ताट वाढायचंच विसरून गेले होते. त्यांनी स्वतःसाठी काहीही न घेता, नुसतंच स्वतःच्या मुलाला जेवताना बघत बसणं पसंत केलं होतं.

निलयनं त्या रिकाम्या पानाकडे बघितलं. तो तोंडातून एक अवाक्षरही बोलला नाही. त्याला खरंतर काहीच बोलायचं नव्हतं. आणि जर चुकून तो या क्षणी काही बोलला असता, तर हमखास त्याचा आवाज भावनांनी फुटला असता, आणि हे असं भावनिक होणं त्याला अजिबात परवडणारं नव्हतं. गावात आल्याच्या पहिल्याच रात्री तरी नाही. त्यानं कसलाही विचार न करता फक्त भाकरीचा एक घास तोडला आणि तो वडिलांच्या त्या रिकाम्या पानाकडे सरकवला, त्यांच्याकडे थेट न बघता. आणि तो पुन्हा खाली मान घालून जेवत राहिला.

जेवण उरकल्यावर तो घराच्या बाहेर आवारात आला. रात्र आता चांगलीच गडद झाली होती. अख्खं गाव हळूहळू झोपेच्या आधीन होऊ लागलं होतं, आणि घरातले पिवळे दिवे एकेक करून विझत चालले होते. वरच्या बाजूला ते भलंमोठं देऊळ रात्रीच्या त्या काळ्याकुट्ट आकाशाच्या पार्श्वभूमीवर आणखीनच

काळेभोर आणि अक्राळविक्राळ दिसत होतं. त्याच्या उंच कळसावर एखादं बारीकसं चांदणं जणू कायमचं अडकून पडल्यासारखं वाटत होतं. आजूबाजूचं जंगल आता गावाच्या जास्त जवळ आल्यासारखं वाटत होतं. दिवसा उजेडात जे जंगल खूप दूर वाटायचं, तेच रात्रीच्या अंधारात चालत गावाच्या अगदी वेशीवर येऊन उभं राहायचं. त्या घनदाट जंगलातून रातकिड्यांचा एक सतत आणि एकसुरी करकर आवाज येत होता. तो आवाज इतका सलग होता की काही वेळानं कानांना त्याची सवय व्हायची आणि तो ऐकूच येईनासा व्हायचा. आणि मग तो आवाज अचानक थांबायचा, आणि रातकिडे थांबल्यावर जी भयाण शांतता पसरायची ती त्या आवाजापेक्षाही जास्त मोठी आणि अंगावर येणारी वाटायची.

निलय आवारात तसाच शांत उभा राहिला आणि त्यानं वर देवळाकडं नजर टाकली. पण काही केल्या त्याला त्या वास्तुकडे जास्त वेळ बघवेना. लहानपणी तो या देवळाला कधीच घाबरला नव्हता, तो याच दगडांवर खेळून वाढला होता, आतल्या गाभाऱ्यात लपाछपी खेळला होता, आणि उन्हाळ्याच्या दुपारी याच पायऱ्यांवर झोपलाही होता. पण आज, या एवढ्या वर्षांनंतर आणि या घनदाट अंधारात, त्याला चक्क असं वाटत होतं की ते अजस्र देऊळच जिवंत होऊन त्याच्याकडं बघत आहे. आणि हा असा विचार करणं इतकं बालिश आणि मूर्खपणाचं होतं की त्याला स्वतःच्याच इंजिनिअरिंगच्या डिग्रीची लाज वाटली.

निर्जीव दगड कधीच माणसाकडे बघत नसतात. दगड म्हणजे फक्त दगड, त्यांना जोडणारा चुना, त्यावर पडलेला वेळेचा प्रभाव आणि गुरुत्वाकर्षण. बाकी काहीही नाही.

आणि म्हणूनच मन दुसरीकडे वळवण्यासाठी त्यानं जाणीवपूर्वक उद्याच्या प्रोजेक्टच्या कामाचा विचार करायला सुरुवात केली, कारण या तांत्रिक कामाचा विचार त्याला नेहमीच सुरक्षित वाटायचा. उद्या सकाळी सर्वांत आधी देवळाची पश्चिमेकडची भिंत तपासायची. देवळाच्या पायाची खोली नक्की किती आहे, हा त्याचा पहिला आणि मुख्य प्रश्न होता. त्यानंतर भिंतीच्या दगडांची जाडी मोजायची. दोन दगडांच्या सांध्यांतला चुना किती जुना झालाय आणि तो किती ढासळलाय, हे तपासायचं. जमिनीचा उतार नक्की कुठल्या दिशेला आहे, आणि पावसाचं पाणी कुठून मुरून आत जातंय, याचा शोध घ्यायचा. प्रत्येक छोट्या गोष्टीचं एक अचूक माप, आणि त्या प्रत्येक मापाचा एक निश्चित आकडा, आणि त्या सगळ्या आकड्यांची मिळून एक परिपूर्ण यादी. आणि एकदा का अशी मोजमापांची यादी स्वतःच्या हातात आली की कोणतीही गुंतागुंतीची गोष्ट आपल्या पूर्ण ताब्यात येते, असा त्याचा ठाम विश्वास होता.

त्यानं मनातल्या मनात उद्याच्या कामाची ती यादी बनवायला सुरुवात केली. एकेक तांत्रिक बाब तो डोक्यात जुळवत गेला, आणि जसजशी ती यादी मोठी होत गेली, तसतशी त्याच्या

छातीवर दाटून आलेली ती अज्ञात भीतीची जडता हळूहळू कमी होत गेली. हे असं मोजमाप करणं त्याला अगदी उत्तम जमत होतं. भावना, नाती आणि जुन्या आठवणींचा गुंता सोडवणं त्याला जमत नव्हतं, पण हे तांत्रिक काम त्याच्या हातचा मळ होता.

त्यानं पुन्हा एकदा खिशातून आपला फोन बाहेर काढला. स्क्रीनवर रेंज नव्हतीच. त्यानं हात वर करून फोन जरा उंच धरून पाहिला, आणि फक्त एका क्षणभरासाठी नेटवर्कची एक कांडी स्क्रीनवर चमकली. तेवढ्याच वेळात इंटरनेटवरून एक जुना पेंडिंग असलेला ऑफिसच्या कामाचा मेसेज आला, आणि पुढच्याच सेकंदाला ती रेंज पुन्हा नाहीशी झाली. त्यानं तो निरुपयोगी फोन परत आपल्या खिशात टाकून दिला.

आणि नेमकं तेव्हाच त्याच्या अचानक लक्षात आलं की मघासपासून चालू असलेला तो आवाज आता बंद झाला होता.

त्या म्हातारीचा आवाज. ती भणभण करणारी चाल. ती आता अजिबात ऐकू येत नव्हती. निलयनं झटकन आवाराच्या त्या कोपऱ्याकडं पाहिलं, त्या म्हातारीच्या दगडाकडं. पण तिथं आता फक्त किर्रर्र अंधार साचला होता, आणि ती वेडसर म्हातारी तिथं दिसत नव्हती. ती या रात्रीच्या वेळी अचानक उठून कुठं निघून गेली असेल, हे त्याला कळत नव्हतं. पण ती कुठं गेली यापेक्षाही जास्त अस्वस्थ करणारी गोष्ट ही होती की, तिनं ती

जुनाट ओवी म्हणायची अचानक थांबवली होती. आणि तिच्या त्या थांबण्यानं ही रात्र काही जास्त शांत किंवा सुरक्षित वाटत नव्हती. उलटपक्षी, भीती जास्तच वाढली होती. जणू काही तिची ती अखंड चाललेली ओवी कोणत्यातरी अदृश्य आणि भयानक गोष्टीला घट्ट बांधून ठेवत होती, आणि आता तो आवाज थांबल्यामुळे ते बांधलेलं काहीतरी अचानक सुटून मोकळं झालं होतं.

जंगलातले रातकिडेही अचानक गप्प झाले. एक क्षण गेला, दोन क्षण गेले. सगळीकडे जणू स्मशानासारखी संपूर्ण आणि अभेद्य शांतता पसरली. आणि त्या श्वास रोखून धरलेल्या शांततेत, कुठूनतरी फार दूरवरून, देवळाच्या अगदी खालच्या अंधाऱ्या पोटातून, निलयच्या कानावर एक बारीक आवाज आला. पाण्याचा. पाण्याचा एक थेंब. काळ्या दगडावर पडल्याचा तो स्पष्ट आवाज. फक्त एकच थेंब.

त्यानं आपला तो ऐकलेला आवाज लगेचच नाकारला, अगदी आपोआप. तिथं असा पाण्याचा थेंब पडणं वैज्ञानिकदृष्ट्या शक्यच नव्हतं. देवळाच्या पायाखाली जर खरोखरच पाणी असलंच, तर ते एखादा जिवंत झरा असल्यासारखं वाहतं असणार, खडकांतून झिरपणारं आणि खळाळणारं असणार. पाण्याचा असा थेंब फक्त तेव्हाच पडतो जेव्हा ते पाणी एका जागी साचलेलं आणि स्थिर असतं. आणि तिथं देवळाखाली असं

साचलेलं डबकं असण्याची काहीच शक्यता नव्हती. याचाच अर्थ त्यानं प्रत्यक्षात असा कोणताही आवाज ऐकलाच नव्हता. माणसाचे कान कधीकधी अतिशय थकव्यामुळे किंवा आजूबाजूच्या प्रदीर्घ शांततेमुळे असे नसलेले आवाज स्वतःच तयार करतात. हा फक्त एक भास होता. एवढंच.

पण तरीही, तो पाण्याचा आवाज त्याला अगदी स्पष्ट ऐकू आला होता, आणि त्याचा तो बारीक प्रतिध्वनी अजूनही त्याच्या कानात घुमत होता, आणि जे आवाज अस्तित्वात नसतात ते कानात असे रेंगाळत राहत नाहीत.

तेवढ्यात जंगलातले रातकिडे पुन्हा नव्यानं करकरू लागले, आणि ते झोपलेलं गाव पुन्हा एकदा नेहमीसारखंच सामान्य वाटू लागलं. निलय वळला आणि स्वतःच्या घराच्या आत गेला. मागून लाकडी दार लावून घेताना त्याचा हात कडीवर एक क्षण नेहमीपेक्षा जास्त रेंगाळला, आणि त्यानं ते दार नेहमीपेक्षा जरा जास्तच ताकद लावून घट्ट ओढून घेतलं. दाराची कडी नीट अडकली आहे की नाही, हे त्यानं खात्री करण्यासाठी दोनदा तपासून बघितलं. आपण आपल्याच घरात असं का करतोय, हा प्रश्न मात्र त्यानं स्वतःला विचारण्याचं धाडस केलं नाही.

* * *

प्रकरण दोन : खोदकाम

जळ निवळो नेदी कदा ।

सकाळच्या कोवळ्या उन्हात ते देऊळ अगदीच वेगळं दिसत होतं.

काल रात्रीच्या त्या घनदाट काळोखात तेच देऊळ एखाद्या अक्राळविक्राळ सावलीसारखं, पूर्णतः बंदिस्त आणि थेट अंगावर चालून येणारं वाटलं होतं. पण आता, या स्वच्छ सूर्यप्रकाशात ते निव्वळ एक जुनाट, निर्जीव बांधकाम होतं. शतकानुशतके ऊन-पावसाचा मारा खाऊन झिजलेले दगड, सांध्यांमध्ये साचलेली काजळी, काही ठिकाणी काळवंडलेल्या भिंती, आणि कळसावरचा तो तांब्याचा कलश जो काळाच्या ओघात एका बाजूला किंचित कलंडला होता.

निलय देवळाच्या मुख्य पायऱ्यांच्या खाली उभा राहून वर नजर लावून उभा होता, आणि रात्री स्वतःला वाटलेली ती अनामिक भीती त्याला आता या उजेडात जरा हास्यास्पदच वाटत होती. उजेडात सगळ्या गोष्टी आपापल्या योग्य जागी आणि योग्य आकारात येतात. दगड हा फक्त दगड उरतो, म्हातारी ही निव्वळ एक म्हातारी बाई उरते, आणि रात्री ऐकू आलेला तो पाण्याचा थेंब हा प्रवासाने आणि तणावाने थकलेल्या

कानांचा निव्वळ एक खेळ ठरतो. असा विचार केल्यावर त्याला खूप बरं वाटलं.

त्यानं हातातील नोंदवही उघडली आणि कोऱ्या पानावर पहिली ओळ लिहिली: *पश्चिमेची भिंत, बाह्य.* आणि मग तो आपल्या तांत्रिक कामाला लागला.

हे काम त्याला उत्कृष्टरीत्या येत होतं, आणि जे काम आपल्याला अचूक जमतं, ते करताना माणसाला नेहमीच एक प्रकारचा दिलासा मिळतो. त्यानं खिशातून मोजमापाची लोखंडी टेप बाहेर काढली आणि देवळाच्या एका कोपऱ्यापासून मोजायला सुरुवात केली. आधी भिंतीची एकूण लांबी. मग उंची, जिथवर त्याचे हात आणि टेप पोहोचू शकली तिथवर. जमिनीवर सुटा होऊन पडलेल्या एका जुन्या दगडावरून त्यानं दगडांची सरासरी जाडी मोजली. दोन दगडांच्या सांध्यांतला चुना स्वतःच्या बोटाच्या नखानं खरवडून बघितला, तो काळानं किती भुसभुशीत आणि ठिसूळ झालाय याचा अंदाज घेतला. या प्रत्येक भौतिक गोष्टीचा त्याच्याकडे एक निश्चित आकडा तयार होत होता, आणि तो प्रत्येक आकडा नोंदवहीत उतरत होता. जसजशी ती वही आकड्यांनी भरत गेली, तसतशी रात्रीपासून त्याच्या छातीवर दाटून असलेली ती अज्ञात भीतीची जडता हळूहळू कमी होत गेली. या गणिताच्या जगात त्याला कुणाच्याही आधाराची गरज नव्हती. इथं फक्त तो स्वतः, त्याची मोजमापाची टेप, आणि ते

काळे दगड होते. आणि दगड कधीच माणसांसारखं खोटं बोलत नसत.

पण हे मोजमाप करत असतानाच, अचानक त्याचा हात एका विशिष्ट दगडावर जाऊन थांबला. तो दगड भिंतीच्या इतर खडबडीत दगडांपेक्षा लक्षणीयरीत्या गुळगुळीत होता. जसं काही वर्षानुवर्षे शेकडो हातांचा स्पर्श होऊन तो घासून घासून मऊ झाला होता. आणि त्या दगडाच्या स्पर्शाबरोबरच निलयला एकदम लख्ख आठवलं की, लहानपणी तो नेमका याच दगडावर बसायचा. वडील आत गाभाऱ्यात पूजा करत असायचे आणि तो इथं पाय लोंबकळत तासन्तास वाट बघत बसायचा. तो विशिष्ट दगड, तो कोपरा, ती नेमकी जागा. त्याच्या मेंदूला जुन्या स्मृती आठवण्याच्या आधीच त्याच्या बोटांच्या स्पर्शज्ञानाला ती जागा आठवली होती. आणि ही जाणीव त्याला मुळीच आवडली नाही, कारण त्यानं या गावाला आणि इथल्या आठवणींना कायमचं विसरायचं ठरवलं होतं, पण हे गाव मात्र त्याला काही केल्या स्वतःला विसरू देत नव्हतं. त्यानं जणू चटका लागल्यासारखा स्वतःचा हात त्या दगडावरून झटकन बाजूला काढला आणि तो पुढच्या मापाकडे वळला. सांध्यातला चुना. त्याचा आकडा. आणि पुढे.

"पाया कुठवर खोल आहे, माहितीय का कुणाला?"

त्यानं मागे न वळताच ओरडून विचारलं, समोर जो कुणी असेल त्याला उद्देशून. पण पाठीमागून कोणतंही उत्तर आलं नाही. कारण मदतीसाठी येणारे मजूर अजून पोहोचायचे होते. त्यानं स्वतःच्याच प्रश्नाचं उत्तर नोंदवहीत लिहून काढलं: *पायाची खोली : अज्ञात.* आणि तो "अज्ञात" हा शब्द कागदावर उमटताच त्याला तो डोळ्यांत खूप खटकला. कारण त्याला अज्ञात असलेल्या गोष्टींचा तिरस्कार होता. अज्ञात म्हणजे ज्याचं मोजमाप झालेलं नाही, आणि जे मोजलेलं नाही, ते बुद्धीला समजलेलं नाही. आज दिवसभरात कसंही करून या "अज्ञात" शब्दाला खोडून तिथे एक निश्चित आकडा आणायचाच, हे त्यानं मनाशी ठरवलं.

आदल्या रात्री त्यानं देवळाचे जुने कागदपत्र आणि नकाशे चाळले होते. देवस्थान ट्रस्टकडून जे अलीकडच्या काळातील कागद मिळाले होते, ते तुटपुंजे आणि वरवरचे होते. पण देवळाच्या खऱ्या जुन्या नोंदी, ज्या ट्रस्ट स्थापन होण्याच्या कितीतरी दशकांआधीच्या होत्या, त्या एका वेगळ्या जुनाट लाकडी कपाटात धूळ खात पडून होत्या. आणि त्या जुन्या कागदांच्या ढिगाऱ्याच्या अगदी तळाशी, इतर जड फाईल्सखाली दबलेला एक फार जुना नकाशा त्याला सापडला होता. तो कागद इतका जीर्ण झाला होता, त्याच्या कडा इतक्या झिजल्या होत्या आणि घड्यांवरून तो इतका फाटायला आला होता की, तो हातात उचलताना निलयला भीती वाटत होती की तो बोटांच्या

दाबानेच विरून जाईल. त्यावरचा नकाशा खूप बारकाईने हातानं काढलेला होता, आणि त्याची शाई वेळेच्या ओघात इतकी फिकट झाली होती की काही रेषा आता फक्त सावल्यांसारख्या उरल्या होत्या. हा कागद किमान दीडदोनशे वर्षं तरी जुना असावा, असा निलयनं त्याच्या पोतावरून अंदाज बांधला. तो कागद स्वतःचा प्राचीन इतिहास स्वतःच सांगत होता.

त्या नकाशात सगळं काही होतं. मुख्य देऊळ, गाभारा, बाहेरचा सभामंडप, आणि भोवतीचा प्रदक्षिणा-मार्ग. सगळं अचूक रेखाटलेलं. आणि त्यावरील खुणांची सगळी अक्षरं जुन्या मोडी लिपीत होती. निलयला मोडी लिपी फारशी नीट वाचता येत नव्हती. लहानपणी आजोबांनी ती शिकवण्याचा थोडाफार प्रयत्न केला होता, पण ती लिपी त्यानं गावाच्या इतर बऱ्याच आठवणींसारखी जाणीवपूर्वक विसरून टाकली होती. आणि आता या फिकट रेषांकडं आणि न समजणाऱ्या अक्षरांकडं हतबलपणे बघताना त्याला स्वतःचाच राग येत होता. काही मोजकी अक्षरं तो प्रयत्नांती ओळखू शकत होता, पण बहुतांश मजकूर त्याच्या आकलनापलीकडचा होता.

पण त्या नकाशात एक गोष्ट होती जी नजरेतून सुटण्यासारखी नव्हती. गाभाऱ्याच्या अगदी खाली, नकाशाच्या मध्यभागी एक चौकोन काढलेला होता. रिकामा चौकोन. त्याला कोणत्याही प्रकारची मापं नव्हती, तिथे जाण्यासाठी दार किंवा

दुसरी कोणतीही खूण नव्हती. फक्त एक बंदिस्त चौकोन. आणि त्या चौकोनाच्या एका कडेला मोडी लिपीत काहीतरी लिहून ते अर्धवट पुसून टाकल्यासारखं वाटत होतं. त्यातला एक पुसटसा आकार त्याला जरा ओळखीचा वाटला, जणू तो "श" असावा, पण त्याची खात्री नव्हती. ते खरोखरच एखादं अक्षर होतं, की एखाद्या मोठ्या इशाऱ्याच्या चिन्हाचा तुटलेला भाग होता, हेही नक्की सांगता येत नव्हतं. बाकीचा भाग शाई उडाल्यामुळे दिसेनासा झाला होता. तो एकटा, अपुरा आकार तिथं त्या रिकाम्या चौकोनाशी चिकटून बसला होता, आणि त्या एका अक्षरानं निलयला खूप अस्वस्थ केलं. कारण अपुरी माहिती असणं, हे माहिती अजिबात नसण्यापेक्षा जास्त धोकादायक असतं. पण त्यानं त्या चिन्हाचा जास्त अर्थ लावायचा किंवा तर्क करायचा प्रयत्न केला नाही. अर्धवट पुराव्यांवरून काल्पनिक निष्कर्ष काढणं हे एका अभियंत्याचं काम नव्हतं. आधी ती प्रत्यक्ष जागा उघडायची, आणि मग काय ते स्वतःच्या डोळ्यांनी बघायचं, हे त्यानं ठरवलं.

सर्वांत खटकणारी गोष्ट म्हणजे, तो रिकामा चौकोन त्या जुन्या कागदानंतरच्या कुठल्याच नव्या नकाशात नव्हता. साठ वर्षांपूर्वी तयार केलेल्या नकाशात नाही, अलीकडच्या निविदांच्या कागदात नाही, किंवा ट्रस्टच्या कुठल्याही नोंदीत नाही. जसं काही तो चौकोन एकदा, फार पूर्वी कुणीतरी त्या जुन्या कागदावर काढला होता, आणि मग त्यानंतरच्या प्रत्येक पिढीनं तो आपल्या

कागदांमधून जाणीवपूर्वक गाळला होता. त्यांनी तो तिथून ओरबाडून काढला नव्हता. फक्त पुढच्या पानावर नेण्याचं टाळलं होतं. इतिहासातून एखादी नकोशी गोष्ट विसरून जाण्याची ही एक अत्यंत शांत, सावकाश आणि पद्धतशीर पद्धत असते. निलयला ती पद्धत जाणवली, पण त्यानं तिचा जास्त सखोल विचार करणं टाळलं.

"ओ.. निलय घाटे साहेब!"

एक ओळखीचा आवाज खालून आला, आणि निलय दचकून वळला. खाली प्रथमेश एका धुळीने माखलेल्या गाडीतून उतरत होता, हसत हसत हात हलवत आणि आपले पांढरे दात दाखवत. त्याला बघून निलयला खरोखरच बरं वाटलं. गेल्या काही आठवड्यांत या सरकारी प्रकल्पाच्या धावपळीत दोघांच्या भेटी कमी झाल्या होत्या, पण या अशा संपूर्णपणे अनोळखी आणि विचित्र वाटणाऱ्या गावात एक ओळखीचा आणि मैत्रीचा चेहरा बघून त्याला हायसं वाटलं.

"अरे तू आज पोचलास पण," निलय लगबगीने पायऱ्या उतरून खाली आला. "मला वाटलं उद्या निघशील नागपूरहून."

"आणि तुला एकट्याला सगळी मजा घेऊ देऊ? नो चान्स." प्रथमेशनं जवळ येत त्याच्या खांद्यावर एक मैत्रीपूर्ण थाप मारली, आणि मग वळून वर त्या अवाढव्य देवळाकडं बघितलं. मग त्यानं सभोवतीच्या गावाकडं पाहिलं, आणि त्याच्या शहरी चेहऱ्यावर

एक प्रकारचं तिरकं, किंचित उपहासात्मक कुतूहल उमटलं. "बाप रे. हे गाव आहे की काय आहे? येताना ना, रस्त्यावर दोन तासांत एकपण माणूस दिसला नाही. फक्त झाडं. आणि माकडं. आणि एक बोर्ड ज्याच्यावर लिहिलं होतं 'वाघ क्षेत्र, गाडी हळू चालवा.' वाघ, यार. आपण वाघाच्या घरात काम करायला आलोय."

"अतिशयोक्ती करू नको. वाघ इकडं नाही येत."

"तुला कसं माहीत? तू विचारलंस का वाघाला?" प्रथमेश नेहमीच्या सवयीने हसला, आणि त्यानं खिशातून आपला महागडा फोन काढला. आधी त्यानं त्या जुनाट देवळाचा एक वाइड-अँगल फोटो काढला. मग पूर्ण गावाचा. मग फोन स्वतःकडे फिरवून देवळाच्या काळ्या पार्श्वभूमीवर स्वतःचा एक सेल्फी घेतला. "डॉक्युमेंटेशन," तो डोळा मारत म्हणाला, जरी त्या दोघांनाही पक्कं माहीत होतं की तो फोटो काही वेळातच कुठल्यातरी सोशल मीडिया ॲपवर टाकला जाणार होता, ज्याच्या खाली "ऑन साईट" असं कॅप्शन सोबत गॉगल लावलेला कूल ईमोजी लिहिलेला असणार.

निलयला हे ऐकून हसू आलं, आणि बऱ्याच दिवसांनी असं मनमोकळं हसू आल्यामुळे त्याला बरं वाटलं. प्रथमेशचा स्वभावच तसा होता. तो जिथं कुठं जायचा, तिथली जड आणि गंभीर हवा आपल्या वागण्याने जरा हलकी करायचा. निलयला

प्रत्येक गोष्टीत गंभीर तर्क शोधून ती जड करायची सवय होती, तर प्रथमेशला गोष्टी वरवरच्या आणि हलक्या ठेवायची. आणि कदाचित याच परस्परविरोधी स्वभावामुळे त्यांची मैत्री इतकी वर्षं टिकून होती.

"बरं झालं तू आलास," निलय म्हणाला, आणि हे वाक्य त्याच्या अगदी मनातून आलं होतं. "एकट्यानं हे सगळं..."

"अरे बोलावलंस ना, आलो." प्रथमेश कॅज्युअलपणे खांदे उडवत म्हणाला. "आणि खरं सांगू? नागपुरात काम मंदावलंय सध्या. दोन प्रोजेक्ट लटकलेत. त्यामुळे तुझा फोन आला तेव्हा बरंच वाटलं." तो हसला खरा, पण त्याच्या त्या हसण्याखाली कुठेतरी एक अदृश्य खंत लपलेली होती, आणि निलयला ती बरोबर जाणवली. त्यांच्या कॉलेजच्या दिवसांतही असंच होतं. प्रथमेश तसा हुशार आणि मेहनती होता, पण नशिबानं आणि परिस्थितीने त्याला नेहमी निलयच्या मागे, दुसऱ्या रांगेत उभं ठेवलं होतं. निलयला नोकरी आधी लागली, बढतीही आधी मिळाली, आणि प्रथमेश नेहमी मागे राहिला. वरवर हसत, मोठ्या थापा मारत, पण नेहमी एक पाऊल मागे. आणि आज तो निलयच्याच प्रोजेक्टवर, निलयच्या हाताखाली एक कन्सल्टंट म्हणून काम करायला आला होता. हे वास्तव दोघांनाही पक्कं माहीत होतं, आणि दोघांनीही न बोलण्याच्या एका मूक करारावर जणू सह्या केल्या होत्या.

"चांगलं होईल हे काम," निलय विषय बदलत म्हणाला. "सरकारी आहे. वेळेवर पैसे मिळतील."

"पैसे मिळाले की झालं." प्रथमेशनं परत एकदा त्या शांत गावाकडं बघितलं, आणि त्याच्या चेहऱ्यावरचा तो तिरका कुतूहलाचा भाव पुन्हा आला. "बाकी हे गाव भारीच आहे यार. जिवंत म्युझियम असल्यासारखं."

"चल, तुला साईट दाखवतो," निलय म्हणाला. "आणि हो, एक गोष्ट. इथं गावात... थोडं जपून. जुनी माणसं आहेत, श्रद्धा आहे. देवळाचं काम आहे, तेव्हा जरा..."

"जरा रिस्पेक्ट. समजलं समजलं." प्रथमेशनं थोड्या नाटकीपणे हात जोडले. "मी काय बोलणार नाही. फक्त माझी मोजमाप घेणार, माती बघणार, आणि पैसे घेऊन सटकणार. देवाधर्माच्या भानगडीत मी पडत नाही. मला फक्त एक सांग, इथं नेटवर्क आहे का कुठं?"

"नाही."

हे ऐकताच प्रथमेशचा हसरा चेहरा पूर्णपणे पडला. "नाही? म्हणजे... अजिबात नाही?"

"देवळाच्या मागं, त्या दगडावर उभं राहिलं तर कधीकधी एक कांडी येते."

"एक कांडी." प्रथमेश देवळामागच्या त्या अदृश्य दगडाकडं बघत राहिला, जणू त्या दगडाचाच त्याला राग आला असावा. "यार. हे गाव मला मारणार."

नेमकं तेवढ्यात खालच्या वळणावरून मोठ्या आवाजात गाड्या येताना दिसल्या. दोन जीप धूळ उडवत पार्किंगमध्ये आल्या. पहिल्या गाडीतून एक जाडजूड, डोक्यावर मोजकेच केस असलेला माणूस खाली उतरला. अंगात इस्त्रीचा पांढरा शुभ्र सदरा, गळ्यात सोन्याची एक जाडजूड साखळी, आणि हातात मोबाईल. त्याच्यामागोमाग दुसऱ्या गाडीतून आणखी दोघं उतरले. निलयनं त्यांना याआधी पाहिलं नव्हतं, पण त्यांचा पेहराव आणि वागणूक बघून त्याला ते कोण असावेत याचा अचूक अंदाज आला.

"आमचे साहेब आले!" तो जाड माणूस गाडीतून उतरल्या उतरल्या लांबूनच ओरडला. त्याचे दोन्ही हात स्वागतासाठी पसरलेले होते, जसं काही निलय त्याचा वर्षानुवर्षांचा जुना जिवलग मित्र असावा. अगदी जवळ येऊन त्यानं निलयचा हात आपल्या दोन्ही घामाघूम हातांत घट्ट धरला आणि तो गदागदा हलवला. "बाळासाहेब देशमुख. सरपंच. तुमचीच वाट बघत होतो. या, या. घाटे गुरुजींचे चिरंजीव ना तुम्ही? व्वा. गावाचं नाव मोठं करून राहिले तुम्ही. असा विकास व्हायला पायजे. आपल्या निवाळीचं नाव पार मुंबई-दिल्ली परेंत जाईल आता, बघा तुम्ही."

"नमस्कार," निलय स्वतःचा हात सोडवण्याचा प्रयत्न करत म्हणाला. "मी फक्त तपासणी करायला..."

"तपासणी, डागडुजी, विकास, सगळं होऊ द्या." बाळासाहेबनं आपला हात हवेत उडवला, जणू हे सगळे तांत्रिक तपशील त्याच्यासाठी किरकोळ बाबी असाव्यात. "बघा साहेब, मी सरळ बोलतो. यात्रा आठ दिसांवर हाय. या यात्रेले जर आपण नवा रस्ता, नवा भक्तनिवास, सगळं दाखवू शकलो, तर पुढच्या वर्षी काय होईल माहितीय? दुप्पट गर्दी. तिप्पट. आमदारसाहेब स्वतः येणार उद्घाटनाले. म्हून काम भराभर व्हायले पायजे. जे करायचं ते या आठ दिसांत. यात्रा सुरू झाली की मंग काही नाई."

त्याच्या मागून चालत आलेला दुसरा माणूस आता पुढे आला. अंगाने बारीक, आणि त्याचे डोळे अतिशय तीक्ष्ण आणि शोधक होते. त्याच्या हातात एक जाड फाईल होती. "माधव कुलकर्णी," त्यानं हात न मिळवताच कोरडेपणाने स्वतःची ओळख करून दिली. "समिती सदस्य. हिशोब बघतो. साहेब, एक इचारायचं होतं. हे खोदकाम आन तपासणी, यात किती दिस जातील? कारन बजेट..."

"जेवढं नीट करायचं असेल तेवढे दिवस लागतील," निलय व्यावसायिक आणि थंड आवाजात म्हणाला.

कुलकर्णीच्या तीक्ष्ण चेहऱ्यावर एक क्षणभर काहीतरी आलं आणि लगेच गेलं. "हो, पन बघा, वेळ म्हंजे पैसा. रोजंदारीचे मजुर हाय. जास्त दिवस म्हंजे..." त्यानं हातातली ती फाईल दोन्ही हातांनी इतक्या घट्ट पकडली की निलयला त्याच्या हाताच्या पाठीवरच्या निळ्या नसा स्पष्टपणे ताणलेल्या दिसल्या. हा माणूस केवळ हिशोब ठेवणारा नव्हता, तर या प्रकल्पातून मिळणाऱ्या पैशावर त्याची कोणतीतरी वैयक्तिक निकड अवलंबून होती.

"आन साहेब, अजून एक," कुलकर्णी पुढे म्हणाला, आणि त्याने आपला आवाज थोडा खाली आणला, जणू तो एखादं मोठं गुपित उघड करत असावा. "हे जे गावातले जुने लोक हायेत ना, ते तुमाले धा गोष्टी सांगतील. इथं हात लावू नोका, तिथं खनू नोका, देवीचा कोप होईल. ते सगळं मनावर घेऊ नोका. अंधश्रद्धा हाय नुसती. मी सांगतो, गेली वीस वर्सं बघून राहिलो. जर या गोष्टीले भ्यायचं म्हटलं, तर गावात एक खिळाबी ठोकता येनार नाई. तुमी तुमचं इंजिनिअरिंग बघा, बाकीचं सोडा."

"मी विज्ञानावर चालतो, कुलकर्णी," निलय फारच ठामपणे म्हणाला. "श्रद्धा-अंधश्रद्धा माझ्या वहीमध्ये नाही."

"बरोबर! हेच!" बाळासाहेब मोठ्याने टाळी वाजवत हसला. त्याच्या हसण्यात एक राजकारणी बेगडीपणा होता. "हा नवा जमाना. हा विकास. गुरुजीचा जमाना गेला आता. आता

तुमच्यासारख्या शिकलेल्या पोराईचा जमाना. देव आपल्या जागी, विज्ञान आपल्या जागी. दोन्ही चालते की एकत्र, काय?"

निलयनं या वाक्यावर काहीही प्रतिक्रिया दिली नाही. त्याला "दोन्ही एकत्र चालतं" ही संकल्पनाच मुळात पटत नव्हती. एक गोष्ट खरी असेल तर दुसरी साहजिकच खोटी ठरते, आणि यात विज्ञान हेच अंतिम सत्य होतं, हे त्याच्या तार्किक मेंदूसाठी अगदी उघड होतं. पण ही वेळ आणि जागा असल्या तात्त्विक चर्चा करण्याची नव्हती, म्हणून तो गप्प राहिला.

"आन साहेब, एक इनंती," बाळासाहेब आता जरा पुढे झुकत म्हणाला, आणि त्याच्या आवाजातील आधीचा उत्साह जाऊन तिथे निव्वळ व्यवहार आला होता. "तुमी आधी बाहेरचं काम हातात घ्या. रस्ता, भक्तनिवासाचा पाया, सभामंडपाची डागडुजी. कारन बघा, यात्रेले जे भाविक येणार, त्यांले हे दिसलं पायजे. विकास दिसला पायजे, नुसता कागदावर नोको. देवळाच्या आतलं, खालचं, ते कुनाले दिसते? ते नंतर करा. आधी जे दिसते ते."

आणि निलयला बाळासाहेबांचं हे म्हणणं तर्कशुद्ध वाटलं, जरी त्यात त्याचा स्वतःचा नाइलाज होता. बाळासाहेबांचं ते मतलबी राजकारण त्याला आवडलं नव्हतं, पण त्यांचा कामाचा मुद्दा मात्र बरोबर होता. गर्दी वाढण्याआधी बाहेरची कामं उरकून घेणं हेच जास्त व्यवहार्य होतं. त्यानं मनातल्या मनात

वेळापत्रकाचा पुन्हा एकदा हिशोब केला. बाहेरची मापं घेणं, पाया खणणं, आणि प्राथमिक डागडुजी करणं, या सगळ्याला जास्तीत जास्त दोन-तीन दिवस लागतील. मग, यात्रेच्या चार-पाच दिवस आधी, जेव्हा गर्दी सुरू व्हायची असेल, तेव्हा गाभाऱ्याखालची ती अज्ञात जागा शांततेत उघडून तिची सविस्तर तपासणी करता येईल. तिथे कुठलीही घाई करून चालणार नव्हतं. ते काम नाजूक होतं, ते बांधकाम शतकानुशतकं जुनं होतं, आणि ते असं उरकून टाकण्यासारखं नव्हतंच.

"ठीक आहे," तो म्हणाला. "आधी बाहेरचं. रस्ता आणि भक्तनिवास. दोन-तीन दिवस लागतील. मग आतलं बघू."

हे ऐकताच कुलकर्णीच्या ताणलेल्या चेहऱ्यावर समाधानाची एक पुसटशी रेष उमटली. आणि बाळासाहेब तर उघडपणे खूश झाला.

"कुलकर्णी," बाळासाहेब कुलकर्णीकडे बघून हसत म्हणाला, पण त्या हसण्याखाली एका मालकाची स्पष्ट धार होती. "साहेबांना त्यांचं काम करू द्या. पैसा येईल. विकास झाला की पैसाच पैसा. काय?" तो परत निलयकडं वळला आणि म्हणाला, "तुम्ही सांगा, काय लागेल. मजूर आणलेत, दहा जण. मुकादम चांगला आहे, रघू. इथलाच आहे, कामाचा माणूस. काय लागेल ते त्याला सांगा."

त्यांच्या गर्दीतून रघू पुढे आला. साधारण चाळिशीचा, उन्हातान्हात काम करून रापलेला चेहरा, पण त्याच्या डोळ्यांत एक प्रकारचा सच्चा मोकळेपणा होता, आणि तोंडावर एक खूप सहज असं हसू होतं. त्यानं जवळ येऊन निलयला हात जोडले. "राम राम साहेब. कुठून सुरू करू, सांगा."

आणि निलयला तो मुकादम बघताक्षणीच लगेच आवडला. जगात काही मोजकी माणसं अशी असतात, ज्यांच्याकडे बघताक्षणीच त्यांच्यावर विश्वास ठेवायला मन तयार होतं. रघूच्या त्या रापलेल्या हसण्यात कसलाही बेगडीपणा किंवा ढोंग नव्हतं.

"तुझी माणसं कुठं हायेत?" निलयनं चौकशी केली, आणि तो प्रश्न विचारल्यावरच त्याच्या लक्षात आलं की त्याच्या स्वतःच्या तोंडून "हायेत" हा अस्सल वऱ्हाडी शब्द अगदी आपोआप बाहेर पडला होता. तब्बल तेरा वर्षांनंतर. जसं काही या गावानं त्याची मूळ जीभ पुन्हा एकदा आपल्याकडे ओढून घेतली होती.

"येऊन राहिले साहेब, आवरून. सकाळी पोराईले शाळेत सोडाले लागते ना, म्हून जरा उशीर." रघू हसला. "धाकटा हट्ट करते, बाबा सोड म्हून. मंग जावंच लागते." त्यानं आपले खांदे उडवले. त्याच्या त्या वाक्यात वरवर तक्रार असली तरी, मुलांबद्दलचं एक अथांग समाधान लपलेलं होतं. "म्हून तर हे काम बरं पडलं. जवळचं हाय, घरी जाता येते रोज."

निलयनं शांतपणे मान हलवली, आणि तो पुढच्या कामाकडं वळला. रघूसारखी सरळमार्गी माणसं त्याला नेहमीच बरी वाटायची. ज्यांच्या मनात कोणताही गुंता नसतो, अशी साधी माणसं.

"आधी मापं घेऊ," निलय कामाचा आदेश देत म्हणाला. "पूर्ण देवळाची. मग पाया कुठवर आहे बघू. आणि..." तो बोलता बोलता क्षणभर थांबला. त्याच्या डोळ्यांसमोर त्या जुन्या मोडी नकाशातला तो रिकामा चौकोन तरळला. "गाभाऱ्याच्या खाली काही आहे का, ते बघायचंय. जुनी टाकी, भुयार, काहीही. जुन्या नकाशात एक जागा दिसतेय, पण खूण नाही."

हे वाक्य ऐकताच रघूच्या चेहऱ्यावरचं ते मोकळं हसू एका क्षणासाठी थांबलं. फक्त एकच क्षण. "खाली?" तो थोडा अडखळत म्हणाला. "गाभाऱ्याच्या खाली, साहेब?"

"हो. का?"

"काई नाई साहेब." तो परत एकदा हसला, पण आता त्याचं ते हसू आधीसारखं मोकळं आणि निर्धास्त नव्हतं. "म्हंजे... जुनी मानसं म्हन्तेत, गाभाऱ्याखाली हात लावाचा नाई. देवीची जागा हाय म्हने. पन ते... तुमाले माहीतच असंल, तुमी गुरुजीचे..."

"मला माहीत आहे काय म्हणतात," निलय त्याला मध्येच तोडत म्हणाला. त्याचा आवाज आता जरा जास्तच कोरडा आणि

प्रोफेशनल झाला होता. "पण मला काम करायचंय. तू घाबरू नको. जबाबदारी माझी."

रघूनं होकार देत मान हलवली, पण त्याच्या डोळ्यांत अजूनही काहीतरी शंकेची सावली उरलेलीच होतं.

नेमकं तेवढ्यात निलयला जाणवलं की गर्दीतून कुणीतरी त्याच्याकडं एकटक बघतंय. मांडवाच्या त्या बांबूंच्या मागे एक तरुण पोरगा उभा होता. साधारण एकोणीस-वीस वर्षांचा. अंगात आधुनिक जीन्स आणि टी-शर्ट, हातात स्मार्टफोन, आणि तो निलयकडं अशा चमकणाऱ्या नजरेनं बघत होता जशी एखादी व्यक्ती एखाद्या मोठ्या सेलिब्रिटीकडं बघते. निलयची नजर आपल्यावर पडताच तो जरा बुजत, पण तितक्याच उत्सुकतेने पुढे आला.

"तुमी निलय घाटे ना? नागपूरले इंजिनिअर हायेत?" त्यानं विचारलं. "मी स्वप्नील. इथंच राहतो. मी बी इंजिनिअरिंगले ॲडमिशन घेणार हाय, नेक्स्ट इयर. अमरावतीले."

"चांगलं आहे," निलय प्रोत्साहन देत म्हणाला.

"तुमी कसे गेले बाहेर? म्हंजे... इथून निघून? मले बी जायचंय, पन घरचे..." तो बोलता बोलता मध्येच थांबला, आणि आजूबाजूला पाहून मग जरा हळू आवाजात म्हणाला, "इथं काई नाई ना, साहेब. हे सगळं जुनं. देऊळ, यात्रा, तीच ती अंधश्रद्धा. मले लय कंटाळा येते."

आणि ते ऐकून निलयला एक अत्यंत विचित्र गोष्ट जाणवली. या पोराच्या डोळ्यांत आणि संवादात त्याला स्वतःचंच हुबेहूब रूप दिसत होतं. बरोबर वीस वर्षांपूर्वीचा निलय. तीच इथून पळून जाण्याची घाई, इथल्या वातावरणाचा तोच आलेला कंटाळा, आणि बाहेरच्या जगाची तीच तीव्र ओढ. त्याला या पोराला काहीतरी समजून सांगायचं होतं, पण नेमके कोणते शब्द वापरावेत ते त्याला सुचेना, म्हणून तो केवळ एका कोरड्या सल्ल्यावर थांबला, "अभ्यास कर. बाकीचं आपोआप होईल."

आणि नेमकं तेव्हाच ती सगळी गर्दी आणि त्यांचा गजबजाट अचानक शांत झाला. कुणाच्या तरी आगमनाने ती शांतता पसरली होती, आणि निलयला वळून न बघताच कळलं की वडील आले होते.

प्रकाश घाटे देवळाच्या मुख्य पायऱ्यांवर येऊन उभे राहिले होते. अगदी एकटे. अंगावर पांढरं स्वच्छ धोतर, उघडं अंग, आणि कपाळावर गंधाचा ठळक टिळा. ते कुणाशीही काहीच बोलले नाहीत. त्यांनी सरपंच बाळासाहेबांकडं बघितलं नाही, हिशोबनीस कुलकर्णीकडं पाहिलं नाही, आणि स्वतःच्या मुलाकडं, निलयकडंही त्यांनी नीट नजर टाकली नाही. ते फक्त पायऱ्यांवरून त्या सगळ्या भौतिक गडबडीकडं, त्या बांबू, तारा, मोजमापाच्या टेप आणि मजुरांच्या गर्दीकडं मूकपणे बघत होते. आणि त्यांच्या चेहऱ्यावर कोणतीही भावना नव्हती. संताप नाही,

की आनंद नाही. आणि त्यांच्या चेहऱ्यावरची ती शून्यताच इतर कोणत्याही प्रतिक्रियेपेक्षा जास्त भयंकर होती.

बाळासाहेब लगबगीनं हात जोडत त्यांच्या दिशेने गेला. "गुरुजी! या या. बघा, तुमच्या पोरानं गावाचं नाव कसं मोठं केलं. आता आपलं देऊळ एकदम फर्स्ट क्लास होणार."

प्रकाश गुरुजींनी आपली शांत नजर बाळासाहेबांकडे वळवली. "फर्स्ट क्लास," ते म्हणाले. सावकाश, जणू ते तो इंग्रजी शब्द पहिल्यांदाच उच्चारत असावेत आणि त्याची चव घेऊन पाहत असावेत. "हं."

आणि बस. एवढंच. ते तिथून वळले, आणि पुन्हा गाभाऱ्यात आत जायला निघाले. ते आत जात असतानाच वासुदेव त्यांच्या जवळ आला. तो देवळाचा जोडपुजारी होता. प्रकाश गुरुजींनी जाता जाता वासुदेवच्या कानात काहीतरी सांगितलं. अगदी हळू आवाजात. फक्त दोन-तीन शब्द. निलय तिथून जरा लांब उभा होता, त्यामुळे त्याला ते शब्द ऐकू आले नाहीत. पण त्यानं वासुदेवच्या चेहऱ्यावर उमटलेली प्रतिक्रिया मात्र स्पष्ट बघितली. ते शब्द ऐकताच वासुदेवचा चेहरा कागदासारखा पांढरा फटक पडला. त्यानं घाबरून प्रकाश गुरुजींकडं बघितलं, त्याला काहीतरी विचारायचं होतं, पण प्रकाश गुरुजी तोवर अंधाऱ्या गाभाऱ्यात निघून गेले होते.

वासुदेव तिथंच पायऱ्यांवर खिळल्यासारखा उभा राहिला. त्याचे हात एकमेकांवर भीतीने चोळले जात होते. मग त्यानं खाली उभ्या असलेल्या निलयकडं बघितलं, आणि त्याची नजर भिडताच लगेच चोरटेपणाने वळवली. तो निलयला काहीतरी सांगण्यासाठी पायऱ्या उतरून खाली आला, त्यानं दोन पावलं पुढे टाकली, आणि तो अचानक थांबला. त्याच्या चेहऱ्यावर जी भीती दिसत होती, ती नवी नव्हती. ती भीती त्या मातीइतकीच जुनी होती. आजीबाईंच्या जुन्या कहाण्यांतली, देवीच्या कोपाची, आणि शापाची ती प्राचीन भीती होती. जणू त्याला आत्ताच असं काहीतरी भयंकर गुपित समजलं होतं ज्यामुळे लवकरच या गावावर मोठं संकट कोसळेल, रोगराई पसरेल, किंवा देवी कायमची रुसेल. त्यानं काहीतरी बोलण्यासाठी तोंड उघडलं, पण शब्द बाहेर येण्याआधीच ते बंद केलं. आणि शेवटी तो अतिशय थरथरत्या आवाजात एवढंच म्हणाला, "साहेब... जपून करा काम. देवीचं काम हाय. तिले डिवचू नोका. एवढंच." आणि असं बोलून तो मागचा पुढचा विचार न करता घाईघाईनं तिथून निघून गेला, वडिलांच्या मागोमाग, आतल्या गाभाऱ्यात.

निलयनं ते सगळं दृश्य अतिशय बारकाईने बघितलं. आणि त्याच्या तार्किक मनात एक बारीक, पण बोचरी अस्वस्थता निर्माण झाली. दोन माणसं. एक जण कानात फक्त दोन शब्द कुजबुजतो, आणि तो ऐकणारा दुसरा माणूस भीतीने पांढरा पडतो. यामागे नक्कीच काहीतरी असं होतं जे त्या दोघांना पक्कं

माहीत होतं, पण निलयला नाही. पण मग त्यानं स्वतःचीच ती अस्वस्थता तर्काच्या कसोटीवर तपासली, आणि नेहमीप्रमाणे त्याला एक सोयीस्कर उत्तर मिळालं. वडिलांनी त्या पोरगेल्या पुजाऱ्याला नक्कीच काहीतरी जुनी भीती घातली असणार, देवीच्या कोपाची, किंवा महामारीची. खेड्यापाड्यात अशा अंधश्रद्धेच्या गोष्टी पिढ्यानपिढ्या चालत येतात, आणि माणूस त्यावर आंधळेपणाने विश्वास ठेवतो कारण त्याच्या आजोबांनीही ठेवलेला असतो. निलयनं तोच विचार घट्ट धरून ठेवला, कारण तोच विचार त्याला त्याच्या विज्ञानाच्या जगात सुरक्षित वाटत होता.

"साहेब?" रघूचा आवाज आला. "उद्या कुठून सुरू करायचं?"

निलयनं पुन्हा एकदा त्या उन्हात तापणाऱ्या प्राचीन देवळाकडं बघितलं. जुनं, काळं, आणि नुसतं दगडांचं. मग त्याची नजर गाभाऱ्याच्या मागच्या बाजूकडं गेली, जिथं जमिनीची फरशी जरा उंचवट्यावर होती. नेमकी तीच जागा, जिथं त्या जुन्या मोडी नकाशातला तो बंद आणि रिकामा चौकोन होता. ते गूढ काम त्याला खुणावत होतं. तो पुसटसा "श", तो "अज्ञात" शब्द त्याला आव्हान देत होता. पण तरीही, घाई करून चालणार नव्हतं.

"उद्या बाहेरचं," तो फारच शांतपणे म्हणाला. "रस्त्याची आखणी, भक्तनिवासाचा पाया. सभामंडपाची डागडुजी. तीन दिवस बाहेरचं उरकू. मग," त्यानं डोळ्यांनीच गाभाऱ्याकडं खूण केली, "मग आतलं. खालची ती जागा. यात्रेच्या आधी, शांततेत."

हे ऐकल्यावर रघूनं मान हलवली, आणि त्याच्या रापलेल्या चेहऱ्यावर जसं काही सुटकेचा निश्वास टाकल्यासारखा भाव आला. जणू "आतलं" काम काही दिवसांसाठी लांबल्यानं त्याच्या जिवात जीव आला होता. "बरं साहेब. बाहेरचं आधी. चांगलं." त्यानं देवळाकडं, आणि विशेषतः गाभाऱ्याच्या मागच्या दिशेनं पुन्हा एकदा बघितलं, आणि त्याच्या हसऱ्या चेहऱ्यावर आता हसू मुळीच उरलं नव्हतं. तो पुन्हा काहीतरी बोलण्यासाठी धडपडत होता, पण तो बोलला नाही. फक्त गाभाऱ्याच्या दिशेनं शेवटचं एकदा बघून त्यानं आपली मान झटकन वळवली, आणि हातातली लोखंडी कुदळ आपल्या खांद्यावर टाकून तो मजुरांच्या दिशेने निघून गेला.

दूर, आवाराच्या त्या अंधाऱ्या कोपऱ्यात, दगडावर, ती म्हातारी गजराबाई अजूनही बसलेली होती. आणि ती परत तेच घोकत होती. तीच चाल, तेच शब्द. आणि आता, दिवसाच्या या प्रखर उजेडात आणि इतक्या माणसांच्या गजबजाटातही, तिचा तो बारीक पण सतत चालणारा आवाज निलयच्या कानावर

स्पष्टपणे आदळत होता. निलयला एका क्षणासाठी असं वाटून गेलं की ती आज नेहमीपेक्षा जरा जास्तच जोरात ओवी म्हणत होती, जणू तिला कशाची तरी प्रचंड घाई असावी, जसं काही आता वेळ खूप वेगाने संपत चालल्याचं तिला मनोमन आधीच कळत असावं.

पण मग लगेचच त्यानं ठरवलं की तसं काहीही नव्हतं, हे फक्त त्याचे स्वतःचे विचार होते. त्यानं डोक्यातला तो विचार तिथेच थांबवला, हातातली नोंदवही उघडली आणि त्यात पुढची तांत्रिक नोंद लिहायला सुरुवात केली.

* * *

प्रकरण तीन : शिळा

शिळा जागवी माये ।

सखू देवळाचा परिसर झाडत होती. तिच्या झाडूचा जमिनीवर घासताना होणारा तो खरखरीत, एकसुरी आवाज संपूर्ण आवारात घुमत होता, आणि त्या आवाजाच्या तालावर ती स्वतःशीच काहीतरी पुटपुटत होती. निलय तिथून जवळच असल्याने तिची ती बडबड त्याच्या कानावर स्पष्ट पडत होती.

हा प्रकल्पाचा तिसरा दिवस होता. तो गाभाऱ्याच्या मागच्या बाजूला असलेल्या भिंतीची अचूक मापं आपल्या वहीत नोंदवत होता. देवळाच्या बाहेरचं नियोजित काम आता बऱ्यापैकी आटपत आलं होतं. नव्या रस्त्याची आखणी पूर्ण झाली होती, भक्तनिवासाच्या पायाचे खड्डे खणून तयार होते आणि सभामंडपाचे जीर्ण झालेले लाकडी खांबही बदलले गेले होते. या वेगाने होणाऱ्या कामामुळे सरपंच बाळासाहेब कमालीचा खूश होता, तर हिशोबनीस कुलकर्णीच्या चेहऱ्यावरची आर्थिक अस्वस्थता आता जरा कमी झालेली दिसत होती. या सगळ्यानंतर निलयला आता फक्त ती एकच शेवटची जागा तपासायची उरली होती. गाभाऱ्याच्या अगदी खालची ती अज्ञात जागा. उद्या.

सखू साधारण साठीकडं झुकलेली बाई होती. ती वाकलेली नसली, तरी तिच्या शरीरावर वर्षांच्या कष्टाचा खोल थकवा स्पष्ट दिसत होता. तिच्या हातात तीच जुनी शिंदीची झाडू होती. ती रोज न चुकता सकाळी यायची आणि गाभारा, सभामंडप, प्रदक्षिणा-मार्ग स्वच्छ झाडून काढायची. आणि हे करत असताना ती गावातील जुन्या कहाण्या, दंतकथा आणि गॉसिप स्वतःशीच घोळवत राहायची. कुणी तिचं ऐकत असो वा नसो, तिचा तो क्रम कधीच मोडत नसे.

"तुमी गुरुजीचे पोरगे ना," ती हातातला झाडू न थांबवताच अचानक निलयच्या दिशेने बघत म्हणाली. "लहानपणी बगितलंय तुमाले. एवढुसे व्हता. आता केवढे मोठे झाले." ती दात पडलेल्या हिरड्या दाखवत मनमोकळी हसली. "काळ जाते बाप्पा. कसा जाते कळतच नाई."

"तुम्ही तेव्हापासून इथंच?" निलयनं हातातील मापं वहीत लिहीत कोरडेपणाने विचारलं.

"जल्मापासून साहेब. या देवळात झाडू फिरवते साठ वर्सं झाले. माय झाडायची, तिच्या आधी तिची माय." ती एका क्षणासाठी थांबली, कंबरेवर हात ठेवून ती सरळ उभी राहिली, आणि पाठ मोडल्यासारखी वेदनेने हलकेच कण्हली. "आमी असे. देऊळ आमचं, आमी देवळाचे. बाकी गावाले आमची किंमत नाई, पन देवीले हाय." तिनं गाभाऱ्याच्या दिशेने अतिशय

आदराने मान झुकवली. "रोज सकाळी येते, झाडते, दिवा लावते, आन जाते. साठ वर्सं झाले. एक दिस चुकले नाई. आजारी व्हते तरी आले. का, माहीत नाई. नुसतं येते. सवय झाली हाये."

निलयनं काही न बोलता फक्त मान हलवली, आणि तो परत आपल्या मोजमापाच्या कामाकडं वळला. *सवय*, त्यानं स्वतःच्याच मनात तो शब्द घोळवला. या संपूर्ण गावातले लोक केवळ सवयीनं काहीतरी करत सुटले होते, आणि त्यातल्या कुणालाच आपण ते 'का' करतोय याचं साधं लॉजिकही माहीत नव्हतं. त्याचे वडील पिढ्यानपिढ्या डोळे मिटून अभिषेक करत होते, ही बाई रोज न चुकता झाडू मारत होती, ती म्हातारी गजराबाई रात्रंदिवस ती ओवी घोकत होती. हे सगळं आंधळेपणाचं होतं. शतकानुशतकांचं एक अर्थहीन ओझं हे लोक कोणताही प्रश्न न विचारता नुसतंच स्वतःच्या खांद्यावर वागवत होते.

पण सखूचं बोलणं थांबलं नव्हतं. तिची बडबड सुरूच होती, फक्त आता तिचा आवाज जरासा खाली आला होता, दबका झाला होता, जणू ती असं काहीतरी बोलत होती जे इतर कुणाला ऐकू जायला नको होतं.

"पन तुमी खाली खोदणार म्हने. गाभाऱ्याखाली." तिनं आपली झाडू जमिनीवर टेकवून ठेवली. "जपून करा बाप्पा. ती जागा... तिच्याबद्दल बोलत नाईत लोक. फार जुनी गोष्ट हाय.

आमच्या आजीची आजी सांगायची." ती चालत त्याच्या अगदी जवळ आली, आणि तिचा आवाज आता एका कुजबुजीत बदलला. "एक व्हता म्हने, फार पूर्वी, इथलाच कोनीतरी. त्याले खाली काईतरी दिसलं व्हतं. अन मंग तो रानातल्या लोकाईसंगं भटकाया लागला, दिवसरात्र. गावानं त्याले येडा ठरवला." ती एखादी विस्मरणात गेलेली गोष्ट आठवायचा प्रयत्न करत थांबली. "कोन व्हता, काय झालं, नीट माहीत नाई बाप्पा. लय जुनी गोष्ट. आमच्या आजीलेबी नीट ठाऊक नव्हतं. नुसतं एवढंच सांगायची... खाली बगू नोका."

निलयच्या हातातलं मोजमाप लिहिणारं पेन कागदावरच अचानक थांबलं. फक्त एका क्षणासाठी.

खाली काहीतरी दिसलं. रानातल्या आदिवासी लोकांसोबत भटकायला लागला. गावानं वेडा ठरवला. सखूचे हे शब्द ऐकताच आदल्या रात्री त्यानं पाहिलेल्या जुन्या मोडी नकाशातला तो रिकामा आणि अर्धवट आकार, तो एकटाच पुसटसा उरलेला "श", त्याच्या मेंदूत पुन्हा एकदा नकळत चमकून गेला. पण पुढच्याच सेकंदाला त्याच्या इंजिनिअरिंगच्या मेंदूने तो विचार फेटाळून बाजूला ढकलून दिला. योगायोग. सगळा निव्वळ योगायोग. प्रत्येक खेड्यात अशा शेकडो दंतकथा पसरलेल्या असतात, प्रत्येक जुन्या घराण्याबद्दल असा एखादा वेडा पूर्वज असतोच, एखादा जुना शाप असतो, एखादं दडपलेलं गुपित

असतं. असल्या कपोलकल्पित कथांमध्ये तथ्य शोधणं म्हणजे निव्वळ मूर्खपणा होता.

"कोण होता तो? कधीचा?" स्वतःच्या तार्किक मनावर ताबा मिळवण्याचा प्रयत्न करूनही, तो प्रश्न ओठांवर येण्यापासून त्याला स्वतःला थांबवता आलं नाही.

"सांगितलं ना बाप्पा, माहीत नाई." सखूनं आपली झाडू पुन्हा हातात उचलली. "पन ती येडी गजरा हाय ना, आवारातली, तिले इचारा. जुन्या गोष्टी तिले ठाऊक असतात. तिच्या घराण्यात ते चालत आलंय म्हने." सखूनं आपला आवाज आणखी खाली आणला, आणि तिच्या थकलेल्या चेहऱ्यावर आता एक वेगळाच भाव आला होता. तो भाव निव्वळ दयेचा नव्हता, तर त्यात एक प्रकारची प्राचीन भीतीही मिसळलेली होती. "पन गजराले कोनी हाकलत नाई बरं का साहेब. कितीबी येडी असली तरी. देवाच्या दारातली माय ती. तिले हाकललं तर देवी कोपते म्हने. म्हून ठेवतात तिले. घाबरून."

आणि सखू पुन्हा स्वतःच्या लयीत झाडायला लागली. ती स्वतःशीच पुटपुटत पुढे निघून गेली, जणू काही मघाशी ती एवढं भयंकर आणि गुढ काहीतरी बोललीच नव्हती.

निलयनं उरलेली मापं आपल्या वहीत नोंदवली खरी, पण त्याचं मन आता त्या आकड्यांमध्ये अजिबात उरलं नव्हतं. दूर, आवाराच्या एका अंधाऱ्या कोपऱ्यात, ती म्हातारी गजराबाई

नेहमीप्रमाणेच त्या दगडावर बसली होती. पण आजची गोष्ट वेगळी होती. आज ती तिची ती भणभण करणारी ओवी म्हणत नव्हती. ती नुसतीच एका जागी खिळून बसली होती, आणि तिचे ते स्वच्छ, वेध घेणारे डोळे थेट गाभाऱ्याच्या दिशेने लागून राहिले होते. तिला बघून निलयला असं तीव्रपणे वाटून गेलं की ती कसलीतरी वाट बघतेय. पण ती कशाची वाट बघतेय, हे त्याला माहीत नव्हतं आणि कदाचित माहीत करून घ्यायचंही नव्हतं.

सखूच्या त्या दंतकथेने आणि नकाशातल्या त्या "श" अक्षराने निलयच्या तार्किक मनात तरीही एक सूक्ष्म अस्वस्थता निर्माण केली होती. अर्धवट पुराव्यावरून निष्कर्ष काढणं हे एका अभियंत्याचं काम नव्हतं. पण देवळाच्या पायाखालची ती खूप नाजूक आणि जुनी जागा उघडण्यापूर्वी तांत्रिक सुरक्षेसाठी एकदा तरी चौकशी करणं भाग होतं. तो स्वतःच्या वडिलांना टाळत असला, तरी इंजिनिअरिंगचा प्रोटोकॉल म्हणून त्यानं त्याच दिवशी संध्याकाळी प्रकाश गुरुजींना गाठलं.

"बाबा, गाभाऱ्याखाली जुनी पाण्याची टाकी वगैरे आहे का?" त्यानं थेट विचारलं.

प्रकाश गुरुजींनी आपल्या शांत आणि स्थिर नजरेनं त्याच्याकडं बघितलं. "तिथं काही नाई. देवळाचा पाया आहे नुसता. तिकडं जायची गरज नाई," ते अत्यंत संथ आणि कोरडेपणाने म्हणाले. बापाचा तो स्पष्ट नकार आणि डोळ्यांतली

लपवाछपवी निलयच्या इंजिनिअरिंगच्या उत्सुकतेला अधिकच खतपाणी घालून गेली. आता ती जागा स्वतः उघडून बघण्याशिवाय दुसरा कोणताच पर्याय त्याच्यासमोर उरला नव्हता.

दुसऱ्या दिवशी सकाळी ठरल्याप्रमाणे ते सगळे त्या शिळेपाशी येऊन उभे राहिले.

गाभाऱ्याच्या अगदी मागच्या बाजूला असलेली ती उंचवट्याची फरशी उचलल्यावर, त्याखाली एका अंधारात उतरणाऱ्या दगडी पायऱ्या लागल्या. त्या पायऱ्या अतिशय अरुंद आणि शतकांच्या वापराने झिजून गुळगुळीत झालेल्या होत्या. निलय एका हातात प्रखर उजेड देणारी टॉर्च घेऊन सर्वांत पुढे उतरत होता. त्याच्या मागे रघू मुकादम आणि त्याचे दोन मजूर होते, आणि सर्वांत मागे आपल्या तांत्रिक उपकरणांची जड बॅग खांद्याला अडकवून प्रथमेश खाली येत होता.

"बाप रे," प्रथमेश त्या अंधाऱ्या आणि खोल बोगद्याकडं बघत म्हणाला. "हे तर पार खाली जातंय. किती जुनं असेल?"

"बघू," निलय कोरडेपणाने म्हणाला.

त्या झिजलेल्या पायऱ्या जिथं संपल्या, तिथं एक छोटीशी दगडी खोली लागली. त्या खोलीची उंची इतकी कमी होती की एका सामान्य माणसालाही तिथे मान वाकवूनच उभं राहावं लागत होतं. आणि त्या कोंदट खोलीच्या अगदी मध्यभागी,

जमिनीच्या पातळीवर एक अवाढव्य शिळा बसवलेली होती. ती शिळा पूर्णतः गोल, सपाट आणि काळ्याकुट्ट पाषाणाची होती. तिच्या पृष्ठभागावर काहीतरी नक्षी किंवा मजकूर कोरलेला होता, पण वेळेच्या ओघात तो इतका झिजून गेला होता की आता फक्त काही पुसटशा रेषाच शिल्लक उरल्या होत्या. निलयनं आपल्या हातातील टॉर्चचा उजेड तिच्यावरून फिरवला. त्या रेषांना सध्या तरी कोणताही अर्थ लावणं शक्य होत नव्हतं.

नेमकं त्याच वेळी, छताकडं नजर गेल्यावर निलयला ते दिसलं. त्या दगडी खोलीच्या छताला, बरोबर त्या काळ्या शिळेच्या मध्यभागाच्या वर, एक अरुंद झरोका होता. तो झरोका जाड दगडातून थेट वरच्या दिशेने कोरलेला होता. निलयच्या इंजिनिअरिंगच्या मेंदूने तात्काळ त्या वास्तुरचनेचा अचूक अंदाज बांधला. तो झरोका थेट वरच्या गाभाऱ्याच्या जमिनीत उघडत असावा, मूर्तीच्या पाठीमागे कुठेतरी. आणि मग त्याला त्यामागचं संपूर्ण शास्त्र लख्ख उमगलं. रोजचा अभिषेक. त्याचे वडील वर गाभाऱ्यात मूर्तीवर पाणी सोडायचे, आणि ते पाणी मूर्तीवरून वाहत येऊन या झरोक्यातून थेट खाली, या जमिनीवरच्या शिळेवर पडायचं आणि तिथून खाली कुठेतरी जायचं. वर्षानुवर्षं. दशकानुदशके. तो पुजारी स्वतः कधीच खाली या अंधारात उतरत नसे, त्यानं हे दृश्य कधी स्वतःच्या डोळ्यांनी बघितलंही नसेल. तो फक्त श्रद्धेने वरून पाणी सोडायचा, आणि ते पाणी इथं खाली, या घनदाट अंधारात, या काळ्या दगडावर सतत पडत

राहायचं. आणि कुणालाच या दगडाच्या खाली नक्की काय आहे, हे माहीत नसायचं.

"हा झरोका," निलय स्वतःशीच कुजबुजल्यासारखा म्हणाला. "म्हणून अभिषेकाचं पाणी थेट खाली येतं. वर सोडलं की इथं पडतं."

आणि त्या अवाढव्य शिळेच्या कडेला, जमिनीलगत एक बारीकशी फट होती. आणि त्या अरुंद फटीतून तो वास वर येत होता. तोच वास. अतिशय ओला. शतकांइतका जुना. तो वास देवळाच्या दगडांचा होता, पण त्याहीखाली त्यात आणखी काहीतरी मिसळलेलं होतं. काहीतरी गोडसर, एखाद्या कुजलेल्या फळासारखं पण कुजकंही नाही, असा एक विचित्र वास जो निलयनं याआधी आयुष्यात कधीच घेतला नव्हता. पण तरीही, त्याच्या आकलनापलीकडच्या एका अज्ञात पातळीवर त्याला तो वास ओळखीचा वाटत होता. जणू तो वास मानवी स्मृतीच्याही आधीपासून तिथे अस्तित्वात होता.

"खालून पाणी येतंय वाटतं," रघू फटीजवळ नाक नेऊन वास घेत म्हणाला, आणि आता त्याच्या आवाजात नेहमीचा तो मोकळा उत्साह उरलेला नव्हता. "बारव असंल खाली साहेब. जुनी बारव. म्हनूनच शिळा बसवली असंल, झाकाया."

"शक्य आहे," निलय म्हणाला. आणि त्याला रघूचं ते म्हणणं अतिशय तर्कशुद्ध वाटलं. या डोंगराळ भागात पाणी तसं दुर्मीळ

होतं, आणि जिथं कुठं एखादा बारमाही झरा सापडेल तिथं देऊळ बांधण्याची जुनी प्रथा होती. या देवळाचा मूळ झरा याच शिळेखाली असणार, आणि शतकांपूर्वी कुणीतरी तो झरा झाकून ठेवला असेल आणि त्यावर हे देऊळ बांधलं असेल. "उचलायची आहे ही शिळा. रघू, माणसं लाव. आणि जपून. खाली पाणी असेल तर पडायला नको कुणी."

रघूची पावलं जागीच थबकली. "साहेब..."

"काय?"

"खरंच उचलायची?" तो त्या काळ्या शिळेकडं संशयाने आणि किंचित भीतीने बघत होता. आणि त्याच्या रापलेल्या चेहऱ्यावर तीच जुनी, अनामिक भीती पुन्हा एकदा दाटून आली होती. "म्हंजे... गुरुजी काय म्हन्तील? आन गाव?"

"गुरुजींशी मी बोलतो. आणि गाव काही म्हणणार नाही, कारण गावाला यात्रेत भक्तनिवास हवाय आणि रस्ता हवाय आणि तो सोबत येणार पैसा हवाय. ही नुसती जुनी बारव आहे, रघू. आत काही देवी बसलेली नाही. चल, कामाला लाग."

रघूनं नाईलाजानं मान हलवली, पण त्याचे हात आज नेहमीसारखे वेगाने चालत नव्हते. त्याच्या मजुरांनी जड कुदळी आणल्या, लांब लोखंडी सळ्या त्या शिळेच्या फटीत अडकवल्या, आणि एकत्र जोर लावून शिळा रेटायला सुरुवात केली. ती शिळा जड होती. जड. ती जेवढी दिसायला होती, त्यापेक्षाही कितीतरी

पटींनी जास्त जड होती. जणू काही ती नुसती स्वतःच्या वजनावर तिथं नव्हती, तर तिला खालून कुणीतरी अदृश्य ताकदीने घट्ट धरून ठेवलं असावं. मजूर जोर लावून घाम गाळत होते, त्यांच्या हातांतल्या सळ्या वाकत होत्या, पण ती शिळा तसूभरही जागची हलत नव्हती. आणि निलयला एका क्षणासाठी असं वाटून गेलं की ती शिळा कदाचित हलणारच नाही. आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे, ती हलणार नाही या विचारातच त्याला एक विचित्र सुटकेची आणि सुरक्षिततेची भावना जाणवली, आणि ही स्वतःचीच भावना त्याला खूप नकोशी वाटली.

"आणखी माणसं लागतील," रघू धापा टाकत, घामाने भिजून म्हणाला. "ही अशी नाई हलनार."

नेमकं तेव्हाच प्रथमेशनं खांद्यावरची आपली जड बॅग जमिनीवर खाली ठेवली आणि तो फारच आत्मविश्वासाने पुढे आला. "थांब, असं नाही. सळी इथं नको, त्या कोपऱ्यात लाव. लीव्हरेजचा पॉइंट बदल." एक इंजिनिअर म्हणून त्यानं मजुराच्या हातातली सळी घेतली, फटीच्या दुसऱ्या योग्य कोपऱ्यात ती अचूकपणे घातली, आणि त्या दगडाच्या कडेला एक दुसरा लहान दगड टेकू म्हणून घट्ट बसवला. "आता रेटा. एकदम. एक... दोन... तीन."

आणि ती अवाढव्य शिळा शेवटी हलली.

एक भयंकर *कर्र्र्र* आवाज त्या अंधाऱ्या खोलीत घुमला. दगड दगडावर रानटीपणे घासल्याचा तो आवाज इतका खोल आणि कर्कश होता की तो थेट अंगावर आला, जसं काही तो कानांतून नाही तर दातांच्या मुळांतून थेट हाडांपर्यंत पोहोचला. मजुरांनी जीवाच्या आकांताने जोर लावला, प्रथमेशनं ओरडून त्यांना ताल दिला, आणि एका बाजूने ती शिळा हळूहळू वर उचलली गेली, किंचित कलंडली, आणि मग एका बाजूला घरंगळत जाऊन जमिनीवर आदळली. तिच्या त्या आदळण्याचा मोठा आवाज त्या छोट्या कोंदट खोलीत घुमून राहिला, आणि त्यानंतर सगळीकडे एक गुदमरून टाकणारी शांतता पसरली.

आणि त्या अभेद्य शांततेत, त्या उघड्या पडलेल्या जागेतून वासाचा एक अतिशय दाट आणि थंड लोट अचानक बाहेर आला. आता तो वास खूप जास्त तीव्र आणि उग्र होता. निलयला असं वाटलं की तो वास फक्त नाकातून नाही, तर थेट त्याच्या घशात आणि फुफ्फुसांत उतरत आहे. मागचा एक मजूर त्या वासाने जोरात खोकला. दुसऱ्या मजुराने स्वतःच्या नाकावर घट्ट हात दाबून धरला. आणि टॉर्चच्या उजेडात निलयला खाली दिसलं. पाणी.

आणि नेमकं त्याच वेळी, वरच्या गाभाऱ्यातून त्या अरुंद झरोक्यावाटे आलेला नैसर्गिक उजेडाचा एक अंधुक कवडसा आता थेट खाली त्या काळ्या पाण्यावर पडत होता. खोलीतल्या

त्या घनदाट काळोखात तो प्रकाशाचा झोत एखाद्या तलवारीसारखा खाली उतरला होता. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे, तो प्रकाश त्या पाण्यावर आदळून चमचमत नव्हता, तर ते अथांग काळं पाणी तो नैसर्गिक उजेड जणू स्वतःच्या आत ओढून घेत होतं.

ती एक जुनी, दगडी चिरेबंदी बारव होती. ती खाली चिंचोळी आणि अथांग खोल होती, आणि तिच्या अगदी तळाशी ते काळंभोर पाणी होतं. ते पाणी अद्याप स्थिर नव्हतं. ती जड शिळा हलवल्यामुळे ते पाणी चांगलंच हललं होतं. त्याच्या पृष्ठभागावर मोठे तरंग उठले होते, आणि ते तरंग टॉर्चचा उजेड पकडून खूप विचित्रपणे आणि विस्कळीतपणे चमकत होते. निलयनं खाली गुडघ्यावर वाकून नीट बघितलं. ते पाणी नक्की किती खोल आहे याचा कोणताही अंदाज येत नव्हता.

निलयनं नकळत आपला हात पुढे लांब केला. त्या पाण्याला स्पर्श करून पाहण्याचा त्याचा तो नैसर्गिक इंजिनिअरिंगचा विचार होता. पण त्याचा हात अर्ध्यावरच हवेत गोठून थांबला. तो का थांबला, हे त्याला स्वतःलाही कळलं नाही. ते नुसतं पाणीच तर होतं. त्यानं आजवरच्या करिअरमध्ये आयुष्यात शेकडो विहिरी तपासल्या होत्या, त्यांत निर्धास्तपणे हात घातले होते, कित्येकदा पाणी हातावर घेऊन चाखलंही होतं. पण आत्ता, या क्षणी, या काळ्या पाण्याकडं बघून त्याच्या शरीराला आणि

हाताला आतूनच एक प्रबळ नकार जाणवला. त्याला ते पाणी नकोसं वाटलं, आणि त्यानं आपला हात झटकन मागं घेतला. स्वतःच्या या माघारी घेण्याचं त्यालाच मनातून नवल वाटलं, पण ते नवल त्यानं आपल्या चेहऱ्यावर कुणालाही दिसू दिलं नाही.

"किती खोल असंल साहेब?" रघूनं दारातूनच घाबरत विचारलं. तो अजूनही पुढे आला नव्हता. तो टॉर्चच्या उजेडाच्या कडेला, त्या सुरक्षित अंधारातच उभा राहिला होता.

"माहीत नाही. उद्या मोजू." निलय पाठ अवघडल्यासारखी सरळ करून उभा राहिला. त्यानं आपल्या हातातील टॉर्च बाजूला पडलेल्या त्या काळ्या शिळेवर फिरवली. आणि आता त्या दगडावर कोरलेल्या झिजलेल्या रेषा पुन्हा एकदा उजेडात आल्या, पण यावेळी एका वेगळ्या कोनातून प्रकाश पडल्यामुळे त्या नुसत्या नक्षीसारख्या वाटल्या नाहीत, तर ती नक्कीच काहीतरी अक्षरं असल्याचं स्पष्ट झालं. ती लिपी अतिशय जुनी होती. ती देवनागरी नव्हती, आणि मोडीही नव्हती. ती अशी कोणतीतरी वेगळीच लिपी होती जी निलयच्या ओळखीची नव्हती. त्यानं खिशातून फोन काढून त्याचा फोटो काढायचा प्रयत्न केला, पण त्या दाट अंधारात, आणि हातातल्या हलणाऱ्या टॉर्चच्या उजेडात तो फोटो काही नीट आला नाही. उद्या, त्यानं स्वतःच्या मनाशीच ठरवलं. उद्या दिवसाच्या उजेडात हे सगळं नीट तपासून बघू.

"झालं," निलय सर्वांना उद्देशून म्हणाला. पण स्वतःचाच आवाज त्याला त्या खोलीत अत्यंत विचित्र आणि परका वाटला. तो आवाज दबलेला होता, जणू तो अगदी जवळून येत होता आणि खोलीच्या त्या थंड दगडांमध्ये कुठेतरी मुरून जात होता. "बारवच आहे. मी म्हटलं ना."

रघू आणि ते दोन मजूर भीतीने आधीच मागे सरकले होते, त्या शिळेपासून आणि त्या काळ्या पाण्यापासून लांब. पण प्रथमेश मात्र त्यांच्या उलट, प्रचंड आत्मविश्वासाने पुढे आला. त्यानंही स्वतःच्या नाकावर हात धरला होता आणि वासामुळे त्याचा चेहरा वाकडा झाला होता. "बाप रे, काय वास आहे यार! शेकडो वर्षांची गटारगंगा उघडली आपण." असं म्हणत त्यानं खिशातून आपला फोन काढला, त्याचा प्रखर फ्लॅश चालू केला, आणि तो खाली त्या काळ्या पाण्याचा फोटो काढण्यासाठी वाकला. कॅमेऱ्याचा फ्लॅश चमकला, आणि बरोबर त्याच क्षणी ते काळं पाणी एका सेकंदासाठी पांढरं झगझगीत झालं, आणि पुढच्याच सेकंदाला पुन्हा पूर्वीसारखंच काळं झालं. तो काढलेला फोटो बघत हसला, पण स्क्रीनवर बघितल्यावर त्याच्या लक्षात आलं की त्या फोटोत काळ्या पाण्यावर फक्त त्याच्या फ्लॅशचा एक पांढरा डाग उमटला होता, बाकी पाण्याचा कोणताही भाग त्यात दिसत नव्हता.

"छ्या. नीट नाही आला." पण प्रथमेश एवढ्या सहजासहजी हार मानणारा माणूस नव्हता. त्यानं फोनच्या कॅमेऱ्याचा नाईट मोड चालू केला, आणि पुन्हा एकदा फोटो काढला. तरीही रिझल्ट तोच. तोच पांढरा डाग आणि काळा अंधार. मग त्यानं चिडून मोबाईलचा व्हिडिओ मोड चालू केला, टॉर्च सतत लावून ठेवली, आणि फोन खाली पाण्याकडं रोखून धरला. "आता बघू." पण स्क्रीनवर काहीच नीट दिसत नव्हतं. सगळा काळाकुट्ट अंधार, आणि मधेच पडणाऱ्या रेषा, तडे आणि सतत येणारे ग्लिच. त्याचा अत्याधुनिक फोन तिथं खाली नक्की काय आहे ते रेकॉर्डच करू शकत नव्हता. प्रथमेशनं वैतागून भुवया आवळल्या, फोन झटकून हलवला, आणि परत खाली धरला. "विचित्र आहे यार. कॅमेरा फोकसच होत नाही. आणि बॅटरी..." त्यानं आश्चर्याने स्क्रीनकडं बघितलं. "बॅटरी नव्वद टक्के होती आत्ता. आता चाळीस दाखवतंय. दोन मिनिटांत." तो हसायचा प्रयत्न करत म्हणाला, पण त्याच्या चेहऱ्यावरचं ते हसू संपूर्णपणे कोरडं होतं. "या गुहेत काहीतरी आहे जे बॅटरी खातं. मॅग्नेटिक फील्ड असेल."

"असेल," निलय वरवर होकार देत म्हणाला, पण एक इंजिनिअर म्हणून त्यालाही ते प्रचंड खटकलं होतं.

आणि प्रथमेशचा तो शहरी हलकेपणा, त्या प्राचीन दगडी खोलीत, त्या गुदमरून टाकणाऱ्या वासात आणि त्या अथांग

काळ्या पाण्यासमोर विसंगत आणि विचित्र वाटत होता. जसं काही तो एकटाच अशा एका समांतर जगात वावरत होता जिथं ही नुसती एक जुनी विहीर होती, आणि बाकीचे सगळे लोक एका वेगळ्याच दहशतीत जगत होते. त्या गप्प आणि कोंदट खोलीत प्रथमेशच्या आवाजाचा तो प्रतिध्वनी उमटला, आणि मग हळूहळू विरून गेला. त्यानंतर पुन्हा एकदा फक्त त्या पाण्याच्या तरंगांचा बारीक आवाज खोलीत उरला. आणि आता तो आवाजही हळूहळू कमी होत होता, कारण शिळा हलल्यामुळे अशांत झालेलं ते पाणी आता पुन्हा एकदा आपल्या मूळ अवस्थेत शांत होत चाललं होतं.

ते सर्वजण जेव्हा पायऱ्या चढून वर आले, तेव्हा समोर प्रकाश गुरुजी उभे होते.

ते गाभाऱ्याच्या दारात उभे होते, त्यांच्या हातात पूजेचं पितळी तबक होतं, आणि त्यांच्या चेहऱ्यावर असा एक भाव होता जो निलयनं आयुष्यात याआधी कधीही बघितला नव्हता. तो भाव रागाचा किंवा संतापाचा नव्हता. ती निव्वळ भीती होती. एक अतिशय खोल, आणि थंडगार भीती, जी लपवण्याचा ते आटोकाट प्रयत्न करत होते पण त्यांना ते अजिबात जमत नव्हतं.

"उचललीस," ते फक्त एवढाच एक शब्द म्हणाले. तो प्रश्न नव्हता, तर ती एक हतबल खात्री होती.

"बाबा, ती नुसती जुनी बारव आहे. झरा. काहीच..." निलयनं आपला बचाव करण्याचा प्रयत्न केला.

"आज अभिषेक राहिला." प्रकाश गुरुजींचा आवाज कापत होता, पण त्या कापणाऱ्या आवाजात आता एक प्रकारची तडफ आणि संताप होता. "माझ्या हातून हा नेम कधी सुटला नाई. बापानं जो दिला, तो मी जपला, रोज, न चुकता. काल संध्याकाळीच तुझ्या माणसांनी मागची वाट आडवली व्हती. सामान, लोखंडी सळ्या, दगडाचा ढिगारा... सगळं वाटेवर टाकलं. मी आज पहाटे अंधारात तीर्थ घेऊन गेलो, तर जायाले वाटच नाई. अंधारात त्या सळ्या ओलांडून कसं जावं? मी थांबलो, वाट बगितली, म्हटलं उजेड पडल्यावर मजूर येतील अन वाट मोकळी करतील. पन तुमी सगळे थेट खाली त्या खोलीत गेले, गडबड, धूळ. सूर्य वर आला. येळ निघून गेली." ते हातातलं तबक घट्ट धरून उभे होते, आणि त्यांचे ते नेहमीचे स्थिर आणि राठ हात आज भीतीने थरथरत होते. "आज पहिल्यांदा जळ निवळंल."

"जळ निवळंल म्हणजे काय बाबा?" वडिलांच्या या अंधश्रद्धेवर निलयला आता खरोखरच राग आला. "पाणी नितळ होईल? होऊ दे. ते पाणी आहे. पाणी नितळ होतं, गढूळ होतं, त्यात काय एवढं?"

"अभिषेकाची येळ ठरलेली असते," प्रकाश गुरुजी हताशपणे म्हणाले. "सूर्याचं पहिलं किरण गाभाऱ्याच्या उंबऱ्यावर पडतं, त्या आधी. तेवढाच येळ. ती येळ गेली की उद्यापावतर थांबावं लागतं. आन आज ती गेली."

सूर्याचं किरण आणि उंबरा. निलयनं मनातल्या मनात हे शब्द ऐकले आणि त्याला आतल्या आत अतिशय कडवट हसू आलं. म्हणजे या त्यांच्या देवीचं पावित्र्य आणि कोप हा चक्क पृथ्वीच्या सूर्याभोवती फिरण्यावर अवलंबून होता तर! खगोलशास्त्र आणि जुनी वास्तुकला यांचा हा अद्भुत संगम. उंबऱ्याचा कोन आणि सूर्याचा उदयबिंदू. कुणीतरी शेकडो वर्षांपूर्वी देवळाचा एक कोन ठरवला, आणि आता आजच्या काळातही अख्खं गाव त्या कोनाच्या भीतीत जगत होतं. एवढा नेमका आणि पद्धतशीर खुळचटपणा त्यानं याआधी कधीच बघितला नव्हता. पण तरीही त्यानं हे बोलून दाखवलं नाही. वडिलांच्या त्या पांढऱ्या पडलेल्या आणि घाबरलेल्या चेहऱ्याकडं बघून, त्याला हे सगळे शब्द उच्चारण्याचं धाडस झालं नाही.

प्रकाश गुरुजींनी त्याच्याकडं बघितलं, बराच वेळ ते मूकपणे बघत राहिले. त्यांना अजूनही काहीतरी बोलायचं होतं, पण ते बोलले नाहीत. त्यांच्या डोळ्यांतली धडपड आता एखाद्या विझलेल्या दिव्यासारखी शांत झाली. जणू त्यांना मनातून पक्कं कळून चुकलं होतं की आता सांगून काहीही उपयोग नाही, हा

शहरी मुलगा त्यांचं काहीच ऐकणार नाही, आणि जे व्हायचं होतं ते आता आधीच होऊन गेलंय.

"मला अर्थ इचारू नको," ते शेवटी हळू आवाजात म्हणाले. "मले अर्थ ठाऊक नाई. माझ्या बापानं सांगितलं, त्याच्या बापानं त्याले. अभिषेक चुकवायचा नाई, शिळा उघडायची नाई. काऊन, ते कोनी सांगितलं नाई, आन मी इचारलं नाई. नुसतं पाळत आलो." त्यांनी हातातील पूजेच्या तबकाकडं बघितलं, आणि मग आपल्या थरथरणाऱ्या राठ हातांकडं. "आन ते बी आज माझ्या हातून सुटलं. मी थांबवायला पायजे व्हतं तुले. जमलं नाई."

आणि त्यांच्या त्या शेवटच्या वाक्यात एवढं अथांग आणि खोल दुःख होतं, एवढी थकलेली हतबलता होती, की निलयला क्षणभर यावर काहीच प्रत्युत्तर देता आलं नाही. त्याला वडिलांशी जोरदार भांडायचं होतं, त्यांचा हा आंधळेपणा त्यांच्या तोंडावर दाखवून द्यायचा होता, पण या खचलेल्या माणसापुढं, या विशिष्ट क्षणी, त्याला ते जमलं नाही. ते जागेवरून वळले आणि तबक घेऊन पुन्हा गाभाऱ्यात निघून गेले. आणि आतून त्यांच्या मंत्रोच्चारांचा आवाज ऐकू येऊ लागला. तो आवाज नेहमीसारखा खणखणीत नव्हता, तो नेहमीपेक्षा खूप हळू आणि थकलेला वाटत होता. तो आवाज एखाद्या भक्ताचा नव्हता, तर एका अपराध्यासारखी माफी मागणारी व्यक्ती जशी कुजबुजते, तसा तो आवाज होता.

निलय तिथं बाहेर तसाच उभा राहिला. त्याला वडिलांचा राग आला होता, पण त्या रागाच्या खाली एक नेहमीची अस्वस्थता दडलेली होती, आणि आज ती अस्वस्थता नेहमीपेक्षा जरा जास्तच वर आली होती. त्यानं ती जाणीवपूर्वक बाजूला ठेवायचा प्रयत्न केला, पण आज त्याला ते पूर्णपणे जमलं नाही.

"रघू," त्यानं स्वतःला सावरत हाक मारली. "उद्या सकाळी पहिलं काम. त्या बारवेतलं पाणी तपासायचं. किती खोल आहे, किती साठा आहे, पिण्यायोग्य आहे का. मोटार लावून थोडं उपसा, नमुना घ्या. भक्तनिवासाला पाणी लागेल, आणि जर हा झरा वापरता आला तर उत्तम. सकाळी उजेड असताना, पहिलं तेच."

"बरं साहेब," रघू केवळ आज्ञाधारकपणे म्हणाला, पण त्याच्या नेहमीच्या हसऱ्या आवाजात आता कसलाच उत्साह उरला नव्हता.

...

त्या रात्री निलयला काही केल्या झोप येत नव्हती.

तो वडिलांच्या घरातल्या फरशीवर, सतरंजीवर पडून होता. तो सतत वर छताकडं बघत होता. घराबाहेरून जंगलातल्या रातकिड्यांचा तोच एकसुरी आवाज येत होता, पण आज त्या आवाजाच्या खाली, फारच बारीक आणि पुसटसा आणखी एक आवाज येत होता. ओवीचा. गजराबाई आज रात्री थांबली

नव्हती. ती अजूनही ती ओवी म्हणत होती, आणि आज तिच्या आवाजात नेहमीची ती संथ लय नव्हती. आजची लय जास्त जलद होती, जास्त अस्वस्थ होती, जणू ती कुणालातरी घाईघाईनं काहीतरी भयानक सांगायचा प्रयत्न करत असावी.

निलय उठून बसला. पाणी प्यायला म्हणून, त्यानं स्वतःच्याच मनाला खोटं कारण दिलं. पण तो तडक दाराशी गेला आणि त्यानं बाहेर आवारात बघितलं.

संपूर्ण आवार मिट्ट अंधारात बुडालं होतं. पण फक्त देवळाच्या गाभाऱ्यात, एक दिवा लागलेला होता.

हे दृश्य बघून निलयनं आश्चर्याने भुवया आवळल्या. तो नंदादीप नक्कीच नव्हता. या देवळाच्या गाभाऱ्यात अखंड दिवा लावण्याची कोणतीही प्रथा नव्हती. रात्रीच्या वेळी हा गाभारा कायम अंधारातच असायचा, हे त्याला पक्कं आठवत होतं, कारण लहानपणी तो याच अंधाऱ्या गाभाऱ्याला खूप घाबरायचा. वडील रोज संध्याकाळी पूजा झाल्यावर स्वतः दिवा विझवायचे आणि गाभाऱ्याचं दार ओढून घ्यायचे. मग आता, या मध्यरात्रीच्या वेळी, तो दिवा आत कुणी लावला? वडील तर कधीच झोपले होते, त्यांच्या खोलीतून त्यांच्या संथ श्वासाचा बारीक आवाज त्याला अजूनही येत होता. वासुदेव पुजारी तर केव्हाच घरी निघून गेला होता. त्यानं तो विचार आपल्या तर्काच्या कसोटीवर तपासला, पण यावेळी उत्तर तितकं साधं आणि सोपं

नव्हतं. वडील कदाचित मध्यरात्री उठून तो लावून परत झोपले असतील. किंवा आज संध्याकाळी या सगळ्या गडबडीत त्यांच्याकडून तो विझवायचा राहून गेला असेल. ही दोनच उत्तरं शक्य होती, आणि दोन्ही जरा ओढूनताणून आणल्यासारखी वाटत होती. पण त्यानं त्यातलाच एक पर्याय निवडला, कारण दुसरा पर्याय म्हणजे यावर अवांतर विचार करत राहणं, आणि असा विचार केला तर रात्रभर झोप लागणार नव्हती, हे त्याला माहीत होतं.

पण तो आत न येता दाराशीच उभा राहिला. रात्रीची हवा अतिशय थंड होती, आणि तिच्यात तोच कुबट वास होता. तोच वास जो आज सकाळी त्या बारवेतून आला होता. आता तो विरळ झाला होता, पण तरीही हवेत टिकून होता. जसं काही तो दिवसभरात अख्ख्या आवारात हळूहळू पसरला होता, कुणाच्याही लक्षात न येता. आणि त्याची नजर न कळत गाभाऱ्याकडून त्या मागच्या बाजूकडं वळली. जिथं खाली ती बारव होती. जिथं ती जड शिळा आता बाजूला पडली होती, उघडी. आणि त्याला स्वतःलाच कळत नव्हतं का, पण त्याला त्या दिशेनं जायचं होतं, खाली डोकावून बघावंसं वाटत होतं, आणि त्याच वेळी तिथे मुळीच जाऊ नये असंही वाटत होतं. एकाच वेळी दोन परस्परविरोधी इच्छांमधल्या या ओढाताणीनं त्याच्या पोटात भीतीचा एक बारीक गोळा उठला.

आणि नेमकं तेव्हाच गजराबाईची ओवी अचानक थांबली.

ती इतका वेळ अखंड म्हणत होती की तिचा तो आवाज आता आजूबाजूच्या पार्श्वभूमीचाच एक भाग झाला होता. आणि आता तो आवाज अचानक थांबल्यावर, ती पसरलेली शांतता एखाद्या वजनदार गोष्टीसारखी अंगावर जाणवली. निलयनं झटकन आवाराच्या कोपऱ्याकडं बघितलं, त्या दगडाकडं. पण गजराबाई तिथं नव्हती. मध्यरात्रीच्या या अशा विचित्र वेळी ती कुठं निघून गेली, हे कळत नव्हतं.

आणि त्या अंगावर येणाऱ्या शांततेत, निलयला प्रकर्षाने जाणवलं की खालून, देवळाच्या त्या बारवेतून, आता कसलाच आवाज येत नव्हता. दुपारी तिथे पाण्याच्या तरंगांचा आवाज येत होता, ते पाणी हलत होतं, ते जिवंत असल्यासारखं वाटत होतं. पण आता ते शांत होतं. पूर्णतः स्थिर. आणि स्थिर पाण्याचा कोणताही आवाज नसतो, हे त्याच्या विज्ञानाला पक्कं माहीत होतं, पण तरीही ती मुकी शांतता त्याला एखाद्या मोठ्या आवाजासारखी अंगावर येणारी जाणवली. ती एक भरून राहिलेली, कशाचीतरी वाट बघणारी शांतता होती. जणू काही ते खालचं पाणी स्वतःचा श्वास रोखून पडून असावं.

त्यानं झटकन दार लावलं, तो घरात आत आला आणि सतरंजीवर जाऊन पडला. त्यानं आपले डोळे घट्ट मिटून घेतले आणि झोपायचा आटोकाट प्रयत्न केला. पण रात्रभर त्याला हेच

वाटत राहिलं की गाभाऱ्यातला तो दिवा अजूनही जळतोय, आणि खालचं ते काळं पाणी अजूनही तसंच स्थिर पडून आहे, आणि या दोन गोष्टींचा एकमेकांशी काहीतरी भयानक संबंध आहे जो त्याला अजिबात कळत नव्हता आणि तो त्याला कधीच कळायला नको होता.

पण तिथे खाली, त्या घनदाट अंधारात, त्या कोंदट दगडी खोलीत, बारवेतलं ते काळं पाणी आता स्थिर झालं होतं. एखाद्या काचेसारखं. एका अथांग आरशासारखं. आणि त्या काळ्याकुट्ट, नितळ पृष्ठभागावर, वरच्या गाभाऱ्यातून झिरपणाऱ्या त्या दिव्याच्या मंद उजेडात, एक अंधुकसं प्रतिबिंब पडलं होतं. ते छताचं प्रतिबिंब होतं. दगडी छताचं.

आणि त्या स्थिर प्रतिबिंबात, एका कोपऱ्यात, काहीतरी सूक्ष्मपणे हललं. हळू. फक्त एकदाच.

* * *

प्रकरण चार : स्पष्टीकरण

डोळां डोळां भरे ।

सकाळी मजुरांची आणि गावाची चाहूल लागण्याआधीच निलय स्वतः एकटा खाली उतरला.

रात्रभर त्याला त्या काळ्या पाण्याचं आणि त्या कोंदट खोलीचं दृश्य डोक्यातून काढता आलं नव्हतं. ती स्थिर, श्वास रोखून बसलेली शांतता, गाभाऱ्यात अचानक लागलेला तो रहस्यमय दिवा, आणि त्या वासाची आठवण त्याला रात्रभर छळत होती. सकाळी उठल्याबरोबर त्याला सर्वांत आधी तेच जाऊन बघायचं होतं. इतर कुणीही तिथं पोहोचण्याआधी स्वतःला एकदा ठामपणे पटवून द्यायचं होतं की तिथं घाबरण्यासारखं काहीही नाही. फक्त काळं पाणी आहे, आणि जुने दगड आहेत.

अरुंद पायऱ्या उतरून तो त्या दगडी खोलीत आला. त्यानं हातातली प्रखर टॉर्च लावली. आणि तो जागचा जागी थबकला.

पाणी बदललं होतं.

काल दुपारी जेव्हा त्यांनी शिळा सरकवली होती, तेव्हा ते पाणी काळंभोर, गढूळ आणि तरंगांनी अशांत वाटलं होतं. पण आता ते संपूर्णपणे नितळ झालं होतं. अतिशय नितळ, आणि इतकं भयंकर स्थिर, की पाण्याचा पृष्ठभाग नक्की कुठून सुरू

होतोय हेच त्याला कळेना. टॉर्चचा उजेड थेट त्या पाण्यावर पडला, आणि एका अचूक कोनातून परावर्तित होऊन परत आला, खूप स्वच्छपणे. एखाद्या अथांग आरशासारखा. निलय गुडघ्यावर बसून खाली वाकला, आणि त्या अथांग पाण्यात त्याला स्वतःचाच चेहरा दिसला. टॉर्चच्या उजेडात त्याचा चेहरा, आणि त्याच्या मागे असलेले छताचे काळे दगड. हे सगळं दृश्य इतकं स्पष्ट आणि जिवंत होतं की एका क्षणासाठी त्याला भास झाला की खाली पाणी नसून तशीच दुसरी एक उलटी खोली आहे, आणि त्या उलट्या जगातला दुसरा एक निलय वर मान करून त्याच्याकडं एकटक बघतोय.

हा निव्वळ मनाचा खेळ आहे, हे सिद्ध करण्यासाठी त्यानं आपला उजवा हात हलवला. पाण्यातल्या प्रतिबिंबानंही आपला हात हलवला. अर्थातच. तो एक आरसा होता, पाण्याचा नैसर्गिक आरसा. भौतिकशास्त्र, प्रकाशाचं परावर्तन. यात नवं किंवा घाबरण्यासारखं काहीच नव्हतं. पण जेव्हा त्यानं आपला हात खाली घेतला, तेव्हा एक क्षण, कदाचित एका सेकंदाचाही अर्धा भाग, त्याला असं तीव्रपणे वाटून गेलं की खालच्या त्या प्रतिबिंबानं आपला हात खाली घ्यायला जरासा उशीर केला. अत्यंत सूक्ष्म उशीर. जो कुठल्याही उपकरणाने मोजता येणार नाही इतका बारीक, पण त्याच्या मेंदूला जाणवेल इतका.

तो बराच वेळ त्या पाण्याकडं नुसताच बघत राहिला. गुडघ्यावर वाकून, थेट त्या नितळ काळ्या पृष्ठभागात, आणि स्वतःच्याच प्रतिबिंबाच्या डोळ्यांत. आणि काहीच झालं नाही. तो नुसता बघत राहिला, आणि मग बराच वेळ वाकून पाठ अवघडली म्हणून तो कंटाळून सरळ उभा राहिला. एखादा सामान्य माणूस एखाद्या जुन्या विहिरीत कुतूहलाने डोकावून बघतो आणि सरळ उभा राहतो, अगदी तसाच.

त्यानं झटकन आपली नजर पाण्यावरून वळवली. रात्रीची झोप नीट झाली नाही, एवढंच. त्यानं स्वतःला तार्किक स्पष्टीकरण दिलं. डोकं थकलंय, डोळे थकलेत, आणि थकलेले डोळे असे ऑप्टिकल इल्युजनचे खेळ करतात, वेळेचा आणि प्रकाशाचा अंदाज चुकतो. तो सरळ उभा राहिला, आणि त्याच्या लक्षात आलं की त्याचा श्वास आता जरा जड झाला होता. त्या बंद खोलीत तो कालचा कुबट वास आता जास्त दाट आणि गोडसर झाला होता. त्यानं ठरवलं की खाली हवा कमी आहे, ही शतकानुशतके बंद असलेली जागा आहे, त्यामुळे इथं विषारी वायू साचला असणार. तो पायऱ्या चढून वर आला, आणि मोकळ्या हवेत वर आल्यावर त्याला खरोखरच जरा बरं वाटलं, आणि त्या 'बरं वाटण्याचा' त्यानं अवांतर विचार केला नाही.

वर रघू आणि त्याचे मजूर कामावर हजर झाले होते.

"राम राम साहेब," रघू म्हणाला, आणि आज त्याच्या आवाजात तो कालचा मोकळा उत्साह अजिबात नव्हता. तो खूप थकल्यासारखा दिसत होता, त्याच्या डोळ्यांखाली काळी वर्तुळं आली होती. "रात नीट झोप नाई लागली. काय माहीत का. सारखं ते... ते खालचं पाणी दिसत ऱ्हायलं डोळ्यापुढं. सपनात बी." तो चेहऱ्यावर खोटं हसू आणायचा प्रयत्न करत म्हणाला. "म्हातारा झालो वाटतं साहेब. आधी असं नव्हतं व्हायचं."

"मलाही झोप नाही लागली," निलय म्हणाला. "ती खालची जागा बंद आहे, तिथं हवा खेळत नाही. रात्रभर तिथला विषारी वास तुमच्या डोक्यात राहिला असेल. असू दे. आज ते पाणी तपासायचंय. प्रथमेश आला की तो स्वतः नमुना घेईल. तोवर रघू, पोरांना सांग बादलीला दोरी बांधून खाली सोडा. पाण्याची लेव्हल किती खोल आहे, तेवढं फक्त मोजून या. पिण्यायोग्य आहे का ते लॅबमधून कळेल. भक्तनिवासाला पाणी लागेल, आणि हा झरा वापरता आला तर बाळासाहेब खूश होईल."

"बरं साहेब." रघूनं मजुरांना खाली जाण्याची खूण केली. दोघं जण पुढे आले. एक तरुण पोरगा होता, विठ्ठल, पहिल्यांदाच कामावर आलेला, कालपासून जो सारखा हसत होता, ज्याच्यात नव्या कामाचा नवा उत्साह सळसळत होता. आणि दुसरा एक जरा वयस्क मजूर, नामा, सतत बिडी ओढणारा आणि कमी बोलणारा. "आधी लेव्हल मोजून या," रघू त्यांना म्हणाला. "ही

रिकामी बादली घ्या, आन दोरी बांधून आत सोडा, पानी किती खाली हाय बगा. आन अंधार हाय, घे, ही टॉर्च घेऊन जा."

दोघांनी रिकामी बादली, दोरीची गुंडाळी आणि टॉर्च घेतली, आणि ते त्या अरुंद पायऱ्या उतरू लागले.

रघू मात्र दारातच उभा राहिला, अगदी वरच्या पायरीवर, आणि निलयला स्पष्ट जाणवलं की तो खाली उतरत नव्हता. काल तो शिळेच्या फटीतून वास आल्यावर मागे सरकला होता, आणि आज तो पायऱ्यांच्या खालीच गेला नाही. निलयनं ते उघडपणे बोलून दाखवलं नाही, पण रघूचे पाय खाली जायला तयार नव्हते, आणि ही गोष्ट रघूलाही मनातून कळत असावी, कारण तो जरा ओशाळल्यासारखा तिथंच एका जागी घुटमळत होता, हातातली सुपारी चघळत.

नेमकं तेवढ्यात प्रथमेश तिथे आला. त्याच्या पाठीवर त्याची इक्विपमेंट्सची बॅग होती, ज्यात निर्जंतुक बाटल्या आणि नमुने घेण्याची उपकरणं होती. "अरे, ते खाली का गेले?" तो आल्याआल्या म्हणाला. "थांब, नमुना मी घेतो. त्या मजुरांना काय कळणार नमुना कसा घ्यायचा. सगळं दूषित होईल."

पण तो पायऱ्यांशी आला तेव्हा विठ्ठल आणि नामा आधीच टॉर्च घेऊन खाली उतरले होते. "अरे, थांबा जरा," प्रथमेशनं खाली हाक मारली, पण त्याला स्वतःला खाली जाण्याची कोणतीही घाई नव्हती, आणि पायऱ्या अतिशय अरुंद आणि

अवघड होत्या, आणि खाली वाकून उतरायला त्याला जड जात होतं. म्हणून तो वरच थांबला, बॅग खांद्यावर तशीच ठेवून म्हणाला, "अरे यार निलू, त्यांना का पाठवलंस? त्यांनी पाण्यात बादली टाकून पाणी गढूळ केलं असेल, आता मला नमुना कसा घेता येईल? ठीक आहे, ते वर आले की मीच बघतो. उगीच खाली गर्दी नको." आणि तो निलयशेजारी उभा राहिला, वाट बघत. तो वर थांबला. आळसानं, किंवा इंजिनिअरच्या सवयीनं, किंवा नुसतंच म्हणून.

काही क्षणांनंतर खालून बादली पाण्यात आदळल्याचा *छपक्क* आवाज आला. पाणी उपसल्याचा आवाज घुमला. आणि मग तो आवाज अचानक थांबला.

निलयनं वाट बघितली. प्रथमेशनंही कानोसा घेतला. पण परत काहीच आवाज आला नाही.

"विठ्ठल?" रघूनं काळजीत खाली हाक मारली. "नाम्या? काय झालं रे?"

खालून कोणतंच उत्तर आलं नाही.

निलय झटकन पायऱ्यांकडं गेला, आणि तेवढ्यात ते दोघं खालून वर येताना दिसले. अतिशय हळू, एकेक पायरी चढत. त्यांच्या हातातली बादली रिकामी होती आणि दोरी नव्हती. आणि निलय त्यांना रागाने काहीतरी बोलणार होता, पण त्यांचे चेहरे उजेडात बघून तो जागीच थबकला.

ते दोघंही वरवर पाहता अगदी ठीक दिसत होते. त्यांना काहीच झालं नव्हतं. त्यांचे कपडे कोरडे होते, हातपाय शाबूत होते, ते कुठे पडले नव्हते किंवा त्यांना कुठे लागलं नव्हतं. पण त्यांच्या चेहऱ्यावर कोणतीच भावना शिल्लक नव्हती. काहीच नाही. विठ्ठल, तो तरुण पोरगा, जो सकाळी उत्साहाने हसत आला होता, तो आता नुसता डोळे फाडून बघत होता. थेट समोर, कशाकडेच नाही. त्याची हालचाल अतिशय हळू आणि यांत्रिक झाली होती, पावलं मोजून आणि विचार करून टाकल्यासारखी. आणि त्याचे डोळे ओले होते, पण ते पाण्याचे नव्हते, वेगळेच होते. ते स्थिर डोळे टॉर्चच्या प्रकाशात परावर्तित होत होते. खूप जास्त. एखाद्या प्राण्याच्या डोळ्यात रात्री उजेड पडल्यावर जसे ते अनैसर्गिकपणे चमकतात, तसे त्याचे डोळे चमकत होते.

निलयच्या इंजिनिअरिंगच्या मेंदूने तात्काळ त्या भौतिक विसंगतीवर झेप घेतली. "बादली रिकामी का आहे? मघाशी पाणी उपसल्याचा आवाज आला ना? आन ती दोरी कुठंय?" त्यानं चिडून विचारलं.

विठ्ठलनं त्याच्याकडं बघितलं. बराच वेळ. पापणीही न मिचकावता. मग तो म्हणाला, "पाणी खोल हाय." त्याचा आवाज पूर्णपणे सपाट आणि निर्जीव होता, जणू तो रिकामा झाला होता. "लय खोल. तळ नाई."

"अरे, पण लेव्हल मोजली का? दोरी कुठंय?"

"तळ नाई," विठ्ठलने त्याच निर्जीव सुरात उत्तर दिलं, जणू निलयनं काही विचारलंच नव्हतं. "बादली खाली गेली... दोरी खाली गेली... खाली बगत ऱ्हायलो. अजून खाली, अजून खाली. तळ लागतच नाई साहेब."

निलयनं वैतागून भुवया आवळल्या. त्याला हा वेडसरपणा पटत नव्हता, पण त्यानं आपल्या तार्किक मेंदूला एक सोयीस्कर उत्तर दिलं. "बरं, ठीक आहे. जा, जाऊन बसा जरा. ऊन लागलं असेल, नाहीतर खाली हवा कमी होती, गुंगी आली असेल."

ते दोघं मजूर वर आले आणि एका बाजूला जाऊन बसले. भिंतीला टेकून, आणि ते कुणाशीच काही बोलले नाहीत. नुसते बसून राहिले, शून्य नजरेनं समोर बघत. आणि निलयला ते खूप विचित्र वाटलं, पण त्यानं या घटनेला नाव दिलं ऊन, थकवा, आणि त्या बंद खोलीतला कार्बन डायऑक्साईड वायू. माणसं अशी वागतात कधीकधी, ऑक्सिजन कमी झाला की. डोकं गरगरतं, हातातून वस्तू गळून पडतात, माणूस सुस्त होतो.

पण दुपारपर्यंत नामाचंही काहीतरी भयंकर बिनसलं. विठ्ठलसारखा तो 'गेला' नव्हता, अजून तरी नाही. तो बोलत होता, थोडंफार कामही करत होता, पण मधेमधे तो अचानक पुतळ्यासारखा थांबायचा. एकदा तो दुपारच्या वेळी जेवायला बसला होता, हातात भाकरी आणि ठेचा होता, आणि मधेच त्यानं खाणं थांबवलं. हातातला घास तसाच धरून, तो शून्य नजरेनं

समोर बघत बसला. पूर्ण दोन मिनिटं. मग अचानक त्यानं आपली मान झटकली, जसं काही भयानक झोपेतून जागा झाल्यासारखी, आणि तो परत घाबरत खायला लागला. पण थोड्या वेळानं तो तसाच उठला आणि त्या देवळाच्या मागच्या पायऱ्यांकडं चालायला लागला, थेट त्या खालच्या अंधाऱ्या खोलीकडं, त्या बारवेकडं, हातात अर्धी भाकरी तशीच पकडून.

"नाम्या!" रघूनं धावत जाऊन त्याला दंडाला घट्ट धरून अडवला. "कुठं चाललास? जेवत व्हता ना."

नामा जागीच थांबला, गोंधळल्यासारखा. त्यानं खाली बघितलं, स्वतःच्या हातातल्या भाकरीकडं, जणू ती भाकरी तिथं कशी आली हे त्याला स्वतःलाच कळत नसावं. "मी... कुठं चाललो व्हतो?" त्यानं रघूला विचारलं, आणि त्याच्या आवाजात आता खरी, अस्सल भीती होती, कारण तो कुठे चाललाय हे त्याच्या स्वतःच्याच मेंदूला माहीत नव्हतं. "मले... मले सारखं खाली जावंसं वाटते रघू. का, माहीत नाई. डोस्क्यात कुनीतरी बलावते मले."

आणि हा प्रकार विठ्ठलपेक्षा वेगळा आणि जास्त भयंकर होता. कारण नामाला अजून 'कळत' होतं की स्वतःसोबत काहीतरी चुकीचं घडतंय. विठ्ठलचे डोळे पूर्ण रिकामे झाले होते, त्याला काहीच खटकत नव्हतं. नामा मात्र अजून स्वतःच्याच मनाशी लढत होता, अर्धवट, आणि तेच जास्त भीतीदायक होतं.

कारण त्याला स्वतः बुडताना दिसत होतं आणि तरीही स्वतःला थांबवता येत नव्हतं.

"बस इथं," रघूनं त्याला जवळजवळ ओढत नेऊन बसवलं, आपल्या शेजारी. "माझ्याजवळ बस. कुठं जायचं नाई." आणि नामा थरथरत बसला, पण त्याची नजर परत परत त्या उघड्या पायऱ्यांकडं जात होती, आणि तो ती नजर स्वतःशीच लढून ओढून परत आणत होता. पुन्हा पुन्हा. आणि ते दृश्य बघून निलयला जे मनोमन वाटलं, ते आता नुसत्या विषारी वायूनं किंवा उन्हानं समजावता येत नव्हतं.

निलयनं त्या दिवशीचं काम लवकर थांबवलं. "आज पुरे," तो रघूला म्हणाला. "सगळ्यांना घरी पाठव. उद्या मास्क, ब्लोअर, ऑक्सिजन सिलिंडर सगळं आणून मगच खाली उतरू. त्या खोलीत हवा नाही, आणि हे असं गुंगीत होतंय ते त्यामुळंच. उद्या व्हेंटिलेशन लावल्याशिवाय कुणी खाली जाणार नाही."

रघूनं मूकपणे मान हलवली, आणि मजुरांना घरी जायला सांगितलं. बाकीचे मजूर निघून गेले. पण विठ्ठल आणि नामा, ते दोघं जागचे हलले नाहीत लगेच. रघूनं जवळ जाऊन दोनदा हाक मारल्यावर ते उठले, आणि घराकडे गेले. अतिशय हळू, मोजकी पावलं टाकत, आणि जाताना सतत मागं वळून वळून त्या देवळाच्या मागच्या बाजूकडं बघत. आणि निलयला ते बघून एक

अस्वस्थता आली जी आता त्याच्या कोणत्याच वैज्ञानिक तर्कात बसत नव्हती.

"तू पण जा रघू," निलय म्हणाला. "पोरं वाट बघत असतील."

"जातो साहेब. हे सामान जरा आवरून जातो. सळ्या, पाईप, उघड्यावर टाकलं तर रातभर कुनी उचलून नेईल." रघूनं फारच संथपणे सामान गोळा केलं, एका कोपऱ्यात रचून ठेवलं, आणि मग खरंच तो निघाला, घराच्या दिशेनं, अंधार पडायच्या आत. निलयनं त्याला जाताना बघितलं, आणि त्याला जरा बरं वाटलं, कारण रघू घरी जाणं म्हणजे तो ठीक आहे. तो त्या बदललेल्या, गुंगीतल्या मजुरांसारखा नाही. तेवढ्यात त्याला मागे वडील उभे असलेले दिसले.

प्रकाश गुरुजी देवळाच्या दाराशी उभे होते, आणि ते त्या दोन मजुरांकडं बघत होते, त्यांच्या रिकाम्या डोळ्यांकडं, त्यांच्या मंद पावलांकडं. आणि त्यांच्या चेहऱ्यावर आश्चर्य नव्हतं. भीती होती, प्राचीन आणि खोल, पण आश्चर्य नव्हतं. ते हे सगळं आधी बघितल्यासारखे बघत होते, किंवा हे असंच होणार हे त्यांना आधीपासूनच माहीत असल्यासारखे.

"बाबा," निलय त्यांच्याजवळ गेला. "त्या खालच्या खोलीत वायू आहे बहुधा. मजुरांना श्वास घ्यायला त्रास होतोय. उद्या मी..."

"वायू नाई," प्रकाश गुरुजी हळू आवाजात म्हणाले, मजुरांच्या दूर जाणाऱ्या पाठीवरून नजर न हलवता. "त्यांनी पान्यात बगितलं." त्यांनी हळूच निलयकडं वळून बघितलं. "जो त्या पान्यात बगते, त्याले ती दिसते. आन जिले ती दिसते, ती तिचं होऊन जाते." त्यांचा आवाज कापत होता. "म्हून सांगत आले, त्या पान्यात बगायचं नाई. अभिषेकाचं पानी सोडायचं, वरून, बगायचं नाई कधी खाली. माझ्या बापानं मले तेच सांगितलं. बगु नको खाली, फक्त पानी सोड."

"बाबा, ते नुसतं प्रतिबिंब आहे. आरसा. पाणी खूप नितळ आहे म्हणून त्यांना स्वतःचाच चेहरा दिसला, आणि आधीच त्यांच्या अडाणी मनात भीती होती, म्हणून..."

"प्रतिबिंब," प्रकाश गुरुजी हळू म्हणाले, आणि त्यांनी हताशपणे मान हलवली, 'नाही' म्हणून. "जुनी माणसं सांगायची, त्या पान्यातलं प्रतिबिंब आपलं नसतं. ते बगते आपल्याकडं, पन ते आपण नसतो. ते वेगळं हसते, वेगळं हलते. आन एकदा का त्याच्याशी नजर भिडली, की ते आत ओढून घेते." त्यांनी निलयकडं बघितलं. "मले अर्थ ठाऊक नाई याचा. पन नेम हाच हाय. खाली बगायचं नाई."

प्रतिबिंब वेगळं हसतं. निलयला ते ऐकून जवळजवळ हसूच आलं, कडवट. हीच ती गोष्ट होती. शेकडो वर्षांची साचलेली अडाणी भीती, आजोबांकडून नातवाकडं, अर्थ न कळता नुसती

पुढं ढकललेली. आणि आता या आधुनिक जगातही, वीज आणि मोटारी आणि मोबाईल टॉवरच्या सावलीत, तीच म्हातारी आणि खुळचट भीती जिवंत होती. त्याच्या वडिलांना खरोखरच असं वाटत होतं की पाण्यातलं प्रतिबिंब स्वतःहून हलतं, हसतं. निलयनं ते मनातल्या मनात नाकारलं, पूर्णपणे. पाणी फक्त आरसा असतं. आरशात जे दिसतं ते आपणच असतो. एवढं साधं विज्ञान होतं. यात असं गूढ शोधणं म्हणजे विज्ञानाचा अपमान होता.

"उद्या रिपोर्ट येईल," तो एवढंच म्हणाला. "मग कळेल." पण त्याचा आवाज आज नेहमीसारखा ठाम आणि अहंकारी नव्हता, आणि वडिलांनी ते बरोबर ऐकलं. ते काही बोलले नाहीत, फक्त परत गाभाऱ्यात गेले, आणि निलयला तिथंच मागं सोडून, त्या मावळत्या उजेडात, त्या दोन मजुरांच्या दूर जाणाऱ्या आकृत्यांसोबत.

...

"हे नॉर्मल नाही, निलू."

प्रथमेश संध्याकाळी म्हणाला. ते दोघं भक्तनिवासाच्या अर्धवट बांधलेल्या ओट्यावर बसले होते, आणि समोर सूर्य डोंगरामागं उतरत होता. संपूर्ण गावात एक विचित्र आणि जड शांतता पसरली होती.

"काय नॉर्मल नाही?"

"ते मजूर. तू बघितलंस ना त्यांचे चेहरे. सकाळी ठीक होते, दुपारी असे... रिकामे. आणि तो नामा, पाण्याकडं जायचं म्हणत होता, पुन्हा पुन्हा." प्रथमेशनं डोळ्यांवरचा गॉगल काढला आणि हाताने डोळे चोळले. "मला ते आवडलं नाही यार. हे सगळं खूप क्रिपी वाटतंय."

"अरे ऊन लागलंय त्यांना. आणि खालची जागा शतकानुशतके बंद आहे, हवा नाही. विषारी वायू साचलाय तिथं, बहुधा कार्बन डायऑक्साईड, किंवा मिथेन, जुनं साचलेलं पाणी आहे ना. तो वायू हुंगला की डोकं सुन्न होतं, माणूस सुस्त होतो, गोंधळतो. ते तेच आहे. उद्या मी मास्क आणि व्हेंटिलेशनशिवाय कुणालाही खाली पाठवणार नाही."

"वायू." प्रथमेशनं त्याच्याकडं खूप रोखून बघितलं, आणि त्याच्या आवाजातली ती मस्करी आता गायब झाली होती. "निलू, वायूनं माणसाला सुस्ती येते, गुंगी येते. मान्य. पण नामाला वायूनं परत परत त्या पाण्याकडंच जावंसं का वाटेल? कुठलाही विषारी वायू माणसाला एका विशिष्ट जागेकडं ओढत नाही."

आणि या अत्यंत लॉजिकल प्रश्नावर निलयकडं कोणतंच उत्तर नव्हतं, आणि ते त्याला मुळीच आवडलं नाही. तो एक क्षण गप्प बसला. मग स्वतःचा बचाव करण्यासाठी म्हणाला, "सूचना. सजेशन. एकानं काहीतरी विचित्र केलं की बाकीचे तेच करतात, नकळत. सामूहिक मानसशास्त्र आहे ते. गावात आधीच या

जागेबद्दल भीती आहे, अंधश्रद्धा आहे. त्यांच्या मनात ती आधीच बसलीय. आपण शिळा उघडली, त्यांच्या मनातली भीती जागी झाली, आणि आता ते तसं वागतायत. मन आहे, प्रथमेश. मन शरीरावर परिणाम करतं. हे मी नाही म्हणत, विज्ञान म्हणतं."

प्रथमेश बराच वेळ काही बोलला नाही. मग म्हणाला, "तुला माहितीय तुझं काय चुककतंय? तुझ्याकडं प्रत्येक गोष्टीचं एक रेडिमेड उत्तर आहे. पाणी विचित्र आहे, ते खनिजं. माणसं विचित्र आहेत, ते वायू. वायूनं जमलं नाही, तर मास हिस्टेरिया. उद्या मानसशास्त्रानं जमलं नाही, तर तू आणखी काहीतरी थिअरी शोधशील." तो वैतागून उठला, आणि गॉगल खिशात टाकला. "कॉलेजातपण असंच होतं तुझं. सगळं गणितात बसवायचं. आणि बसायचंही, तुझ्यापुरतं. पण मला भीती त्याची वाटते की एखाद्या दिवशी तुला उत्तर सापडणार नाही, आणि तेव्हा तू काय करशील. कारण तुझ्याकडं फक्त उत्तरं आहेत निलू. उत्तर नसलं तर तुझ्याकडं काहीच नाही. यू विल ब्रेक."

"आणि तुझ्याकडं काय आहे? भीती?" निलयचा आवाज अचानक चढला, आणि तो चढला याचं त्याला स्वतःलाच नवल वाटलं, कारण तो व्यावसायिक जगात सहसा असा आवाज चढवत नसे. "हे बघ, मी इथं काम करायला आलोय. पूल, रस्ता, भक्तनिवास. माणसं यात्रेत सुरक्षित राहावी म्हणून. मी इथं भुतं शोधायला नाही आलो." तो थांबला, एक दीर्घ श्वास घेतला,

आणि आपला आवाज खाली आणायचा प्रयत्न केला. "तू जिओ-टेक्निकल कन्सल्टंट आहेस. मातीचे, पाण्याचे नमुने घे, रिपोर्ट दे, बिल घे. एवढं तुझं काम. बाकीचं माझ्यावर सोड."

तो जरा जास्तच जोरात बोलला होता, आणि दोघांनाही ते कळलं होतं. निलय सहसा असा बोलत नसे. त्याचा नेहमीचा आवाज थंड, मोजका, आणि पूर्णतः नियंत्रित असायचा. आज तो कापत होता, आणि तो जितका कापत होता, तितका निलय तो घट्ट धरून ठेवत होता, कारण तो तर्क सोडला तर मागं काय उरेल हे त्याला माहीत नव्हतं, आणि त्याला ते बघायचंही नव्हतं.

प्रथमेशनं त्याच्याकडं बघितलं, आणि त्याच्या चेहऱ्यावर काहीतरी आलं, दुखावल्यासारखं. कारण दोघांनाही कळलं होतं की निलयनं "तुझं काम एवढंच" म्हणून त्याला त्याची जागा दाखवली होती, मित्र म्हणून नव्हे, एक वरिष्ठ इंजिनिअर म्हणून. आणि ते दोघांमधलं जे न बोललेलं होतं, ते या एका वाक्यात बोललं गेलं होतं.

"बरं," प्रथमेश एवढंच म्हणाला. "तू म्हणतोस तसं."

तो तिथून निघून गेला, आणि निलय एकटा बसला, समोर सूर्य मावळताना बघत. प्रथमेशचं बोलणं त्याला वर्मी लागलं होतं, आणि त्यानं ते नेहमीसारखं बाजूला ढकलायचा प्रयत्न केला, पण आज पहिल्यांदा ते नीट बाजूला गेलं नाही. कारण तो जे म्हणाला ते अगदी खरं होतं. त्याच्याकडं प्रत्येक गोष्टीचं उत्तर

होतं. आणि प्रत्येक उत्तर स्वतःपुरतं बरोबर वाटत होतं, वेगळं वेगळं. पण ती सगळी उत्तरं एकत्र ठेवली, तर ती एका दिशेनं बोट दाखवत नव्हती. आणि एका चांगल्या अभियंत्याला हे पक्कं माहीत असतं की जेव्हा प्रत्येक भागाचं उत्तर आहे पण संपूर्ण चित्राचं नाही, तेव्हा कुठंतरी गणित चुकतंय. किंवा आपण चुकीचं समीकरण मांडतोय.

त्यानं तो अस्वस्थ करणारा विचार बाजूला ठेवला. उद्या मास्क, व्हेंटिलेशन, आणि पाण्याचा नमुना प्रयोगशाळेत. सगळं मोजता येईल. मोजलं की कळेल.

...

रात्री त्याला अचानक जाग आली.

का, ते कळलं नाही. घर पूर्ण शांत होतं, वडील झोपले होते. बाहेर फक्त रातकिडे. आणि ती ओवी. गजराबाई आज पुन्हा म्हणत होती, आणि आज तिचा आवाज जास्त स्पष्ट होता, अगदी जवळून येत होता, जणू ती आवाराच्या मधोमध येऊन बसली असावी. निलय उठला. पाणी प्यायला म्हणून, त्यानं स्वतःला खोटं कारण दिलं. पण तो सवयीनं दाराशी गेला, आणि त्यानं बाहेर आवारात बघितलं.

आणि त्याला रघू दिसला.

रघू परत आला होता.

संध्याकाळी तो सगळं आवरून घरी गेला होता, निलयनं स्वतः त्याला जाताना बघितलं होतं. पण आता, या मध्यरात्री, तो परत इथं होता. देवळाच्या मागच्या बाजूला, त्या उघड्या पायऱ्यांपाशी तो बसलेला होता. एकटा, मिट्ट अंधारात, थेट त्या बारवेच्या दिशेनं बघत. अगदी निश्चल. तो कधी परत आला, कसा आला, कुणाला न सांगता मध्यरात्री घराबाहेर कसा पडला, हे निलयला कळलं नाही. आणि त्याच्या त्या बसण्यात काहीतरी होतं जे मानवी आणि नैसर्गिक नव्हतं. कोणताही माणूस असा बसत नाही, इतका स्थिर, इतका वेळ, मध्यरात्री, एका काळ्या आणि अंधाऱ्या विहिरीकडं तोंड करून. जसं काही तो झोपेत चालत इथवर आला असावा, आणि झोपेतच तिथं बसला असावा. निलयनं त्याला हाक मारायला तोंड उघडलं, आणि तो जागीच थांबला, कारण रघूच्या बसण्यात काहीतरी असं होतं जे त्याला हाक मारू देईना.

तो हळू पावलं टाकत त्याच्याजवळ गेला. "रघू?"

रघूनं वळून बघितलं नाही. तो नुसता खालीच बघत होता, अंधाऱ्या खोलीत, जिथं ते काळं पाणी होतं.

"रघू, घरी नाही गेलास? पोरं वाट बघत असतील."

आणि रघू बोलला. खालीच बघत, त्याच सपाट आणि निर्जीव आवाजात जो आज दुपारी विठ्ठलचा होता, नाम्याचा होता. "पोरं," तो म्हणाला, हळू, जणू तो शब्द त्याला नवा

असावा, आठवत नसावा की पोरं म्हणजे नक्की काय. "हा... पोरं." तो थांबला. आणि मग, अजून खाली बघत, तो म्हणाला, "साहेब, त्या पाण्यात ना... खाली... कुनीतरी हाय. मले दिसलं. माझ्यासारखंच. माझ्याकडं बगत व्हतं. आन ते... ते मले बलावत व्हतं. हळू, हळू. म्हनत व्हतं, ये खाली, इथं बरं वाटते, इथं काई इचार नाई, काई ओझं नाई."

निलयच्या पाठीतून एक थंड लहर गेली. "रघू, ते तुझं प्रतिबिंब होतं. आरशात दिसतं तसं. पाणी खूप नितळ आहे ना, म्हणून."

रघू पहिल्यांदा वळला. आणि त्यानं थेट निलयकडं बघितलं, आणि त्याचे डोळे अंधारातही ओले आणि चमकते दिसले, आणि त्याच्या रापलेल्या चेहऱ्यावर एक अंधुकसं हसू आलं, आणि ते हसू रघूचं नव्हतं. ते परकं होतं.

"माझं प्रतिबिंब?" तो म्हणाला. "मंग ते हसलं का साहेब, मी नाई हसलो तवा?"

आणि निलयच्या पाठीच्या कण्यातून एक अंगावर काटा आणणारी थंडगार लहर खाली उतरली. कारण बरोबर दुपारी, याच शब्दांत, त्याचे वडील बोलले होते. *प्रतिबिंब वेगळं हसतं.* तेव्हा ते एक खुळचट आणि अडाणी अंधश्रद्धा वाटली होती, आणि निलयनं ती हसण्यावारी नेली होती. पण आता, या घनदाट अंधारात, तीच गोष्ट एका अशिक्षित मजुराच्या तोंडून आली होती.

ज्यानं आयुष्यात वडिलांशी दोन शब्दही बोलले नसतील, ज्याला ती गावातील आजीबाईंची जुनी गावकथा माहीत असण्याची शक्यताही नव्हती. एका शिकल्यासवरलेल्या पुजाऱ्यानं आणि एका अडाणी मुकादमानं, कधीही न बोलता, तोच भयंकर अनुभव अगदी त्याच शब्दांत सांगितला होता. आणि हे साधं नव्हतं. दोन वेगळ्या माणसांच्या मनात एकाच वेळी तीच भ्रांत उठणं, इतक्या नेमक्या शब्दांत, हे त्याच्या सामूहिक मानसशास्त्रानं समजावता येत नव्हतं. निलयनं स्वतःच्या मेंदूला समजावायचा प्रयत्न केला, आणि यावेळी एकही उत्तर आलं नाही. त्याचं इंजिनिअरिंगचं डोकं संपूर्णपणे रिकामं राहिलं.

आणि तो रघू परत वळला, आणि परत त्या पाण्याकडं बघत बसला, आणि त्यानं पुन्हा निलयकडं बघितलंही नाही.

निलयनं त्याला परत हाक मारली. रघू अजिबात हलला नाही. त्यानं परत हाक मारली, जरा जोरात. काही नाही. तो दगडाच्या पुतळ्यासारखा बसून होता, त्या अंधाऱ्या पायऱ्यांकडं तोंड करून, आणि त्याची पाठ निलयकडं होती. आणि ती पाठ श्वास घेत होती, एवढंच त्याच्या जिवंतपणाचं एकमेव चिन्ह उरलं होतं.

निलय पुढे सरसावला. त्याला रघूला दंडाला घट्ट धरून तिथून उठवायचं होतं, ओढून त्याच्या घरी न्यायचं होतं. त्यानं रघूच्या खांद्याला हात घातला आणि पूर्ण ताकदीनिशी त्याला वर ओढण्याचा प्रयत्न केला. पण रघूचं शरीर जागचं हललं नाही. ते

अनैसर्गिकरीत्या जड लागलं, एखाद्या अवाढव्य दगडासारखं, जमिनीला घट्ट खिळल्यासारखं. एका सामान्य माणसाचं शरीर इतकं जड असूच शकत नाही, हे भौतिकशास्त्राला माहीत होतं. निलयच्या हातातील ताकद अपुरी पडली, आणि त्या एका अकल्पित स्पर्शानं निलयचा संयम सुटला. त्याला अचानक प्रचंड भीती वाटली, अशी भीती जी त्याच्या शरीराच्या प्रत्येक पेशीत भिनली.

त्यानं झटकन रघूचा खांदा सोडला आणि तो भीतीनं दोन पावलं मागं सरकला. त्याचे हात थरथर कापत होते. तो तसाच मागं फिरला, आणि वडिलांच्या घराकडं वेगाने चालायला लागला. वाटेत त्यानं थरथरत्या हाताने आपला फोन काढला, आणि नागपूरला त्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्याला मेसेज टाईप करायला सुरुवात केली. *साईटवर सुरक्षेचा प्रश्न. काम दोन दिवस थांबवावं लागेल. कारण...* त्यानं टाईप केलं, आणि तो थांबला. कारण काय, हे लिहायला त्याच्याकडं शब्द नव्हते. "पाण्यात वायू" असं त्यानं लिहिलं, मग स्वतःच खोडलं. मग परत लिहिलं. मग फोन खिशात टाकला, कारण कुठंही रेंज नव्हती, आणि तो मेसेज कुठंच जाणार नव्हता, आणि हे त्याला पक्कं माहीत होतं. आणि तरीही त्यानं तो निरर्थक मेसेज टाईप केला होता, कारण टाईप करणं ही एक 'नॉर्मल' कृती होती, आणि कोणतीही कृती करत असताना माणसाला या अथांग भीतीचा विचार करावा लागत नाही.

तो घरात आला. दार लावून घेतलं. आणि अंधारात तसाच बसून राहिला. बाहेरून रघूची ती दगडासारखी पाठ त्याला दिसत नव्हती, पण ती तिथंच आहे हे त्याला स्पष्ट जाणवत होतं. त्या पायऱ्यांशी, त्या काळ्या पाण्याकडं बघत, त्या मिट्ट अंधारात.

* * *

प्रकरण पाच : ओवी

डोळां डोळां भरे । पाहुण्या आधी पावे ।

त्या रात्री निलयला काही केल्या झोप लागली नाही.

तो सतरंजीवर पडून होता. डोळे घट्ट मिटले, की त्याला मिटलेल्या पापण्यांच्या आत रघूची ती पाषाणासारखी पाठ दिसायची. त्या अंधाऱ्या पायऱ्यांशी, अथांग काळोखात त्या काळ्या बारवेकडं बघत बसलेला रघू. आणि अस्वस्थ होऊन डोळे उघडले, की समोर घराचं जुनाट छत दिसायचं. छतावर तसं काहीच नव्हतं, पण तरीही त्या अंधारात वर छताकडं एकटक बघताना त्याला सतत अशी अनामिक भीती वाटत राहायची की आत्ता अचानक तिथून कुणीतरी आपल्याकडं खाली डोकावून बघताना दिसेल.

आणि मग, त्या अस्वस्थतेच्या गर्तेतून, कुठूनतरी जुनी आठवण आली. अगदी स्पष्ट आणि पूर्ण.

तो तेव्हा जेमतेम आठ वर्षांचा होता. कडक उन्हाळ्याचे दिवस होते, दुपार चांगलीच तापलेली होती, आणि अख्खं गाव उन्हाच्या तडाख्याने सुस्त पडून होतं. वडील आतल्या गाभाऱ्यात दुपारच्या पूजेत मग्न होते, आणि लहानगा निलय बाहेरच्या आवारात एकटाच खेळत होता. दगडांवरून उड्या मारत तो देवळाच्या मागच्या बाजूला गेला, आणि तेव्हा त्या जुन्या

फरशीवर त्याला गजराबाई बसलेली दिसली. त्याच्या आठवणीत ती तेव्हाही आजच्यासारखीच म्हातारी होती. इतकी म्हातारी, की लहान निलयला नेहमी वाटायचं ती कधी तरुण नव्हतीच, ती या देवळाच्या दगडांसारखीच मुळातून जुनी आणि रापलेली होती. तिनं अचानक त्याला हाक मारली होती. त्याच्या स्वतःच्या नावानं, अतिशय हळू आवाजात. आणि लहान निलय कसलाही विचार न करता तिच्या जवळ गेला होता, कारण लहान मुलांना अजून कुणाची भीती वाटावी आणि कुणाला टाळावं, हे जगाने शिकवलेलं नसतं.

तिनं त्याचा कोवळा हात आपल्या हातात धरला होता. तिचा हात राठ होता, आणि उन्हाळ्याच्या त्या तापलेल्या दुपारीही तिचा स्पर्श बर्फासारखा थंडगार होता. तिच्या सुरकुतलेल्या बोटांवर ते निळ्या रंगाचं जुनं गोंदण होतं. आणि मग तिच्या एका बोटानं तिनं त्याच्या उघड्या तळहातावर हळूहळू काहीतरी आकार काढायला सुरुवात केली. एक गोल, आणि त्या गोलाच्या आत काही रेषा. पुन्हा पुन्हा, तोच एकच आकार ती त्याच्या तळहातावर बोटाने घोटत होती. आणि मग ती म्हणाली होती, इतकं हळू की तो आवाज फक्त त्याच्याच कानांत जावा: "तुझ्या रगतात हाय बाळा. तुझ्या घराण्यात. एक दिस तुले खाली जावं लागंल, त्या पान्याकडं. आन तवा तू आरशात बगू नको. जे बगते ते तू नाई. बगलास तर तीच तू व्हशील, आन खरा तू इथं नाई ऱ्हाशील." आणि मग तिनं त्याचा हात अचानक सोडून दिला

होता, आणि ती परत आपली जुनी ओवी घोकायला लागली होती, जणू काही ती आत्ता त्याच्याशी बोललीच नव्हती.

आणि तो आठ वर्षांचा निलय प्रचंड घाबरून रडत तिथून घराकडे पळाला होता. गजराबाई नक्की काय म्हणाली, हे त्याला तेव्हा काहीच कळलं नव्हतं, त्याला फक्त तिच्या त्या थंडगार स्पर्शातून आणि शब्दांतून आलेली एक भयावह भीती कळली होती, थेट हाडांतून शिरणारी. त्या दिवशी रात्रभर त्याला कडाक्याचा ताप आला होता. तापाच्या त्या गुंगीत तो रात्रभर काहीतरी बडबडत होता. 'ते बघतंय... डोळे... ते डोळे माझे नाहीत...' असं काहीतरी तो भीतीने पुटपुटत होता. वडिलांना वाटलं की पोराने दिवसा खेळताना नक्कीच एखादं भयंकर दुःस्वप्न पाहिलं असेल, म्हणून त्यांनी त्याला नुसतंच थोपटून जवळ घेतलं होतं. आणि दुसऱ्या दिवशी सकाळी जेव्हा तो ताप उतरला, तेव्हा निलयला त्या रात्रीतलं काहीच आठवत नव्हतं, किंवा कदाचित त्याच्या मेंदूला ते जाणीवपूर्वक आठवायचंच नव्हतं. त्यानं ती भीतीदायक घटना स्वतःच्या मनाच्या अगदी तळाशी खोलवर गाडून टाकली होती.

आणि तो खरंच ते सगळं विसरला होता. तेरा वर्षं, किंबहुना त्याहूनही जास्त काळ तो ती आठवण विसरून राहिला होता. आणि कदाचित तीच विसरण्याची आणि पळून जाण्याची प्रबळ इच्छा त्याला या गावापासून दूर घेऊन गेली होती. शहरात,

आकड्यांच्या विश्वात, आणि विज्ञानाच्या अशा एका सुरक्षित जगात जिथं म्हाताऱ्या बाया लहान मुलांच्या तळहातावर अदृश्य आकार काढून भविष्य सांगत नाहीत. पण आता ते गाडलेलं सगळं अचानक परत आलं होतं. तळहातावरचा तो गोल आकार, आणि आतल्या त्या रेषा. आता, या क्षणी, या अंधारात पडून असताना त्याला प्रकर्षाने जाणवलं की तोच आकार त्यानं परत बघितला होता. काल. त्या शिळेवर. तीच झिजलेली नक्षी. गोल, आणि आत रेषा.

तो झटकन उठून बसला. त्याच्या छातीत प्रचंड धडधड होत होती. हा निव्वळ एक योगायोग आहे, त्यानं स्वतःच्या तार्किक मनाला सांगायचा आटोकाट प्रयत्न केला. लहानपणी हातावर जाणवलेला तो आकार, आणि काल शिळेवर बघितलेला आकार, दोन्ही गोल असणं, यात नवं आणि आश्चर्यकारक असं काय आहे? जगात किती तरी गोष्टींचे आकार गोल असतात. पण त्याचा हा वैज्ञानिक युक्तिवाद आज त्याच्याच तोंडात फारच कोरडा पडला. कारण त्याला पक्कं माहीत होतं की तो स्वतःशीच खोटं बोलतोय, स्वतःचीच फसवणूक करतोय. आणि आयुष्यात पहिल्यांदाच, स्वतःशी बोललेलं खोटं त्याला खोटं म्हणून इतक्या स्पष्टपणे जाणवत होतं.

बाहेर आवारात गजराबाईची ती भणभण करणारी ओवी अजूनही चालूच होती.

पूर्ण तेरा वर्षं त्यानं या म्हातारीला जाणीवपूर्वक टाळलं होतं. काल या गावात शिरतानाही तिला बघून त्यानं आपली नजर मुद्दाम वळवली होती, तिचं ते पुटपुटणं "म्हातारीची बडबड" म्हणून सोडून दिलं होतं. तिच्याकडं पुन्हा जाणं म्हणजे बालपणीची ती दबलेली भीती 'खरी' मानणं होतं, आणि ते त्याच्या इंजिनिअरिंगच्या अहंकाराला परवडणारं नव्हतं. कारण एकदा ती भीती खरी मानली, की मग या गावातलं सगळंच खरं मानावं लागणार होतं, आणि "सगळं" म्हणजे नक्की काय, हे त्याला अजून उघड्या डोळ्यांनी बघायचंही नव्हतं.

पण आज रात्री त्याचे पाय आपोआप दाराकडं वळले. कारण त्या म्हातारीकडं काहीतरी ठोस उत्तर होतं, आणि त्याच्याकडं आता स्वतःला समजवण्यासारखं एकही उत्तर उरलं नव्हतं. आयुष्यात पहिल्यांदाच तो उत्तराच्या शोधासाठी विज्ञानाकडं नव्हे, तर गावानं "वेड्या" ठरवलेल्या बाईकडं चालला होता. हे त्याच्या सुशिक्षित अहंकाराला बोचत होतं, पण आज त्याची भीती त्याच्या अभिमानापेक्षा खूप मोठी झाली होती.

तो घराबाहेर आला. रात्रीचे दोन-अडीच वाजले असावेत. संपूर्ण आवार मिट्ट अंधारात बुडालं होतं, फक्त देवळाच्या गाभाऱ्यातून तो अनामिक मंद उजेड बाहेर पडत होता. कोपऱ्यात, तिच्या नेहमीच्या दगडावर गजराबाई बसली होती,

आणि ती एकटीच अंधारात बोलत होती, ओवीच्या ओळी, पुढे-मागे करत.

रघू आता तिथं नव्हता. निलयनं काळजीने त्या अंधाऱ्या पायऱ्यांकडं बघितलं, आणि तिथं रघूची आकृती दिसली नाही, आणि त्या रिकाम्या जागेनं त्याला समाधानाऐवजी जास्तच अस्वस्थ केलं. रघू कुठं गेला? शेवटी घरी गेला? की खाली, त्या काळ्या पाण्याकडं उतरला? त्यानं तो भयंकर विचार डोक्यात पुढे जाऊच दिला नाही. तो गजराबाईकडं वळला.

तो तिच्याजवळ गेला. गुडघ्यावर वाकला. आणि पहिल्यांदा, तब्बल तेरा वर्षांनंतर, त्यानं तिच्याकडं अगदी नीट लक्ष देऊन बघितलं. तिचे ते गोंदलेले हात, कोपरापर्यंत पसरलेलं रेषांचं ते जुनं गोंदण, जे गावातल्या कुणाच्याही हातावर नव्हतं. ते रानातलं, आदिवासी गोंदण होतं. आणि तिचे डोळे, जे आत्ता, या अंधारात, त्याच्यावर येऊन स्थिरावले, त्यात वेड अजिबात नव्हतं. ते डोळे कधीच वेड्या माणसाचे नव्हते, हे त्याला आता अगदी लख्खपणे कळलं. फक्त गावाला तिला 'वेडं' म्हणायची सोय हवी होती, कारण ती जे सत्य सांगत होती ते खरं मानणं म्हणजे स्वतःच्या अस्तित्वावरचा खूप भयंकर घाव मानणं होतं, आणि त्यापेक्षा एका बाईला वेडं मानून मोकळं होणं हे गावाला नेहमीच सोपं गेलं होतं.

"गजराबाई," तो म्हणाला, आणि त्याचा स्वतःचाच आवाज त्याला खूप परका आणि कातर वाटला. "तू मला लहानपणी काहीतरी सांगितलं होतंस. हातावर काढलं होतंस. आठवतंय?"

म्हातारी एकदम थांबली. तिचे हात, जे सतत काहीतरी दळल्यासारखे यांत्रिकपणे हलत होते, तेही थांबले. तिनं त्याच्याकडं बघितलं, बराच वेळ ती बघत राहिली, आणि त्या बघण्यात एक प्रकारची थकलेली ओळख होती. मग ती म्हणाली, "आठवलं का तुले शेवटी." तिच्या आवाजात समाधान किंवा आनंद नव्हता, आणि कोणतंही दुःखही नव्हतं. फक्त एक अथांग थकवा होता, इतका जुना की तो आता तिच्या हाडांचाच भाग झाला होता. "मी म्हटलं व्हतं तवाच, आठवंल एक दिस. उशीरा आठवते, पन आठवते. नेहमी उशीरा आठवते. तेवढाच शाप हाय."

"काय होतं ते? तू काय काढलंस माझ्या हातावर?"

तिनं त्याच्या प्रश्नाचं थेट उत्तर दिलं नाही. त्याऐवजी तिनं स्वतःच्याच लयीत ओवीची एक ओळ म्हटली, हळू, आणि विशिष्ट चालीत. "डोळां डोळां भरे." आणि मग, त्या ओळीचा अर्थ स्वतःशीच फोडत असल्यासारखी म्हणाली, "जो त्यात बगते, त्याच्या डोळ्यात ती भरते. डोळ्यातनं आत जाते. डोळां डोळां. म्हून सांगते, बगू नको. एकदा डोळा भिडला, की सुटका नाई."

"ते मला कळत नाही. सरळ सांग."

"सरळ?" ती हसली, दात नसलेल्या मोकळ्या हिरड्यांनी, आणि तिचं ते हसू भीतीदायक नव्हतं, ते खूप दयनीय होतं. "सरळ सांगून बगितलं बाळा. आयुष्यभर सरळ सांगते. माझ्या आजीनं सरळ सांगितलं, तिच्या आजीनं. कुनी ऐकलं नाई कधी. सगळ्याईनी येडी म्हनलं. तुझ्या बापाच्या बापानं बी मले हाकलायचा प्रयत्न केला, पन हाकलता आलं नाई त्याले, भ्याला. मंग मी सरळ सांगनं सोडलं. आता ओवीत सांगते. जिले ऐकायचं त्याले कळते, जिले नाई त्याले नाई. आन तू आजवर नाई ऐकनाऱ्यातला व्हतास." तिनं त्याच्याकडं रोखून बघितलं. "आज ऐकाया आलास. म्हंजे तुले दिसाया लागलं. आरशातलं दिसाया लागलं. मंग आता उशीर झाला."

निलय एकदम गप्प बसला. कारण त्याच्याकडं आता यावर बोलायला कोणतेच शब्द नव्हते. तिचं बोलणं खोडून काढणारा एकही तार्किक युक्तिवाद त्याला आत्ता सुचत नव्हता, आणि स्वत:कडे उत्तर नसणं हे त्याच्यासाठी अत्यंत नवं होतं, आणि नवं असल्यामुळेच ते जास्त भीतीदायक होतं.

"ती शिळेवरची अक्षरं," तो शेवटी एका आशेने म्हणाला. "ती कुठली भाषा आहे? मराठी नाही. मोडी नाही."

गजराबाईच्या चेहऱ्यावर काहीतरी सूक्ष्मपणे बदललं. ती किंचित पुढं झुकली. आणि तिनं एक शब्द उच्चारला, जो निलयनं

आयुष्यात आधी कधीही ऐकला नव्हता. तो शब्द मराठी नव्हता, किंवा त्याच्या ओळखीच्या कुठल्याच संस्कारीत भाषेतला नव्हता. तो एक जुना, थेट घशातून येणारा खरखरीत शब्द होता. मग ती म्हणाली, "ही भाषा गावाची नाई. गाव यायच्या आधीची. रानातल्या लोकाईची. कोरकूची. त्यांले माहीत व्हतं, या जागी काय हाय. त्यांनी तिले झोपवली, त्यांच्या नेमानं. मंग गाव आलं, देऊळ बांधलं, त्यांचं झोपवनं घेतलं आन आपलं नाव दिलं. पूजा म्हनले त्याले. पन मूळ त्यांचं. मूळ रानाचं."

आणि हे ऐकताच निलयच्या पाठीच्या कण्यातून एक थंडगार लहर खाली उतरली. त्याचा इंजिनिअरिंगचा आणि शहरी मेंदू सुरुवातीला हे मानायला मुळीच तयार नव्हता. कारण हे त्याच्या आजवरच्या सगळ्या समजुतीच्या पूर्णपणे उलट होतं. आदिवासी लोक नेहमी मागासलेले आणि अंधश्रद्ध असतात, आणि सुधारलेलं गाव, इथलं देऊळ आणि इथली संस्कृती ही पुढारलेली असते, हे त्यानं आयुष्यभर एक गृहीतक म्हणून धरून ठेवलं होतं. आणि आता ही म्हातारी सांगत होती की खरं वैज्ञानिक आणि तांत्रिक ज्ञान त्या "मागासलेल्या" रानातल्या लोकांकडं होतं! पण मग, त्याच्या तार्किक मेंदूत एक दुसराच विचार चमकला. त्याने समाजशास्त्रात कुठंतरी वाचलं होतं की, प्रगत म्हणवणाऱ्या संस्कृती नेहमी स्थानिक आदिवासींच्या देवता, त्यांची मूळ ठिकाणे आणि त्यांच्या प्राचीन प्रथांचं 'ब्राह्मणीकरण' करून

त्यांना स्वतःच्या व्यवस्थेत सामावून घेतात आणि मूळ मालकांना बाजूला सारतात.

इतिहासाच्या पुस्तकात जे निव्वळ एक 'सामाजिक सत्य' म्हणून नोंदवलेलं होतं, ते आज इथं एका भयानक भौतिक वास्तवाच्या रूपात त्याच्यासमोर उभं होतं. त्याचा सुशिक्षित, उच्चवर्णीय अहंकार दुखावला गेला होता, पण त्याचा इंजिनिअरिंगचा मेंदू त्या म्हातारीच्या बोलण्यातला तो अभेद्य 'तर्क' नाकारू शकत नव्हता. गावानं खरंच त्यांचं झोपवणं चोरलं होतं, त्याचा मूळ तांत्रिक अर्थ हरवून बसले होते, आणि त्याला निव्वळ एक कर्मकांड बनवून स्वतःचं म्हटलं होतं. गाव त्या प्राचीन ज्ञानावर बसलं होतं, ते वापरत होतं, आणि ज्यांच्याकडून ते आलं त्यांना मात्र मागासलेलं म्हणत होतं.

"जर हे कोरकूंचं होतं," निलयनं हळू आवाजात विचारलं, "तर मग अभिषेक... रोजचा अभिषेक... तोही त्यांचाच?"

गजराबाईनं त्याला थेट उत्तर देणं टाळलं. ती परत आपल्या ओवीकडं वळली. "जळ निवळो नेदी कदा," ती म्हणाली, आणि थांबली. मग, स्वतःशीच अर्थ उलगडल्यासारखी म्हणाली, "हलतं ठेव. रोज ठेव. थांबलं की जागी होते. निवळलं की डोळे उघडते." ती आपले हात हवेत हलवत राहिली, काहीतरी दळल्यासारखे. "रानातल्या लोकाईले काऊन ठाऊक व्हतं. तुझ्या घराण्याले फक्त कसं. नुसतं कसं. काऊन नाई." ती कडवटपणे हसली.

"नाव बदललं त्यांनी. रीत ठेवली, अर्थ फेकून दिला. पूजा म्हनले. तुझा बाप रोज तेच करतो, आन त्याले माहीतबी नाई तो काय राखतो."

निलयला आता हे सगळं तुकड्यातुकड्यांत जोडावं लागत होतं, आणि ते जोडता जोडता त्याच्या पोटात एक थंड गोळा तयार होत होता. पाणी हलतं ठेवायचं. थांबलं की ती जागी होते. अभिषेक म्हणजे तेच, ज्याचा मूळ अर्थ हरवलाय. आणि काल... काल त्यानं स्वतः तो अभिषेक थांबवला होता.

"आन जो घाटे काऊन इचारतो," गजराबाई पुढं स्वतःशीच पुटपुटली, "त्याले पुसून टाकतात. त्र्यंबकसारखं."

"आणि त्र्यंबक?" निलयनं झटकन विचारलं. तो शब्द तिच्या तोंडून ऐकल्यावर त्याच्या मनात कुठंतरी हुकासारखा अडकून बसला. "तू आत्ता म्हणालीस. त्र्यंबकसारखं. कोण होता तो?"

गजराबाई एकदम गप्प झाली. तिचे हात, जे मघापासून सतत हलत होते, तेही थांबले. एक क्षण तिला वाटलं असावं की आपण चुकून काहीतरी जास्तच बोलून गेलो, कारण तिच्या सुरकुतलेल्या चेहऱ्यावर काहीतरी आलं, अगदी भीतीसारखं. मग तिनं निलयकडं बघितलं, बराच वेळ बघत राहिली, आणि मग पक्कं ठरवल्यासारखं ती म्हणाली, जणू आता हे सत्य सांगून टाकावंच. "त्यानं ऐकलं. रानातल्या लोकाईचं ऐकलं. त्यानं ओळखलं की गाव खोटं सांगते, की मूळ रानाचं हाय. आन त्यानं

ते गावाले सांगायचा प्रयत्न केला. सांगितलं की ही देवी आपली नाई, हिले नीट झोपवायचं तर रानाची रीत पाळावी लागते." ती श्वास घेण्यासाठी थांबली. "मंग तुझ्याच घराण्यानं त्याले वाळीत टाकलं. येडा ठरवला. आन त्याचं नाव पुसलं, सगळ्या कागदातनं, सगळ्या तोंडातनं. जसं तो कधी व्हताच नाई." तिनं निलयकडं भेदक नजरेने बघितलं, आणि तिच्या डोळ्यात आता अतिशय स्पष्ट भीती दिसत होती. "तो बी असाच खाली गेला व्हता, बाळा. त्यानं बी आरशात बगितलं व्हतं. आन जे बगितलं ते सांगाया आला, आन कुनी ऐकलं नाई. तुझ्यासारखाच. घाटेच्या रगतात हाय हे. खाली जानं, बगनं, आन कुनाले तरी सांगायचा प्रयत्न करनं. पन कुनी ऐकत नाई."

आणि तिनं परत आपली ओवी सुरू केली, तीच ओळ, पुन्हा पुन्हा, "पाहुण्या आधी पावे... पाहुण्या आधी पावे..." आणि तिचा आवाज आता नेहमीपेक्षा जास्त जलद झाला होता, खूप अस्वस्थ, जसं काही तिला आता काहीतरी घाईनं सांगायचं होतं पण योग्य शब्द सापडत नव्हते.

"पाहुणा म्हणजे कोण?" निलयनं विचारलं. एक अनामिक आणि अंगावर येणारी भीती त्याच्या पोटात उठली होती. "गजराबाई, पाहुणा कोण?"

पण ती फक्त तीच एक ओळ घोकत राहिली, शरीराने पुढं-मागं होत, आणि तिनं परत त्याच्याकडं बघितलं नाही. आणि

निलयला कळून चुकलं की या रात्री ती आता यापुढे आणखी एकही शब्द बोलणार नाही.

तो घरात परत आला, पण तो झोपला नाही. त्याला ते 'त्र्यंबक' नाव तपासायचं होतं, आणि बाहेरच्या देवस्थान ट्रस्टच्या कागदात ते अजिबात सापडणार नाही हे त्याला चांगलंच कळत होतं. कारण ट्रस्ट फक्त पन्नास-साठ वर्षांचा होता, आणि त्र्यंबक त्याहून कितीतरी पिढ्या जुना होता. जर तो पुरावा कुठं असेलच, तर तो या घरातच असेल. वडिलांच्या खासगी वस्तूंत.

आणि निलयला नेमकं माहीत होतं की कुठं बघायचं. घरातल्या माजघरात, एका अंधाऱ्या कोपऱ्यात, एक जुनी, गंजलेली लोखंडी ट्रंक होती. वडिलांची खासगी पेटी, जिला त्यानं लहानपणापासून कधीही उघडलेलं बघितलं नव्हतं. त्यात घराण्याच्या जुन्या गोष्टी, पोथ्या, मोडी कागद आणि वंशावळ ठेवलेली असायची. वडील पलीकडच्या खोलीत गाढ झोपले होते. निलय अतिशय सावध पावलांनी त्या ट्रंकेजवळ गेला. त्यानं ती ट्रंक हळूच उघडली. तिची गंजलेली कडी थोडी करकरली, आणि तो जागीच श्वास रोखून थांबला, वडील जागे होतात का याचा कानोसा घेत. ते अजिबात हलले नाहीत. त्यानं खिशातली टॉर्च हातात घेतली.

खोलीत मिट्ट अंधार होता. जर त्यानं टॉर्च तशीच लावली असती, तर त्याचा उजेड खोलीभर पसरून वडिलांना नक्कीच

जाग आली असती. तो उजेड बाहेर कुठेही पसरू नये म्हणून त्यानं ट्रंकेत ठेवलेलं जुन्या पोथ्यांवरचं एक जाड आणि धुळीने माखलेलं कापड स्वतःच्या आणि टॉर्चच्या वर ओढून घेतलं. एका छोट्या तंबूसारखं. त्या कापडाच्या आत फारच कोंदट आणि कुबट हवा होती, श्वास घेणं खूप जड जात होतं, पण वडिलांना जाग येऊन प्रश्नांना सामोरं जाण्यापेक्षा हे गुदमरणं त्याला परवडणारं होतं. त्यानं त्या अंधाऱ्या तंबूत टॉर्चचा उजेड पाडला.

आत जुन्या पोथ्या होत्या, लाल कापडात गुंडाळलेल्या, आणि जुने कागद, आणि एक जीर्ण झालेली वही. त्यानं ती वही बाहेर काढली, अतिशय हळू, तिची जीर्ण पानं फाटू न देता. हे सगळं करताना त्याला एखाद्या चोरासारखं आणि अपराध्यासारखं वाटत होतं. स्वतःच्या वडिलांच्या वस्तू त्यांच्या नकळत रात्रीच्या वेळी चाळणं हे त्याच्या तत्त्वात बसत नव्हतं, पण आजची गरज त्याहून खूप मोठी होती. त्याला ते त्र्यंबकचं नाव कोणत्याही परिस्थितीत हवं होतं.

बराच वेळ त्याला त्यात काहीच सापडलं नाही. जुन्या पोथ्या, कुळाचाराच्या दैनंदिन नोंदी, कुणाच्यातरी लग्नाची पत्रिका, जुनी पत्रं. घराण्याची शतकांची जमापुंजी, जी तिथं नुसती धूळ खात पडलेली होती. आणि हे सगळं बघताना निलयला जरा बरं वाटायला लागलं होतं, कारण या सगळ्या वस्तू सामान्य होत्या, आणि सामान्य गोष्टी त्याला नेहमीच सुरक्षित वाटायच्या.

आणि मग, त्या जीर्ण वहीची काही पानं उलटल्यावर, त्याला ती वंशावळ सापडली. घाटे घराण्यातल्या पिढ्यांची नावं, एकाखाली एक अशी क्रमाने लिहिलेली. कोण कधी मुख्य पुजारी झाला, कोणत्या वर्षी, हे सगळं मोडी लिपीत लिहिलेलं होतं. निलयला मोडी लिपी सलग वाचता येत नव्हती, पण आडनावं आणि नावं तो अडखळत का होईना, वाचू शकत होता. त्यानं ती यादी वाचायला सुरुवात केली, वरपासून खाली, पिढी दरपिढी, आणि त्या प्राचीन कागदावर स्वतःचं आडनाव पिढ्यानपिढ्या कोरलेलं बघून त्याला एक खूप विचित्र भावना आली, जी त्यानं आयुष्यात आधी कधीच अनुभवली नव्हती. ही त्याचीच माणसं होती. हे रक्त त्याच्याच रक्तात होतं, त्यानं या गावाला आणि श्रद्धेला कितीही नाकारलं तरी तो या साखळीचाच एक भाग होता.

आणि त्याच पानावर एका ठिकाणी, बरोबर मधोमध, एक ओळ अत्यंत निर्दयीपणे खरवडलेली होती.

तिथं एका पिढीचं नाव, शाईनं लिहिलेलं होतं, आणि मग कुणीतरी ते हिंस्त्रपणे खरवडून टाकलं होतं. स्वतःच्या नखानं, किंवा एखाद्या टोकदार चाकूनं, किंवा धारदार दगडानं. इतक्या जोरात आणि इतक्या वेळा ते खरवडलं होतं की तो जुना कागद तिथं पातळ झाला होता, झिजला होता, अगदी फाटायला आला होता. कुणीतरी हे नाव नुसतं रेष मारून खोडलं नव्हतं. कुणीतरी

ते नाव इतिहासातूनच कायमचं मिटवण्याचा एक भयंकर आटापिटा केला होता. रागानं, किंवा प्रचंड भीतीनं, किंवा कदाचित दोन्ही भावनांनी. पण इतकं खरवडूनही, उरलेल्या शाईच्या पुसट खुणांत, आणि कागदावर लेखणीनं उमटलेल्या दाबाच्या त्या बारीक रेषांत, काही अक्षरं अर्धवट दिसत होती. निलयनं आपली टॉर्च कागदाच्या अगदी जवळ नेली, तो कागद थोडा तिरका धरला, आपले डोळे बारीक केले, आणि त्या उजेड-सावलीच्या विशिष्ट कोनात ती लपलेली अक्षरं अचानक उमटून वर आली.

त्र्यं... क घाटे.

ते नाव पुसलं होतं, पण ते पूर्णतः गेलं नव्हतं. आणि त्या नावाखाली, पुढच्या पिढीचं नाव लगेचच सुरू होत होतं. मध्ये कुठलीही मोकळी जागा न सोडता. जणू ती मधली पिढी कधी अस्तित्वातच नव्हती, जणू एका जिवंत माणसाला इतिहासाच्या पानातून कापून काढलं होतं आणि त्या जखमेच्या दोन कडा कुणीतरी घट्ट एकत्र शिवून टाकल्या होत्या. एक पूर्ण आयुष्य, एक जिवंत माणूस, एक देवळाचा मुख्य पुजारी, त्याच्याच घराण्यातला, आणि त्याला इतक्या पद्धतशीरपणे पुसलं होतं की तो आता फक्त एका खरवडलेल्या ओळीच्या रूपात उरला होता. एका भळभळत्या जखमेच्या रूपात.

निलय त्या ओळीकडं सुन्न होऊन बघत राहिला. बराच वेळ. आणि तरीही त्याच्या डोक्यात त्याची ती नेहमीची यंत्रणा सुरू झाली, या गोष्टीला काहीतरी तार्किक उत्तरं शोधायला. घराण्यातलं एखादं मोठं भांडण असेल. जमिनीचा किंवा वारशाचा वाद असेल. एखाद्या पुजाऱ्यानं धर्म सोडला असेल, किंवा काही मोठा गुन्हा केला असेल, आणि घराण्यानं स्वतःची लाज वाचवण्यासाठी त्याचं नाव असं पुसलं असेल. शंभर साधी, माणसांची आणि व्यवहाराची कारणं होती, आणि त्यातलं कोणतंही एक कारण खरं असू शकत होतं.

पण यावेळी त्यातलं एकही कारण त्याच्या तार्किक मनात टिकलं नाही. ती उत्तरं त्याच्या डोक्यात येत होती आणि लगेच विरत होती, एखाद्या धुरासारखी, हातात न राहणारी. कारण त्याला मनोमन माहीत होतं, कुठंतरी खूप खोल, थेट हाडांच्या पातळीवर, जिथं त्याचे आकडे आणि तर्क पोचत नाहीत, की ती गजराबाई जे सांगत होती ते शंभर टक्के खरं होतं. हा माणूस खाली गेला होता. त्यानं त्या आरशासारख्या पाण्यात बघितलं होतं. तो परत वर येऊन हे भयानक सत्य सांगायचा प्रयत्न करत होता. आणि त्याच्याच स्वतःच्या रक्तानं त्याला वेडा ठरवून कायमचं पुसून टाकलं होतं. आणि आता, इतक्या पिढ्यांनंतर, दुसरा एक घाटे खाली गेला होता, त्यानंही त्या आरशात बघितलं होतं, आणि तोही हेच सांगायचा प्रयत्न करत होता, आणि आता त्याचं स्वतःचं 'विज्ञान' त्याला वेडा ठरवायला निघालं होतं.

तो त्याच घाटेच्या रक्ताचा होता. आणि या रक्तात नक्कीच असं काहीतरी होतं जे त्या पाण्याला ओळखीचं होतं, किंवा ते पाणी या रक्ताला बरोबर ओळखत होतं. दर पिढीत, एका माणसाला. खाली जाणं, बघणं, आणि सत्य समजल्यावर कुणालाच पटवता न येणं. तो एक भयानक शाप होता की त्या शक्तीची निवड, हे निलयला मुळीच कळत नव्हतं, आणि त्या दोन शब्दांतला फरक आता त्याला फारच पातळ वाटत होता.

बाहेर, अंधारात, गजराबाईची ती अखंड चालणारी ओवी आता थांबली होती. आणि गाभाऱ्यातला तो दिवा, जो कुणी लावला नव्हता, अजूनही तसाच जळत होता. पण निलयनं आता तिकडं बघायचा प्रयत्नही केला नाही, आणि आज आयुष्यात पहिल्यांदाच त्यानं प्रश्नांची उत्तरं शोधणंही कायमचं सोडून दिलं.

त्यानं तो खरवडलेला कागद पुन्हा घडी करून आपल्या खिशात ठेवला. ट्रंकेचं झाकण अतिशय हळू लावलं, कडी न वाजवता. तोंडावरचं ते गुदमरणारं कापड बाजूला काढलं आणि टॉर्च विझवली. मिट्ट अंधारात, पलीकडून येणाऱ्या वडिलांच्या श्वासाच्या आवाजाशेजारी, तो सुन्न होऊन बसून राहिला. आणि त्या अंधारात खिशातल्या त्या एका कागदाचं वजन त्याला सतत जाणवत राहिलं. एका पुसून टाकलेल्या माणसाचं अथांग वजन, जो त्याच्याच रक्ताचा होता.

* * *

प्रकरण सहा : आरसा

बोल सरे, डोळे उरती ।

सकाळ झाली, आणि निलयनं ठरवल्याप्रमाणे स्वतःच्या बचावासाठी विज्ञानाची जुनी ढाल पुन्हा एकदा हातात उचलली.

रात्रभर तो त्या अंधाऱ्या खोलीत एकटाच बसून राहिला होता. खिशात ठेवलेल्या त्या खरवडलेल्या वंशावळीच्या कागदाचं अथांग वजन त्याला छातीवर जाणवत होतं. रात्रीच्या त्या भयानक काळोखात त्याला सगळंच शक्य आणि पटण्यासारखं वाटलं होतं... गजराबाईचं ते गूढ बोलणं, त्र्यंबकचा पिढ्यानपिढ्या चालत आलेला शाप, आणि त्या नितळ पाण्यात स्वतःच्या प्रतिबिंबाचं उशिरा हलणं. पण आता उजेड पडला होता, आणि दिवसाच्या लखलखत्या प्रकाशात सगळ्या गोष्टी आपापल्या तार्किक जागी येऊन बसतात, असा त्याचा दृढ विश्वास होता. त्यानं खिशातला तो जीर्ण कागद काढला, त्याची नीट घडी घातली आणि आपल्या बॅगेच्या एका अशा चोरकप्प्यात ठेवून दिला, जिथं तो पुन्हा सहज नजरेस पडणार नाही. मग त्यानं स्वतःची मोजमापाची नोंदवही उघडली. काल नोंदवलेल्या मापांची यादी निरखली, आणि आजच्या कामाचं नियोजन डोक्यात आखायला सुरुवात केली.

त्या बारवेतल्या पाण्याचा नमुना प्रयोगशाळेत पाठवलाच पाहिजे. तिथल्या हवेची आणि वायूची रसायनिक तपासणी झाली पाहिजे. मजुरांच्या या अचानक बदलण्यामागे नक्कीच काहीतरी वैद्यकीय आणि जैविक कारण असणार. या जगातल्या प्रत्येक गोष्टीचं मोजमाप करता येतं, आणि एकदा का याचं मोजमाप हाताशी आलं की रात्री पडलेले हे भास धुरासारखे हवेत विरून जातील, असं त्यानं स्वतःला बजावलं.

तो हाच ठाम विचार मनात धरून घराबाहेर पडला. पण त्याचा तो वैज्ञानिक विचार दुपार उजाडेपर्यंतही टिकू शकला नाही.

सर्वांत आधी, विठ्ठल आणि नामा कामावर आलेच नाहीत.

त्यांचा मुकादम रघूही गायब होता. आणि जे चार-पाच इतर मजूर आले होते, ते कमालीचे घाबरलेले होते. ते आपापसात कसलीतरी भीतीदायक कुजबुज करत होते, आणि निलयला लांबून येताना बघून एकदम गप्प झाले. त्यातला एक वयोवृद्ध मजूर जरा धिटाईने पुढे आला. "साहेब, विठ्ठल्या घरी गेलाच नाई काल," तो भीतीने आवंढा गिळत म्हणाला. "आन नाम्या... नाम्याले सकाळी त्याच्या बायकोनं देवळामागं बगितलं, त्या खड्ड्याजवळ बसलेला. बोलावलं तर उठंना. नुसता बगत ऱ्हायला खाली." म्हाताऱ्याचा आवाज आता कापायला लागला होता. "आन रघूचंबी तेच. रघूची बायको आली व्हती सकाळी,

इचारत, रघू घरी आलाच नाई. म्हने रातच्याला झोपेतनंच उठला, दार उघडून निघून गेला, काई न बोलता. बायकोनं हाक मारली, ऐकलंच नाई. जसा झोपेत चालतोय तसा. आमी म्हनलं देवळात असंल."

हे ऐकताच निलयच्या पोटात भीतीचा एक थंड गोळा आवळला गेला. पण त्यानं आपला आवाज व्यावसायिक आणि स्थिर ठेवला. "कुठं आहेत ते आता?"

"मागं. त्या खड्ड्याजवळ. तिघंबी. बसून हायेत नुसते. सकाळपासून."

तो वेगाने देवळाच्या मागं गेला. आणि तिथं, त्या उघड्या आणि अंधाऱ्या पायऱ्यांभोवती, ते तिघं बसले होते. विठ्ठल, नामा, आणि रघू. ते एका सरळ रांगेत बसले नव्हते, पण त्या तिघांचंही तोंड एकाच दिशेनं होतं. खाली त्या अंधाऱ्या खोलीकडं, त्या अथांग बारवेकडं. ते तिघेही पाषाणाच्या पुतळ्यासारखे निश्चल होते. सकाळचं कोवळं ऊन त्यांच्या पाठीवर पडत होतं, पण ते तसूभरही हलत नव्हते. काही माश्या त्यांच्या उघड्या चेहऱ्यांवर आणि डोळ्यांच्या कडांवर बसत होत्या, पण ते त्या साध्या माश्याही हाताने हाकलत नव्हते. ते जिवंत माणसांसारखे वागतच नव्हते.

"रघू," निलयनं हाक मारली.

काहीच हालचाल नाही.

तो अतिशय सावध पावलं टाकत जवळ गेला, आणि त्यानं रघूच्या खांद्याला हात लावला. रघूची त्वचा बर्फासारखी थंड होती. सकाळच्या त्या उबदार उन्हातही त्याच्या अंगात कोणतीच उष्णता उरली नव्हती. त्यानं हळूच रघूला हलवलं, आणि रघूनं आपली मान यांत्रिकपणे वळवली. त्यानं निलयकडं बघितलं, पण त्याचे डोळे ओळखीचे नव्हते. रघूचे डोळे नेहमी हसरे आणि जिवंत असायचे. आता त्या डोळ्यांत काहीच नव्हतं. ती फक्त दोन ओली, प्रकाशात चमकणारी निर्जीव बिलोरं होती, आणि त्या डोळ्यांच्या मागं आता 'रघू' नावाचा कुणीही उरला नव्हता.

आणि निलयला बारकाईने बघितल्यावर जाणवलं की ते तिघंही अगदी एकसारखे नव्हते. विठ्ठल, तो सर्वांत तरुण पोरगा, स्वतःशीच काहीतरी पुटपुटत होता. तेच तेच शब्द, पुन्हा पुन्हा. "तळ नाई... खाली अजून खाली... तळ लागतच नाई..." जसं काही त्याचं शरीर इथं वर बसलेलं असलं तरी त्याचं मन अजूनही त्या खोलीत खाली खाली उतरतच होतं. नामा संपूर्णपणे गप्प होता, पण त्याचं डोकं किंचित कलंडलेलं होतं, आणि कान त्या काळ्या पाण्याकडं लावलेले होते. जणू तो आतून काहीतरी ऐकत होता, कुठलीतरी अदृश्य हाक जी फक्त त्यालाच ऐकू येत होती, आणि मधेच तो एखाद्या आज्ञाधारकासारखी हळूच मान हलवायचा, हो म्हणल्यासारखी. आणि रघू... रघू फक्त शांत होता. त्याच्या चेहऱ्यावर एक पूर्णपणे सुटल्यासारखा, हताश

भाव होता. एखाद्या अशा माणसाचा भाव जो अनेक वर्षं पाठीवर ओझं वाहून आता ते ओझं कायमचं खाली ठेवायला निघालाय.

"रघू, घरी चल. तुझी बायको आलीय." निलय समजावणीच्या सुरात म्हणाला.

"बायको." रघू तो शब्द फारच चवीनं आणि आश्चर्याने बघत असल्यासारखा म्हणाला. जणू तो शब्द त्याच्यासाठी परका होता. मग तो परत त्या अंधाऱ्या पायऱ्यांकडं वळला. "खाली बगा साहेब. किती शांत हाय. तिथं काई ओझं नाई. काई कर्ज नाई, काई काम नाई, पोराईची काई काळजी नाई. नुसतं शांत. मले लई थकवा आलाय साहेब. खूप वर्सांचा. तिथं खाली, तो थकवा नाई." त्याच्या चेहऱ्यावर एक अंधुकसं, स्वप्नवत समाधान आलं, आणि ते विकृत समाधान रघूच्या त्या रिकाम्या चेहऱ्यावर जगातलं सर्वांत भीतीदायक दृश्य होतं. "मले खाली जायाचंय."

थोड्या वेळात सखू रघूच्या बायकोला घेऊन तिथं आली. निलयनं ठरवलं की कोणत्याही परिस्थितीत रघूला त्याच्या घरी न्यायचं, या जागेपासून दूर. कदाचित घराच्या ओळखीच्या वातावरणात तो भानावर येईल. दोन मजुरांच्या मदतीनं त्यांनी रघूला बळजबरीने उठवलं. तो शरीराने विरोध करत नव्हता, पण त्याचे पाय जड शीस ओतल्यासारखे झाले होते, आणि जाताना तो सारखा मागं वळून वळून त्या काळ्या खड्ड्याकडं बघत होता.

रघूचं घर देवळापासून जवळच होतं, एका अरुंद गल्लीत. मातीचं, स्वच्छ सारवलेलं, आणि अंगणात तुळस असलेलं एक साधं घर. दारात त्याची दोन पोरं उभी होती. मोठी मुलगी, दहा-अकरा वर्षांची, आणि धाकटा मुलगा, सात-आठ वर्षांचा... तोच ज्याला रघू "इंजिनिअर व्हायचंय" असं कौतुकाने म्हणाला होता. आणि त्या दोघांनी आपल्या बापाला बघितलं. मुलगी लगेचच "बाबा!" म्हणत धावत पुढं आली. पण तो धाकटा मुलगा मात्र जागचा अजिबात हलला नाही. तो फक्त आपल्या बापाकडं एकटक बघत राहिला, आणि त्याच्या कोवळ्या चेहऱ्यावर आनंद नव्हता. तिथं फक्त भीती होती. त्याला नक्की काय वाटलं, हे त्याला शब्दांत सांगता आलं नसतं, तो फक्त सात वर्षांचा होता. पण त्याला त्याच्या हाडांतून जाणवलं होतं, की समोर उभा असलेला हा माणूस हुबेहूब त्याच्या बाबासारखा दिसतो, त्यानं बाबाचेच कपडे घातलेत, तो बाबासारखाच चालतो, पण तो बाबा नक्कीच नाहीये. काहीतरी भयंकर चुकलंय. आणि लहान मुलांना या गोष्टी मोठ्यांच्या खूप आधी जाणवतात, कारण त्यांनी अजून स्वतःच्या मनाला "असं असूच शकत नाही" हे खोटे तर्क शिकवलेले नसतात.

"बाबा?" मुलीनं रघूचा राठ हात धरला. "बाबा, कुठं व्हतास? आई रडत व्हती."

रघूनं तिच्याकडं बघितलं. बराच वेळ तो नुसता बघत राहिला. जसं काही तो आपल्या रिकाम्या मेंदूत आठवायचा प्रयत्न करत होता की ही मुलगी नक्की कोण आहे. मग त्यानं अतिशय संथपणे आणि थंडपणे आपला हात तिच्या हातातून सोडवून घेतला. आणि तो म्हणाला, "मले जायाचंय." आणि तो परत देवळाच्या दिशेनं वळला.

आणि नेमकं तेव्हा तो धाकटा मुलगा रडायला लागला. तो मोठ्यानं रडत नव्हता, तो हुंदके देत, भीतीने मागं सरकत होता. त्यानं स्वतःच्या आईच्या पदराआड तोंड लपवलं, आणि तिथूनच तो बापाकडं बघत राहिला, प्रचंड घाबरून. रघूची बायको त्याला थोपटत होती आणि स्वतःही धाय मोकलून रडत होती. आणि रघू या सगळ्या हृदयद्रावक दृश्याकडं बघत होता, पण त्याच्या चेहऱ्यावर साधी अस्वस्थताही उमटत नव्हती. एक बाप, ज्याला काल आपल्या पोराच्या हट्टाचा अतोनात अभिमान होता, तो आज त्याच पोराच्या रडण्याकडं एखाद्या निर्जीव दगडासारखा बघत होता.

"अवो, काय झालं यांना?" रघूची बायको निलयकडं वळली. तिचे डोळे भरलेले होते आणि ती हात जोडत होती. "काल संध्याकाळपावतर धड व्हते. जेवले, पोराईसंगं बोलले. आन रातच्याला उठून कुठं गेले, कळलंच नाई. सकाळी बगते तर देवळामागं बसलेले, आन असे... असे वेगळे. साहेब, काय झालं

माझ्या धन्याले? कोन्या बाईची नजर लागली, का देवीचा कोप?" तिचा आवाज हुंदक्यांनी फुटला. "पोरं इचारतायत, बाबा असा का करते. मी काय सांगू त्याईले?"

निलयकडं तिच्या प्रश्नाचं कोणतंच तार्किक उत्तर नव्हतं. कुणाची नजर लागली नाहीये, देवीचा कोप नाहीये, हेही नाही आणि तेही नाही. त्याला जे माहीत होतं, ते तो तिला सांगू शकत नव्हता. कारण ते भयानक सत्य तिला सांगणं म्हणजे आधी स्वतः ते सत्य स्वीकारणं होतं, आणि तो अजून तिथवर पोचला नव्हता. म्हणून तो फक्त एवढंच म्हणाला, "बघतो मी. काळजी करू नका." आणि ते शब्द हवेसारखे वजनहीन वाटले, तिलाही आणि स्वतः त्यालाही.

त्या धाकट्या मुलानं आईच्या पदराआडून विचारलं. अतिशय हळू, फक्त निलयला ऐकू जाईल असं, "काका, बाबा परत येईल ना? खरा बाबा?" आणि निलयला त्या कोवळ्या प्रश्नानं काहीतरी पूर्णतः तुटल्यासारखं वाटलं. कारण त्या सात वर्षांच्या पोराला हे आधीच कळलं होतं की समोर उभा असलेला बाबा हा खरा बाबा नाहीये, आणि त्यानं फक्त एवढीच वेडी आशा धरली होती की त्याचा खरा बाबा कुठंतरी लांबून परत येईल. निलयनं जड हाताने त्याच्या डोक्यावरून हात फिरवला, आणि तो काहीच बोलला नाही, कारण त्याला त्या पोराशी खोटं बोलवत नव्हतं आणि खरं सांगवत नव्हतं.

निलय तिथून जड पावलांनी निघाला. त्याच्या डोक्यात यासाठी कोणतंही स्पष्टीकरण शिल्लक नव्हतं. विषारी वायू नाही, ऊन नाही, थकवा नाही, किंवा कोणतीही नशा नाही. या जिवंत माणसाला त्याच्या स्वतःच्या पोटच्या पोराची ओळख उरली नव्हती, आणि हे सगळं अवघ्या चोवीस तासांत झालं होतं. आणि आजवरच्या विज्ञानात असा कोणताही आजार अस्तित्वात नव्हता जो एका माणसाची माणुसकीच अशी समूळ काढून घेईल आणि त्याला फक्त एका काळ्या पाण्याकडं ओढत नेईल.

सखू चालत त्याच्याजवळ आली, आणि हळू आवाजात म्हणाली. "साहेब," तिच्या आवाजात एक प्राचीन समज होती. "जुनी माणसं म्हनायची, जिले ती धरते, त्याले परत आणता येत नाई. तो हितं ऱ्हातो, चालतो, बोलतो, पन तो तो नसतो. आत कुनीतरी दुसरं ऱ्हातं." तिनं रघूच्या रडणाऱ्या पोराकडं बघितलं. "त्या पोराले कळलं. पोराईले आधी कळते."

"हे थांबवता येईल," निलय म्हणाला, पण त्याचा आवाज आता ठाम उरला नव्हता. "याला भौतिक कारण असेल, आणि कारणाला उपाय असतो."

सखूनं त्याच्याकडं बघितलं. खूप दयेनं. जशी एखादी जाणती मोठी व्यक्ती एखाद्या हट्टी आणि न समजणाऱ्या पोराकडं बघते, तशी. ती काहीच बोलली नाही. पण तिचं ते न बोलणं त्याच्या

"उपाय असतो" या अहंकारी वाक्यापेक्षा कितीतरी पटीने जास्त जड आणि सत्य होतं.

त्या दुपारी सखू देवळात गजराबाईला नेहमीचं जेवण द्यायला गेली, आणि निलय तिथून जवळच उभा होता. त्यानं ते दृश्य बघितलं. सखू रोज न चुकता तिला जेवण द्यायची, हे त्याला आज पहिल्यांदा कळलं होतं. इतकी वर्षं, कधीही न चुकता. ती गजराबाईशेजारी बसली, तिनं जेवणाचं ताट पुढं ठेवलं, आणि गजराबाई हळूहळू खायला लागली. दोघी काही वेळ काहीच बोलल्या नाहीत. त्या फक्त शांतपणे बसून राहिल्या. दोन म्हाताऱ्या बायका. एक गावानं वेडी ठरवलेली, आणि एक गावानं सोडून दिलेली. देवळाच्या अंधाऱ्या दारात.

मग गजराबाई काहीतरी स्वतःशीच पुटपुटली, आणि सखू शांतपणे ऐकत राहिली. ती फक्त मान हलवत होती, जरी तिला त्या शब्दांचा अर्थ कळत असेल असं अजिबात वाटत नव्हतं. "पाहुण्या आधी पावे," गजराबाई म्हणाली. तोंडातला घास सावकाश चावत तिनं ओवीची ओळ उच्चारली. "आधी पाहुणा. बाहेरचा. तो आधी जाईल, पुरता, खाली." तिनं आकाशाकडं वर बघितलं. "हे गावचे बदलले, पन गेले नाईत अजून. ती त्याईले धरून ठेवते, दारात, वाट बगत. पयला घास बाहेरचा. मंग गाव." तिची ती भेदक नजर एका क्षणभरासाठी निलयवर पडली, आणि

मग परत ताटाकडं गेली. "जवळ आलं बाई. पाहुणा जवळ आलाय."

सखूला त्यातलं काहीच गूढ कळलं नसावं, कारण ती अत्यंत साधेपणाने फक्त म्हणाली, "खा गं आधी, थंड होतंय," आणि तिनं गजराबाईला भात कालवून दिला, अतिशय मायेनं. आणि निलयला त्या "पाहुणा" या एका शब्दानं का कोण जाणे मनातून अस्वस्थ केलं, पण त्याला त्याचा नेमका अर्थ लागला नाही, आणि त्यानं तो शब्द बाजूला ठेवला, इतर बऱ्याच न सुटलेल्या प्रश्नांसारखा. त्याच्या हे लक्षातही आलं नाही की नेमक्या त्या क्षणी त्याला 'प्रथमेश'ची आठवण झाली होती, अगदी नकळत, आणि लगेच विरूनही गेली होती.

प्रथमेश आज सकाळपासून दिवसभर कुठं गायब होता, याचं उत्तर निलयला संध्याकाळी मिळालं.

तो सकाळीच स्वतःच्या गाडीनं अमरावतीला गेला होता. आणि संध्याकाळी जेव्हा तो परत आला, तेव्हा त्याच्या गाडीच्या मागच्या सीटवर मोठ्या पेट्या भरलेल्या होत्या. निलय बघत असताना त्यानं त्या पेट्या एका जिद्दीने खाली उतरवल्या. त्यात जाड रबरी हातमोजे होते, रबरी बूट, तोंडाला लावायचे केमिकल मास्क, आणि पाण्याचे नमुने घेण्यासाठी आणलेल्या काचेच्या स्टराईल बाटल्या होत्या.

"हे काय?" निलयनं आश्चर्याने विचारलं.

"प्रोटेक्शन." प्रथमेश एक पेटी उघडत म्हणाला, आणि त्याच्या आवाजात आज तो त्याचा शहरी हलकेपणा नव्हता, तर एक इंजिनिअरची जिद्द होती. "मी विचार केला यार, रात्रभर. ते मजूर अचानक असे का झाले? आणि मला एकच उत्तर सुचतं जे साध्या तर्कात बसतं. त्या पाण्यात नक्कीच काहीतरी आहे. जैविक, नाहीतर रासायनिक. एखादा जुना जिवाणू, बुरशी, किंवा विषारी वायू, जो शेकडो वर्षं त्या बंद बारवेत साचून राहिलाय. तो त्यांच्या श्वासातून किंवा त्वचेतून शरीरात आत गेला, आणि त्यानं थेट त्यांच्या मेंदूवर परिणाम केला. न्यूरोटॉक्सिन. असं होतं, निलू, इतिहासात हे झालंय. इजिप्तच्या जुन्या थडग्यांत, युरोपच्या बंद गुहांत."

निलय एकदम गप्प बसला. कारण बरोबर एका आठवड्यापूर्वी त्यानं स्वतःही नेमकं हेच म्हटलं असतं. हाच तर्क, आणि ह्याच आत्मविश्वासाने. आणि आता, तोच जुना तर्क प्रथमेशच्या तोंडून ऐकताना, त्याला पहिल्यांदा जाणवलं की तो तर्क किती अपुरा आणि खुळचट होता. कारण त्यानं आत्तापर्यंत जे बघितलं होतं, ते या न्यूरोटॉक्सिनच्या तर्कात बसतच नव्हतं. मध्यरात्री रघूचं प्रतिबिंब त्याला बघून वेगळं हसणं. कुठलंच न्यूरोटॉक्सिन पाण्यातल्या प्रतिबिंबाला हसवत नाही.

"प्रथमेश, ते तेवढं साधं नाही."

"साधंच आहे." प्रथमेशनं हातमोजे बॅगेत भरले. "फक्त आपण अजून नेमकं काय आहे ते शोधलं नाहीये. उद्या मी स्वतः खाली जातो, पूर्ण प्रोटेक्शन घेऊन. मास्क, ग्लोव्ह्ज, सगळं घालून. पाण्याचा नमुना घेतो, अमरावतीच्या लॅबला पाठवतो. एकदा त्या पाण्यात कोणतं रसायन आहे हे कळलं, की सगळं उलगडेल." तो हसला, पण ते हसू खूप ताणलेलं होतं, जणू तो निलयला नाही तर स्वतःलाच पटवण्याचा प्रयत्न करत होता. "तू बघच. मी सिद्ध करतो."

आणि निलयला त्याला तिथंच थांबवावंसं वाटलं. त्याला ओरडून सांगावंसं वाटलं की मास्क आणि ग्लोव्ह्ज इथं काहीच कामाचे नाहीत. कारण जे पसरतंय ते श्वासातून पसरत नाही, ते स्पर्शातून पसरत नाही. पण त्याला ते सत्याच्या रूपात शब्दांत मांडता आलं नाही, कारण ते मांडणं म्हणजे "मग कशातून पसरतं?" हे सांगणं होतं. आणि त्याचं उत्तर "नजरेतून आणि प्रतिबिंबातून" असं होतं, आणि ते बोलून तो स्वतःच अंधश्रद्धेच्या आणि वेडेपणाच्या बाजूला जाणार होता. म्हणून तो केवळ एवढंच म्हणाला, "उद्या आपण एकत्र जाऊ. एकटा जाऊ नकोस." आणि प्रथमेशनं होकारार्थी मान हलवली. आणि निलयनं मनातल्या मनात ठरवलं की आजच, आत्ताच, अंधार पडायच्या आत, तो स्वतः एकदा खाली जाऊन त्या काळ्या शिळेची नीट पाहणी करेल. म्हणजे उद्या प्रथमेश येण्याआधी त्याच्या हाती विज्ञानाचा काहीतरी ठोस पुरावा असेल.

...

तो एकटाच खाली उतरला. अंधार पडायच्या अगदी आधी, हातात टॉर्च घेऊन. त्यानं मास्क घातला नाही, आणि ग्लोव्ह्जही घातले नाहीत. त्याला त्यांची गरज वाटली नाही. आणि ती गरज त्याला का वाटली नाही, हा प्रश्न त्यानं स्वतःला विचारण्याचं धाडस केलं नाही.

त्या खोलीत तोच जुना वास होता, जो आता त्याच्या नाकाला अंगवळणी पडला होता. त्यानं टॉर्च लावली, आणि तो त्या शिळेकडं गेला, जी परवा दुपारी त्यांनी बाजूला सरकवली होती. आणि आज पहिल्यांदा त्यानं तिची अतिशय बारकाईने पाहणी केली. एका इंजिनिअरच्या आणि डिझायनरच्या नजरेनं. आणि तेव्हा त्याला असं काहीतरी दिसलं जे त्यानं काल बघितलं नव्हतं.

त्या अवाढव्य शिळेचा खालचा पृष्ठभाग सपाट नव्हता. तो एका विशिष्ट कोनातून घडवलेला होता, किंचित वक्र, आणि त्यावर अतिशय बारीक खोबणी कोरलेल्या होत्या. एका ठराविक अंतरावर, नियमितपणे. हे नैसर्गिक झीज नक्कीच नव्हती. हे कुणीतरी मुद्दाम, अचूक मापानं बनवलेलं होतं. निलयनं आपलं बोट त्या खोबणींवरून फिरवलं, आणि त्याच्या अभियंता-मेंदूनं आपोआप एक चित्र उभं करायला सुरुवात केली. वक्र पृष्ठभाग. नियमित अंतरावरच्या खोबणी. आणि बरोबर वर, छतात

असलेला तो अरुंद झरोका, ज्यातून प्रकाश गुरुजींच्या अभिषेकाचं पाणी थेट खाली या शिळेवर पडायचं.

आणि मग त्याला तो शोध लागला. एका थंड लहरीसारखा तो शोध त्याच्या डोक्यात प्रकाशून गेला.

ही काळी शिळा नुसतं एक झाकण नव्हती. ती एक 'मशीन' होती. वरून झरोक्यातून पडणारं पाणी या शिळेच्या वक्र पृष्ठभागावर, या नियमित खोबणींवर एका विशिष्ट दाबाने आदळायचं, आणि त्या पाण्याच्या दाबातून दगडावर एक कंपन तयार व्हायचं. एक अतिशय सूक्ष्म, पण सतत चालणारी थरथर, जी त्या पाषाणातून थेट खालच्या बारवेच्या पाण्यात उतरायची. रोज. दररोज सकाळी. आणि ते दगडाचं कंपन खालचं पाणी सतत हलतं ठेवायचं. त्याला कधीही स्थिर होऊ द्यायचं नाही. त्याला 'आरसा' होऊ द्यायचं नाही. त्याची नेमकी फ्रीक्वेन्सी, तो नेमका अँगल, हे सगळं त्याला आत्ता तिथल्या तिथं मोजता येणार नव्हतं, पण त्यामागचं तांत्रिक तत्त्व त्याला स्पष्ट दिसत होतं.

निलयनं हे अकॉस्टिक तत्त्व याआधी अनेक प्राचीन बांधकामांत बघितलं होतं. विशिष्ट सुरात गुंजणारे दाक्षिणात्य मंदिरांचे खांब, आवाज एकाच जागी केंद्रित करणारे मशिदींचे घुमट. प्राचीन लोकांना ध्वनीचं आणि कंपनांचं अफाट ज्ञान होतं, आणि त्यांनी ते केवळ सुशोभनासाठी किंवा चमत्कारासाठी वापरलं होतं. पण इथं... इथं कुणीतरी तेच प्रगत ध्वनिक ज्ञान

वापरून एक असं यंत्र बांधलं होतं जे एका अज्ञाताला सतत जागं होऊ देत नव्हतं. अभिषेक करणं म्हणजे केवळ एक आंधळी पूजा नव्हती. अभिषेक म्हणजे या यंत्राला रोज चालवण्यासाठी लागणारं 'इंधन' पुरवणं होतं. आणि गजराबाईच्या ओवीतील "जळ निवळो नेदी कदा", या ओळीचा अर्थ आता स्फटिकासारखा स्वच्छ होता. जळ कधीही निवळू द्यायचं नाही. पाणी कधीही स्थिर होऊ द्यायचं नाही. कारण पाणी स्थिर झालं, की त्याचा आरसा होतो.

निलय त्या शिळेपासून दोन पावलं मागं सरकला, आणि त्याचा श्वास जड झाला. कारण याचा अर्थ भयंकर होता. याचा अर्थ असा की ज्यांनी हे देऊळ बांधलं, त्यांना नक्की माहीत होतं. त्यांना ध्वनी माहीत होता, कंपन माहीत होतं, रेसोनन्स माहीत होता, आणि हे सगळं त्यांनी शेकडो वर्षांपूर्वी शोधून काढलं होतं. त्यांनी एक ध्वनिक यंत्र बांधलं होतं, तेही एका अखंड दगडात, आणि मग त्या यंत्राभोवती एक 'धर्म' रचला होता. जेणेकरून पुढच्या शेकडो पिढ्या ते यंत्र सतत चालवत राहतील, मग त्यांना त्यामागचा खरा अर्थ कळो वा न कळो. गजराबाई खरं बोलली होती. "रीत ठेवली, अर्थ फेकून दिला." त्याचे वडील रोज न चुकता हे यंत्र चालवत होते, आणि त्यांना वाटत होतं की ते नुसती देवीची पूजा करतायत.

आणि परवा दुपारी त्यानं स्वतः ते यंत्र मोडलं होतं. ती शिळा उचलून बाजूला टाकली होती. कंपन कायमचं थांबलं होतं. आणि म्हणूनच ते पाणी स्थिर झालं होतं.

"अभिषेक चुकला म्हणून घात नाही झाला," तो स्वतःशीच कुजबुजला, आणि त्याचा आवाज त्या खोलीत विचित्र आणि दबका वाटला. "आणि नुसती शिळा हलली म्हणूनही नाही. हे दोन्ही एकच आहे. शिळा हे इंजिन आहे, आणि अभिषेक हे इंधन. काल हे दोन्ही एकाच वेळी तुटले. शिळा फुटली, आणि तिच्यावर पडणारं पाणीही थांबलं. यंत्र कायमचं बंद पडलं. कंपन थांबलं. आणि म्हणून पाणी स्थिर झालं." त्याच्या वडिलांना वाटत होतं की फक्त अभिषेक चुकला म्हणून कोप झाला, पण अभिषेक म्हणजेच शिळेला चालवणं होतं. दोन्ही एकाच यंत्रणेचे अविभाज्य भाग होते, ते कधीच वेगळे नव्हतेच.

हे सगळं विज्ञान होतं. ही यंत्रणा विज्ञान होती. अनुनाद, कंपन, ध्वनिकी... हे सगळं मोजता येणारं, समजून घेता येणारं होतं. शिळा हे यंत्र कसं चालतं, पाणी कसं हलतं राहतं, हे त्याचं विज्ञान त्याला स्पष्ट सांगू शकत होतं. पण एक प्रश्न अजूनही उरत होता, आणि तोच जगातला सर्वात मोठा प्रश्न होता, आणि त्याचं उत्तर त्याच्या विज्ञानाकडं मुळीच नव्हतं. हे यंत्र नक्की *कशाला* झोपवत होतं? हे कंपन खालच्या पाण्यात नेमकं *काय* स्थिर होऊ देत नव्हतं? विज्ञान अभिषेक कसा चालतो हे सांगत होतं. पण

अभिषेक ज्याला झोपवत होता, ते काय आहे, याबद्दल विज्ञान मूक आणि हतबल होतं.

आणि तेच सर्वात जास्त हादरवून सोडणारं होतं. कारण त्याच्या विज्ञानानं आत्ता त्याला यंत्रणेबद्दल नेमकं तेच सांगितलं होतं जे गजराबाईची ती 'वेडी' ओवी सांगत होती, जे त्याच्या वडिलांचा 'नेम' शेकडो वर्षं सांगत आला होता. दोन वेगळ्या भाषा, दोन वेगळी जगं, पण एकच यंत्रणा. त्यानं आयुष्यभर असं मानलं होतं की विज्ञान आणि श्रद्धा एकमेकांच्या विरुद्ध आहेत, एक खरं तर दुसरं खोटं, आणि त्यात विज्ञान नेहमीच खरं. पण इथं, या दगडी खोलीत, ते दोन्ही एकाच भयंकर गोष्टीकडं बोट दाखवत होते. वडिलांचा "नेम" आणि त्याचा "अनुनाद", एकच गोष्ट होती, फक्त दोन वेगवेगळ्या नावांनी. आणि या दोघांच्याही पलीकडं, त्या काळ्या पाण्याखाली, तेच अथांग अज्ञात होतं, ज्याला दोघंही फक्त झोपवून ठेवण्याचा प्रयत्न करत होते, आणि कुणालाच ते काय आहे हे माहीत नव्हतं.

त्यानं तो विचार तोडून टाकण्याचा आटोकाट प्रयत्न केला, नेहमीसारखा. पण यावेळी तो तुटला नाही. कारण आजवर तो विज्ञानाच्या आडून स्वतःची सुटका करत लपत होता, "याला काहीतरी कारण आहे, आणि कारण सापडलं म्हणजे उत्तर मिळतं." पण आज त्याचं विज्ञानच त्याला एका बंद दाराशी आणून सोडत होतं, आणि त्या दारापलीकडं नक्की काय आहे हे

त्याचं विज्ञान कधीच सांगू शकत नव्हतं, आणि त्याच्या आयुष्यात हे पहिल्यांदाच होत होतं.

आणि मग त्यानं त्या पाण्याकडं बघितलं.

ते आता संपूर्णपणे स्थिर होतं. अथांग नितळ. आरसा. आणि निलयला त्यात बघावंसं वाटलं, त्याच्या स्वतःच्या इच्छेविरुद्ध, त्याच्या सगळ्या वैज्ञानिक ठरवण्याविरुद्ध. तो वाकला. आणि पाण्यात त्यानं स्वतःला बघितलं, हातातल्या टॉर्चच्या उजेडात, स्पष्ट. आणि मागं त्या छताच्या झरोक्यातून येणारा तो एकुलता एक प्रकाशाचा कवडसा.

त्यानं स्वतःच्याच डोळ्यांत बघितलं. आणि काहीच झालं नाही. रघूसारखं नाही, विठ्ठलसारखं नाही. त्याला पाण्यातून कोणतीही ओढ जाणवली नाही, खाली जावंसं वाटलं नाही, आणि त्याचं डोकं रिकामं झालं नाही. तो नुसता बघत राहिला, आणि ते प्रतिबिंब त्याच्याकडं बघत राहिलं, आणि दोघांमध्ये काहीच घडलं नाही.

आणि हे त्याला सर्वांत जास्त अस्वस्थ करणारं होतं, कारण त्याला माहीत होतं की इथं बघून बाकीचे सगळे बदलले होते. विठ्ठल क्षणात गेला. नामा गेला. रघू गेला. मग तो का नाही? तो तर सर्वात जास्त वेळ, सर्वात जवळून बघत होता. जर हे संसर्ग प्रतिबिंबातून पसरत असेल, तर त्याला सर्वात आधी व्हायला हवं होतं. पण काहीच होत नव्हतं. जणू ते पाणी त्याला ओळखत

होतं, आणि त्याला जाणीवपूर्वक सोडून देत होतं. जसं काही त्याला इथं दुसरं काहीतरी काम होतं.

मी वेगळा का? हा प्रश्न त्याच्या तार्किक मनात उठला, आणि त्याला त्याचं उत्तर नव्हतं, आणि या प्रश्नाचं उत्तर नसणं इतर सगळ्या प्रश्नांपेक्षा हजार पटीने जास्त भीतीदायक होतं. कारण याचा अर्थ असा होता की या सगळ्या भयंकर खेळात, त्याला काहीतरी विशेष स्थान होतं, आणि ते स्थान त्यानं स्वतःहून कधीच निवडलं नव्हतं.

तेवढ्यात वरून आवाज आला. पावलांचा.

निलय वळला, आणि त्या अरुंद पायऱ्यांवरून त्याचे वडील उतरत होते. प्रकाश गुरुजी. हातात एक पेटता कंदील घेऊन, आणि त्यांच्या चेहऱ्यावर असा एक दृढ निश्चय होता जो निलयनं आयुष्यात आधी कधी बघितला नव्हता. ते खाली आले, त्यांनी निलयकडं बघितलं, आणि मग त्या बाजूला पडलेल्या अवाढव्य शिळेकडं.

"बाबा, तुम्ही इथं कशाला..."

"शिळा परत बसवायची," प्रकाश गुरुजी म्हणाले. "आत्ता."

"बाबा, ती शिळा टनभर वजनाची आहे. दहा माणसं लागली उचलायला. तुम्ही एकटे..."

"मदत कर, नाईतर बाजूला हो." प्रकाश गुरुजींनी कंदील खाली जमिनीवर ठेवला, आणि त्या अवाढव्य शिळेला स्वतःचा

म्हातारा खांदा लावला, आणि ते तिला ढकलायला लागले. त्यांचे राठ हात दगडावर दाबले गेले, त्यांच्या मानेच्या शिरा ताणल्या गेल्या, त्यांचा तो म्हातारा आणि थकलेला देह त्या दगडाशी एकाकी झुंजत होता. आणि शिळा तसूभरही हलली नाही. अर्थातच ती हलली नाही. एक सामान्य माणूस, सहासष्ट वर्षांचा, टनभर वजनाचा पाषाण कसा हलवू शकणार? पण तरीही ते ढकलत राहिले, पुन्हा पुन्हा, आणि त्यांचा श्वास फुलून आला, आणि घाम त्यांच्या कपाळावरून वाहायला लागला, आणि तरी ते थांबले नाहीत.

"बाबा, थांबा!" निलयनं त्यांचा दंड घट्ट धरला. "थांबा, तुम्हाला काहीतरी होईल."

"सोड मले." प्रकाश गुरुजींचा आवाज कापत होता, रागानं आणि श्रमानं. "तुले कळत नाई. ती उघडी ऱ्हायली तर गाव जाईल. सगळं गाव. आन यात्रा तोंडावर आलीय. चार दिसांत भाविक येतील, हजारो, आजूबाजूच्या गावाईतनं. ते सगळे इथं, या देवळात, या पाण्याजवळ. जे मूठभर मजुराईचं झालं, ते हजारो लोकाईचं झालं तर?" त्यांचा आवाज हुंदक्याने फुटला. "ती बंद केली पायजे. यात्रेच्या आधी. आत्ता." ते परत शिळेला ढकलायला लागले, आणि आता त्यांच्या डोळ्यांत पाणी होतं, एका बापाच्या हतबलतेचं. "मी चुकवला अभिषेक. माझ्यामुळं झालं हे. मीच नीट करायला पायजे."

आणि निलयला ते बघवेना. हा माणूस, ज्यानं आयुष्यभर कुणासमोर कोणतीही भावना दाखवली नाही, तो आता एका निर्जीव दगडाशी झुंजत होता, रडत होता, कारण त्याला वाटत होतं की या अख्ख्या गावाचा नाश त्याच्या एका चुकीमुळं होतोय. आणि निलयला माहीत होतं की तो चुकीच्या कारणासाठी झुंजतोय, अभिषेक चुकल्यामुळं नाही, तर शिळा फुटल्यामुळं हे झालं होतं. आणि तरीही तो बाप *बरोबर* होता. शिळा बंद केली पाहिजे हे अगदी खरं होतं, फक्त दोघांचं कारण वेगळं होतं. वडिलांचा नेम आणि निलयचं विज्ञान, परत एकदा, एकाच गोष्टीकडं बोट दाखवत होते.

त्यानं वडिलांना शिळा ढकलण्यापासून थांबवलं, अतिशय हळू, आपल्या दोन्ही हातांनी. "बाबा. ऐका. एकट्यानं नाही होणार. मी बघतो. उद्या माणसं आणतो, मोठी यंत्र आणतो, आणि शिळा परत बसवतो. मी वचन देतो तुम्हाला. पण आत्ता नाही. आत्ता तुम्ही थांबा."

प्रकाश गुरुजींनी धापा टाकत, घामाघूम अवस्थेत त्याच्याकडं बघितलं. आणि त्यांच्या डोळ्यांत काहीतरी होतं. अविश्वास, आणि एक वेडी आशा, दोन्ही मिसळलेले. "तू बसवशील शिळा? तू?" कारण त्यांच्या मुलानं आजवर या सगळ्याला नुसती अंधश्रद्धा म्हटलं होतं, आणि आता तोच शिकलेला मुलगा शिळा परत बसवायचं वचन देत होता.

"हो," निलय फारच ठामपणे म्हणाला. आणि तो हे एक इंजिनिअर म्हणून म्हणत होता, एक तुटलेलं यंत्र दुरुस्त करायचं म्हणून, तो रेसोनन्स परत सुरू करायचा म्हणून. पण वडिलांच्या चेहऱ्यावर जे समाधान उमटलं, ते वेगळंच होतं. त्या एका क्षणात, दोन पूर्णपणे वेगवेगळ्या कारणांनी का होईना, पण बाप आणि मुलगा पहिल्यांदाच एकाच बाजूला उभे होते.

प्रकाश गुरुजींनी मान हलवली, थकून, आणि आपला कंदील उचलला. "उद्या," ते म्हणाले. "चुकवू नको." आणि ते अतिशय हळू, पायऱ्या चढून वर गेले, आणि निलय तिथे एकटा उरला, त्या कोंदट खोलीत, त्या काळ्या शिळेशेजारी, त्या अथांग पाण्याशेजारी.

त्यानं जायला वळण घेतलं. आणि पायऱ्या चढताना, शेवटचं एकदा त्यानं त्या पाण्याकडं बघितलं.

आणि पाण्यात त्याचं प्रतिबिंब होतं, वळणारं, हुबेहूब त्याच्यासारखंच. पण निलय पूर्ण वळला होता, आणि प्रतिबिंब अजून वळत होतं. एक क्षण. अर्धा क्षण. निलयचं शरीर आता पायऱ्यांकडं तोंड करून उभं होतं, आणि पाण्यातलं प्रतिबिंब मात्र अजूनही पाण्याबाहेर, वर, त्याच्याकडं बघत होतं.

आणि त्या प्रतिबिंबाची नजर निलयच्या चेहऱ्यावर नव्हती. ती खाली होती, त्याच्या हातावर. त्याच्या उघड्या तळहातावर, जिथं तेवीस वर्षांपूर्वी एका म्हातारीनं बोटानं एक गोल आकार

काढला होता, आत रेषा. निलयनं नकळत स्वतःच्या तळहाताकडं बघितलं. तिथं काही नव्हतं, अर्थातच, फक्त रक्ताच्या रेषा होत्या, जशा प्रत्येक मानवी हातावर असतात तशा.

आणि निलयच्या मनात, त्या दाटून आलेल्या भीतीच्या खालीही, तोच जुना प्रश्न उठला, एक इंजिनिअरचा प्रश्न. *इतरांना क्षणात ओढलं, मला का नाही? माझ्या डोळ्यांत काही वेगळं आहे का? रक्तात? की या तळहातावर, या जुन्या खुणेत?* काहीतरी आहे जे मला इतरांपासून वेगळं करतं, आणि जे या पाण्याला दिसतं, आणि जे मला दिसत नाही. त्याला ते मोजायचं होतं, तपासायचं होतं, आणि तेच त्याला मोजता येत नव्हतं, आणि तो प्रश्न तिथंच राहिला, उत्तराशिवाय.

मग ते प्रतिबिंब वळलं, उशिरा, आणि ते हुबेहूब निलयसारखं झालं.

निलय तिथं थांबला नाही. आपण हे बघितलंच नाही असं त्यानं ठरवलं, आणि तो पायऱ्या चढायला लागला, एकेक. आणि त्यानं परत मागं वळून बघितलं नाही, आणि त्याची मूठ आपोआप घट्ट वळली गेली, स्वतःचा तळहात लपवत, आणि वरचा मोकळा उजेड कधी येतो याची तो श्वास रोखून वाट बघत होता.

* * *

मध्यांतर · त्र्यंबक

बोल सरे, डोळे उरती । कल्प कल्प न सुटे ॥

(ही फार, फार पूर्वीची गोष्ट आहे. जेव्हा निवाळी गाव अजून आकाराला येत होतं, महाकाय काळ्या दगडांचं ते देऊळ नुकतंच नवं होतं, आणि जगाला जोडणारा रस्ता फक्त एका धूळ उडवणाऱ्या बैलगाडीचा होता.)

त्या भयानक रात्री त्र्यंबक घाटे एकटाच त्या अंधाऱ्या पायऱ्यांवरून खाली उतरला, कारण त्याचं मन त्याला झोपू देत नव्हतं.

तो या अवाढव्य देवळाचा मुख्य पुजारी होता. अगदी त्याच्या बापासारखा, आणि त्याच्या आजोबांसारखा. रोज पहाटे उठून तो श्रद्धेने अभिषेक करायचा. पूर्वेला सूर्याचं पहिलं किरण उंबऱ्यावर पडायच्या आत, कारण पिढ्यानपिढ्या चालत आलेला तोच एक अभेद्य नेम होता. आणि इतर सगळ्या अंधळ्या गावकऱ्यांसारखाच, त्यालाही त्या नेमाचा खरा अर्थ अजिबात माहीत नव्हता. त्याला फक्त एवढंच ठाऊक होतं की हा नेम चुकता कामा नये.

पण त्र्यंबक इतर सामान्य माणसांसारखा नव्हता. त्याच्या डोक्यात लहानपणापासून प्रश्न वळवळत होते. बापानं त्याला ताकीद दिली होती, *अभिषेक कधीही चुकवायचा नाही.* तेव्हा

लहानग्या त्र्यंबकनं खूप निरागसपणे विचारलं होतं, *"का?"* त्या एका शब्दावर बापानं कोणतंही उत्तर दिलं नव्हतं, फक्त रागाने डोळे वटारले होते. जेव्हा आजोबांना विचारलं, तेव्हा तेही अत्यंत कोरडेपणाने एवढंच म्हणाले होते की, *"काही गोष्टी विचारायच्या नसतात."* आणि त्र्यंबक गप्प बसला होता. पण तो प्रश्न तिथंच संपला नव्हता. तो त्याच्या मनाच्या अंधाऱ्या कोपऱ्यात जाऊन बसला होता, वर्षानुवर्षं एखाद्या वेलीसारखा वाढत होता.

कारण या पुजाऱ्यांच्या घराण्यात प्रश्न पडणं हा एक भयंकर दोष मानला जायचा. त्यांच्या लेखी 'श्रद्धा' म्हणजे कोणताही प्रश्न न विचारता आंधळेपणाने मुकाट मान तुकवणं. आणि जो प्रश्न विचारतो, त्याची श्रद्धा कच्ची. त्र्यंबकनं आयुष्यभर स्वतःचा तो बंडखोर प्रश्न आतल्या आत दाबून ठेवला. त्यानं मुकाट्यानं नेम पाळला, आंधळी पूजा केली, प्रापंचिक संसार केला. पण त्या रात्री, वयाच्या पन्नाशीत, तो प्रश्न त्याच्या डोक्याची कवटी फोडून बाहेर यायला लागला. *का? रोज हे पाणी का ओतायचं? नक्की कशासाठी? आणि सर्वात महत्त्वाचं... कुणापासून वाचण्यासाठी?*

आणि जेव्हा माणूस "का" हा प्रश्न पुरेसा वेळ स्वतःच्या मेंदूत साठवून ठेवतो, तेव्हा एक दिवस तो त्याचं उत्तर शोधण्यासाठी नरकात उतरायलाही मागेपुढे बघत नाही.

त्या रात्री, हातात मिणमिणता कंदील घेऊन, तो गाभाऱ्यामागच्या त्या अरुंद पायऱ्या उतरून त्या कोंदट दगडी खोलीत गेला. तिथं, जिथं ती अवाढव्य काळी शिळा होती, आणि त्या शिळेखालची ती कधीही न आटणारी काळी बारव होती. संपूर्ण गावाला त्या बारवेचा विलक्षण अभिमान होता, कारण कितीही भयंकर दुष्काळ पडला तरी तिचं पाणी कधीच आटायचं नाही. *'चमत्कार,'* लोक श्रद्धेने म्हणायचे. *'देवीची अथांग कृपा.'* आणि त्र्यंबकनंही आजवर तेच सत्य मानलं होतं.

पण त्या रात्री, त्या अवाढव्य काळ्या शिळेच्या कडेला एक बारीक, केसाएवढी भेग पडली होती. ती भेग जुनी होती. शिळा स्वतःच्या जागी घट्ट होती, आणि म्हणूनच खालचं ते काळं पाणी नेहमीसारखं अथांग अंधारात बंदिस्त होतं. पण रात्री अभिषेक थांबल्यामुळे ते पाणी आता जरा शांत झालं होतं. पूर्ण स्थिर नाही, कारण शिळेचा दाब त्याला पूर्ण स्थिर होऊ देत नव्हता. पण फक्त त्या केसाएवढ्या भेगेतून, एका अतिशय अरुंद आणि चिंचोळ्या तुकड्यात, ते पाणी क्षणभरासाठी हलायचं थांबायचं. आणि तेवढ्या एका सेकंदापुरतं ते एखाद्या काळ्याकुट्ट आरशासारखं व्हायचं. एक बारीक, अर्धवट आरसा. पूर्ण नाही.

त्र्यंबकनं थरथरत्या हाताने कंदील बाजूला ठेवला. आणि त्यानं त्या केसाएवढ्या भेगेतून, खाली त्या क्षणभर स्थिर होणाऱ्या पाण्याच्या तुकड्यात डोकावून बघितलं.

तिथं खाली त्यानं नक्की काय पाहिलं, ते त्यानं नंतर आयुष्यात कधीच कुणाला सांगितलं नाही. त्यानं ते सांगायचा आटोकाट प्रयत्न केला, पण माणसाची भाषा आणि शब्द त्या भयानक सत्यापुढं अपुरे पडले. आणि जे काही तुटपुंजे शब्द त्याला सापडले, त्यावर जगातल्या कोणत्याही माणसानं विश्वास ठेवला नाही.

त्यानं त्या काळ्या पाण्यात स्वतःला बघितलं होतं, पहिल्यांदा. पण काही क्षणांतच त्याच्या पाठीच्या कण्यातून भीतीची एक थंडगार लहर उठली, कारण त्याला जाणवलं की ते प्रतिबिंब त्याच्या मानवी हालचालींशी अजिबात जुळत नव्हतं. ते त्याच्या हालचालींपेक्षा अगदी थोडं मागं होतं. जणू ते प्रतिबिंब स्वतःचा असा एक वेगळा, अमानवीय विचार करत असावं. आणि मग त्या अरुंद पाण्याच्या तुकड्यातलं दृश्य अचानक बदललं. त्याला स्वतःचा मानवी चेहरा दिसेनासा झाला, आणि त्याजागी त्याला फक्त 'तुकडे' दिसू लागले. पूर्ण चित्र नाही, कारण भेग फारच अरुंद होती, तो मृत्यूचा आरसा अर्धवट होता. फक्त तुकडे... एखाद्या हिंस्त्र विजेच्या लखलखाटासारखे, मेंदूला फाडून टाकणारे आणि पुन्हा अंधारात गडप होणारे.

त्या तुकड्यांत त्याला चक्क दोन 'काळ' दिसले. एकाच वेळी. कारण त्या पाण्याच्या तळाशी बसलेल्या गोष्टीला मानवी काळाचं कोणतंही बंधन नव्हतं. एका तुकड्यात त्याला

भविष्याचा, पुढचा काळ दिसला. त्याच्या पिढीनंतरचा, फार पुढचा. एक मोठी झालेली निवाळी, डांबरी आणि दगडी रस्ते, विजेचे उंच खांब... अशा आधुनिक गोष्टी ज्यांना त्र्यंबकच्या प्राचीन शब्दकोशात कोणतीही नावं नव्हती. त्याला तिथं त्याच्याच रक्ताची माणसं दिसली, पिढ्यांनंतरची. आणि त्याला दिसली ती अवाढव्य काळी शिळा... जी आता फुटलेली आणि बाजूला फेकलेली होती. त्याला दिसलं ते पूर्णतः स्थिर झालेलं काळं पाणी, आणि त्या पाण्यात डोकावून बघणारी ती हतबल माणसं... आणि त्यांचे पांढरे फटक पडलेले, रिकामे डोळे!

आणि दुसऱ्या तुकड्यात त्याला भूतकाळ दिसला. त्याच्या अस्तित्वाच्याही आधीचा, फार मागचा. एक अथांग आणि हिंस्त्र दाट रान, आणि त्या रानातली ती उघडीवाघडी माणसं... कोरकू आदिवासी. इथं हे गाव वसायच्याही कितीतरी शतकं आधीची. त्याला ते कोरकू दिसले, जेव्हा त्यांनी त्या अमानवीय गोष्टीला पहिल्यांदा झोपवलं होतं. त्यांच्या स्वतःच्या नादानं, त्यांच्या प्राचीन नेमानं, त्यांच्या आदिम रीतीनं. त्याला त्या क्षणी भयानकपणे उमगलं की ही जागा, हा नेम, ही अवाढव्य शिळा... हे सगळं मूळ त्या रानातल्या आदिवासींचं होतं. या तथाकथित सुसंस्कृत गावाचं नव्हतं. गावानं त्यांच्याकडून ते ज्ञान फक्त चोरलं होतं, आणि त्या खऱ्या मालकांना मागासलेलं ठरवून रानात हाकलून दिलं होतं.

आणि या दोन्ही काळांच्या बरोबर मधे, खोल तळाशी, त्याला 'ते' जाणवलं. जे त्या काळ्या पाण्याखाली होतं. ज्याला शेकडो वर्षांपूर्वी कोरकूंनी झोपवलं होतं, ज्याला या काळ्या शिळेनं आणि रोजच्या अभिषेकानं शतकं झोपवून ठेवलं होतं... आणि जे आता त्या भविष्यातल्या पुढच्या काळात पुन्हा एकदा संपूर्णपणे जागं होत होतं.

ते नक्की 'काय' होतं, हे त्र्यंबक नंतर कधीच शब्दांत बोलू शकला नाही. त्याच्याकडं त्यासाठी शब्दच नव्हते, जगातल्या कोणत्याही माणसाकडं नव्हते. कारण ती अवाढव्य गोष्ट माणसाच्या भाषेच्या आधीची होती, मानवजातीच्या आधीची होती, कदाचित या पृथ्वीच्याही जन्माआधीची होती. ती गावाची 'देवी' नव्हती, तो कुणी राक्षस नव्हता, किंवा ते कुणी साधं भूतही नव्हतं. या सगळ्या माणसानं स्वतःच्या सोयीसाठी बनवलेल्या खूप खुळचट कल्पना होत्या. आणि ही गोष्ट त्या सगळ्या मानवी कल्पनांच्या पल्याडची होती. त्याला फक्त एवढंच जाणवलं की ती गोष्ट तिथं खाली वाट बघत होती. अत्यंत भयानक संयमानं. कारण तिच्या अथांग अस्तित्वापुढं मानवी 'काळ' म्हणजे काहीच नव्हतं. शंभर वर्षं, की हजार वर्षं, तिला सगळी सारखीच होती. ती फक्त वाट बघत होती, त्या एका काळ्या दिवसाची, जेव्हा कुणीतरी मूर्ख माणूस ती काळी शिळा हलवेल आणि ते अथांग पाणी पूर्णपणे स्थिर होऊ देईल.

त्यानं फक्त एवढंच सांगितलं होतं, नंतर, अतिशय थरथरत्या आणि वेड्यासारख्या आवाजात... की त्यानं तिथं खाली जे पाहिलं होतं, ते बघून कोणत्याही सामान्य माणसाचं मन आणि मेंदू तग धरूच शकत नाही. आणि तरीही तो जिवंत राहिला होता! आणि जिवंत राहणं हीच त्याची सर्वात मोठी, नरकासमान शिक्षा होती. कारण आता त्याला ते सत्य माहीत होतं. आणि एखादं भयानक सत्य माहीत असणं आणि ते थांबवण्यासाठी काहीच करता न येणं, यापेक्षा मोठी कोणतीच यातना जगात नाही.

तो जेव्हा त्या रात्री पायऱ्या चढून वर आला, तेव्हा त्याचे केस पांढरे झाले होते. असं म्हणतात की ते एकाच रात्रीत पांढरे फटक पडले होते. आणि त्याच्या डोळ्यांत असा एक भाव कायमचा कोरला गेला होता, जो मरेपर्यंत पुसला गेला नाही. अशा एका माणसाचा भाव, ज्यानं काळाच्या पार, विनाशाच्या खूप पुढचं बघितलं आहे... आणि ज्याला आता शांततेत परत यायला जगात कोणतीही जागा उरलेली नाही.

त्या भयानक दिवसापासून त्र्यंबक बदलला.

तो मुख्य पुजारी आता देवळातून बाहेर पडून रानात जाऊ लागला. थेट त्या कोरकूंच्या पाड्यावर, त्या आदिवासींकडं ज्यांना हे सुसंस्कृत गाव कायम "खालचे" मानायचं, अस्पृश्य आणि अडाणी मानायचं. आरशाच्या त्या अरुंद तुकड्यानं त्याला जे

दाखवलं होतं, ते खरंच सत्य आहे का, हे त्याला स्वतः पडताळून बघायचं होतं. आणि जेव्हा तो कोरकूंकडं गेला, तेव्हा ते सगळं अक्षरशः खरं निघालं. त्यांच्या म्हाताऱ्यांकडं जुन्या, प्राचीन गोष्टी होत्या. त्यांच्या मूळ भाषेतल्या ओव्या होत्या, ज्या या बारवेबद्दल, या अवाढव्य शिळेबद्दल, आणि या अनुनादाच्या नेमाबद्दल स्पष्ट बोलायच्या. हे गाव वसायच्या कितीतरी शतकं आधीपासून! त्यांनीच ती अमानवीय गोष्ट पहिल्यांदा झोपवली होती, त्यांच्या आदिम रीतीनं, त्यांच्या नादानं.

या गावानं ते प्राचीन ज्ञान त्यांच्याकडून चोरलं होतं. त्याच्यावर स्वतःचं दगडाचं देऊळ बांधलं होतं, त्याला स्वतःच्या सोयीच्या 'देवीचं' नाव दिलं होतं, आणि मूळ मालकांना अडाणी ठरवून रानात हाकलून दिलं होतं. त्या मृत्यूच्या आरशातलं दृश्य आणि या कोरकूंच्या आदिम ओव्या, दोन्ही एकच भयानक सत्य सांगत होत्या.

आणि हेच सत्य त्र्यंबक या आंधळ्या गावाला सांगायला गेला.

तो गावाच्या भर चौकात उभा राहून बोलला. सगळे गावकरी जमा झाले, कारण देवळाचा मुख्य पुजारी भर चौकात काहीतरी सांगणार म्हटल्यावर लोक कुतूहलाने येतातच. आणि त्र्यंबक बोलला. त्याचे ते सत्य शब्द ऐकून सुरुवातीला संपूर्ण गर्दी स्तब्ध

झाली, मेंदू गोठल्यासारखी. आणि मग हळूहळू चुळबुळायला लागली.

तो ओरडून म्हणाला होता... *"ही देवी आपली नाही! हे ज्ञान आपलं नाही! आपण ज्यांना आजवर खालचं मानतो, ज्यांना आपण पाड्यावर हाकलून दिलं, ज्यांची सावलीही आपण विटाळ म्हणून टाळतो... त्यांच्याकडंच खरी रीत आहे. त्यांनीच ती भयंकर गोष्ट पहिल्यांदा झोपवली होती, त्यांच्या नादानं, त्यांच्या नेमानं... आपण इथं जन्मायच्या कितीतरी आधी. आपण फक्त त्यांची रीत चोरली, तिच्यावर देऊळ बांधलं, आणि मूळ मालकांना रानात ढकललं. आणि जर आपण त्यांची ती रीत नीट पाळली नाही, ती शिळा जपली नाही, तर एक दिवस खालची ती अमानवीय गोष्ट कायमची जागी होईल! आणि मग हे देऊळ उरणार नाही, हे गाव उरणार नाही, आपण कुणीच उरणार नाही. त्यासाठी आपल्याला स्वतःचा हा खोटा अहंकार टाकून त्या कोरकूंच्या पायाशी बसून शिकावं लागेल, त्यांना आपला गुरू मानावं लागेल!"*

घाटे घराण्याच्या मुख्य पुजाऱ्यानं हे बोलावं? आदिवासींना चक्क गुरू मानावं?

त्या गर्दीत आधी एक अंगावर येणारी शांतता पसरली. मग मागून कुणीतरी कुत्सितपणे हसलं. मग आणखी कुणी. आणि मग बघता बघता ते हसू एका रानटी संतापात बदललं. कारण

त्र्यंबकनं दोन अशा गोष्टी एकाच वेळी सांगितल्या होत्या, ज्या या सवर्ण गावाला कधीच सहन होणार नव्हत्या. एक, की त्यांची देवी, ज्यावर त्यांची तथाकथित श्रद्धा, त्यांची उपजीविका, आणि त्यांची जत्रा अवलंबून होती, ती "त्यांची नाहीच." आणि दोन, की ज्यांना त्यांनी पिढ्यानपिढ्या जनावरांसारखं तुच्छ मानलं होतं, तेच खरे ज्ञानी होते.

पहिलं सत्य म्हणजे त्यांची अंधश्रद्धा मुळापासून खोटी ठरवणं होतं. आणि दुसरं सत्य म्हणजे त्यांची वर्षानुवर्षांची सामाजिक प्रतिष्ठा थेट मातीत मिळवणं होतं. आणि माणसाची जात या दोन्ही गोष्टी वाचवण्यासाठी सहज कुणाचाही खून करू शकते.

गर्दीतून एक म्हातारा पुढं आला. अंगानं थरथरत, त्यानं त्र्यंबकवर स्वतःचं बोट रोखलं आणि तो हिंस्त्रपणे ओरडला, *"याचं डोकं फिरलंय! त्या रात्री यानं खाली गाभाऱ्यात काय बघितलं कुणास ठाऊक, पण तेव्हापासून हा कायमचा वेडा झालाय. हा आपल्या देवीची निंदा करतोय. याला देवीनंच शाप दिलाय!"*

आणि त्या अज्ञानी गर्दीनं ते एका क्षणात उचलून धरलं. आनंदानं. कारण त्यांच्या मते "तो वेडा आहे" हे मानणं सर्वात सोपं उत्तर होतं. त्र्यंबक जे सांगत होता ते सत्य स्वीकारण्यापेक्षा, त्याला वेडा ठरवणं खूप सोपं होतं. जर त्यांनी ते सत्य मानलं

असतं, तर त्यांना स्वतःचं अख्खं आयुष्य आणि अहंकार बदलावा लागला असता. पण त्याला वेडा मानलं, तर त्यांना स्वतःमध्ये काहीच बदलावं लागणार नव्हतं.

त्यांनी त्याला वाळीत टाकलं. देवळातून धक्के मारून बाहेर काढलं, आणि त्याच्या धाकट्या भावाला पुजारी बनवलं. त्याला गावाबाहेर, रानाच्या सीमेवर असलेल्या एका पडक्या झोपडीत ढकलून दिलं. तिथं, जिथं हे सुसंस्कृत गाव संपतं आणि त्या अडाणी कोरकूंचं रान सुरू होतं. आणि मग हळूहळू, अतिशय पद्धतशीरपणे, त्यांनी त्याचं अस्तित्वच मिटवून टाकलं. त्याचं नावच पुसून टाकलं. जुन्या पोथ्यांतून खरवडून काढलं. वंशावळीतून कायमचं बाद केलं. आणि पुढच्या पिढीला खोटेपणाने सांगितलं की असा कुणी पुजारी या घरात कधी नव्हताच, मधली एक पिढी अस्तित्वातच नव्हती.

एक जिवंत माणूस, त्याला त्याच्याच लोकांनी इतिहासातून असा कापून काढला होता.

पण त्र्यंबकनं एक भयंकर हुशारीची गोष्ट केली होती, हे जग कायमचं सोडून जाण्याआधी.

गावात एक जुनी ओवी आधीपासूनच प्रचलित होती. देवीची ओवी, जी बायाबापड्या पिढ्यानपिढ्या म्हणत आल्या होत्या. तिच्या काही ओळी फारच स्वच्छ आणि स्तुतीच्या होत्या. पण काही ओळी फार जुन्या, दुर्बोध आणि अर्धवट झिजलेल्या होत्या,

ज्यांचा अर्थ मुळात कुणालाच नीट लागत नव्हता... आणि तरीही लोक त्या म्हणायचे, निव्वळ सवयीनं. त्र्यंबकनं कोणतीही नवी ओवी रचली नाही. त्यानं त्या आधीच दुर्बोध असलेल्या ओळींमध्ये, सूक्ष्मपणे, आपले भविष्यातले 'इशारे' मिसळून दिले. इतक्या बेमालूमपणे, की ती ओवी गावकऱ्यांना तीच जुनी ओवी वाटत राहिली. त्यानं एखादा शब्द बदलला, एखादी ओळ जरा वळवली, आणि आरशात जे विनाशाचे तुकडे पाहिले होते, ते त्या दुर्बोधतेखाली कायमचे लपवून ठेवले.

पाहुण्या आधी पावे... वाट मोडे, गांव तुटे... बाप वाहे निवाळी... पुन्हा जळ ढळे.

आणि म्हणूनच ती ओवी टिकली. कारण या आंधळ्या गावाला कधी कळलंच नाही की ती त्र्यंबकची आहे. त्यांना शेवटपर्यंत वाटत राहिलं की ती तीच पिढ्यान् पिढ्यांची जुनी देवीची ओवी आहे, आणि म्हणून त्यांनी ती पवित्र मानून जपली, गायली. त्या वेड्या पुजाऱ्याशी तिचा काही संबंध आहे, हे त्यांना स्वप्नातही वाटलं नाही. त्यांनी त्याचं नाव पुसलं, पण त्याची धोक्याची घंटा त्यांच्याच ओठांवर जिवंत राहिली, त्यांना नकळत, शतकानुशतकं!

त्याला पक्कं माहीत होतं की तो हा विनाश थांबवू शकत नाही. त्यानं आरशात पाहिलं होतं की ते एका काळ्या दिवशी घडणारच आहे, पिढ्यांनंतर... आणि भविष्य कधीच बदलत

नाही, ते फक्त घडतं. पण त्यानं मरताना एवढीच एक वेडी आशा धरली होती की जेव्हा तो काळ येईल, जेव्हा ती शिळा फुटेल आणि पाणी स्थिर होईल... तेव्हा त्याच्याच रक्ताचा कुणीतरी तिथं असेल. कुणीतरी असा, जो प्रश्न विचारेल. कुणीतरी असा जो ही ओवी ऐकेल आणि तिच्याखालचं अथांग सत्य ओळखेल. त्यानं ती धोक्याची तार थेट पुढं पाठवली होती, काळाच्या पल्याड, त्याच्याच घराण्यातल्या एका अशा अनोळखी वंशजासाठी, ज्याचं नावही त्याला माहीत नव्हतं.

हे गाव त्याला विसरलं. पण त्या "वेड्या" ठरवलेल्या बायका... त्या मूक राखणकरिणी, ज्यांना गावानं कायम दारातून हाकललं होतं पण देवाच्या अंधश्रद्धेमुळं पूर्ण घालवता आलं नव्हतं, त्यांनी त्र्यंबकची ती कहाणी आणि ओवी जपली. आजीनं नातीला, नातीनं तिच्या नातीला, फक्त तोंडी, खूप गुपचूप, पिढ्यानपिढ्या. गावानं ज्यांना आयुष्यभर नाकारलं, त्यांनीच गावाला वाचवणारी एकमेव गोष्ट जिवंत ठेवली होती.

त्र्यंबक रानाच्या सीमेवर, त्या अंधाऱ्या झोपडीत, एकटाच मेला. कधी, आणि कसा, हे गावातल्या कुणालाच कळलं नाही, आणि कुणाला त्याची साधी पर्वाही नव्हती. गावानं त्याला स्वतःच्या स्मशानात साधं जळायलाही जागा दिली नाही. म्हणून कोरकूंनी त्याला त्यांच्या रीतीनं पुरलं, रानात, उत्तरेकडं तोंड करून, आणि त्याच्या थडग्यावर एक लाकडी स्तंभ रोवला,

बरोबर त्यांच्या स्वतःच्या पूर्वजांसारखा. कारण त्यांच्या लेखी त्र्यंबक कधीच परका नव्हता. जो माणूस त्यांचं ज्ञान खरं मानायला आला, आणि त्यासाठी ज्यानं आपलं सगळं आयुष्य आणि अस्तित्व गमावलं, तो त्यांचाच होता.

आणि त्र्यंबकचं ते शरीर रानातल्या मातीत कायमचं मिसळून गेलं. बरोबर त्याच मातीत... जिच्याखाली, फार खोल, ते अथांग काळं पाणी अजूनही वाट बघत होतं.

* * *

प्रकरण सात : कोंडण

पाहुण्या आधी पावे । वाट मोडे, गांव तुटे ।

त्या रात्री, ही इथली शेवटची रात्र आहे म्हणून नव्हे, तर फक्त वाढत्या ताणाचा शीण हलका करण्यासाठी प्रथमेशनं आपल्या बॅगेतून एक बाटली बाहेर काढली.

"नागपूरहून आणली होती," तो म्हणाला, दोन स्टीलचे पेले आपल्या टी-शर्टला पुसत. "म्हटलं होतं, प्रोजेक्ट संपला की दोघं मिळून. पण आता वाटतंय, संपायची वाट कशाला बघायची." ते दोघं भक्तनिवासाच्या त्या अर्धवट बांधलेल्या ओट्यावर बसले होते. वर अथांग आणि काळं आकाश होतं, आणि गाव रात्रीच्या अंधारात मिणमिणत होतं. दूर सातपुड्याच्या डोंगरावर काळे ढग अत्यंत वेगाने जमा होत होते, आणि हवेत पावसात भिजलेल्या मातीचा आणि विजेचा तो परिचित ओलसर वास आधीच पसरला होता.

निलयनं आपल्या हातातला पेला घेतला. त्याला आज काहीच प्यायचं नव्हतं, पण त्याला नाही म्हणवलं नाही, कारण प्रथमेशच्या डोळ्यांत आज काहीतरी होतं. एक प्रकारची हतबलता आणि एकटेपण होतं, आणि निलयला आजच्या रात्री त्याला एकटं सोडायचं नव्हतं.

बराच वेळ ते फक्त जुन्या गोष्टी बोलत राहिले. त्यांच्या इंजिनिअरिंगच्या कॉलेजातले ते जुने दिवस, ती हॉस्टेलची खोली जिथं पावसाळ्यात छतातून पाणी गळायचं, तो कडक आणि तिरसट वॉर्डन ज्याला ते सगळे मागून चोरून नावं ठेवायचे, आणि ती परीक्षेच्या आदल्या रात्रीची उडालेली धांदल. तेव्हा प्रथमेशनं स्वतःची सगळी तयारी बाजूला ठेवून निलयला अख्खा अभ्यासक्रम एका रात्रीत जागून समजावून सांगितला होता. जुन्या आठवणींनी प्रथमेश हसत होता, नेहमीसारखा, आणि त्याच्या त्या हसण्यात आज तेरा वर्षांपूर्वीची ती जुनी ऊब होती. आणि निलयला अचानक जाणवलं की गेल्या काही दिवसांत, या सरकारी प्रकल्पाच्या गडबडीत, देवळाच्या तणावात आणि स्वतःच्या वैज्ञानिक अहंकारात तो हे पार विसरून गेला होता की, प्रथमेश हा त्याचा मित्र होता. तो नुसता एक सहकारी नव्हता, किंवा त्याच्या हाताखालचा जिओलॉजिस्ट नव्हता. तो मित्र होता. तब्बल तेरा वर्षांचा जुना मित्र. ज्यानं निलयच्या लग्नात सगळी धावपळ स्वतःच्या अंगावर काढली होती, ज्यानं निलयच्या वडिलांच्या आजारपणात रात्रभर हॉस्पिटलाच्या बाकावर बसून काढल्या होत्या, तेही निलयला न सांगता.

"एक विचारू?" प्रथमेश म्हणाला, बऱ्याच वेळानं, आणि त्याचा तो नेहमीचा शहरी आणि हलका आवाज आता पूर्णतः बदलला होता. "तू मला इथं का बोलावलंस, खरं सांग. दुसरे

कितीतरी जिओलॉजिस्ट होते, तुझ्या ओळखीचे, माझ्यापेक्षा हुशार, मोठ्या फर्ममधले."

निलयनं स्वतःच्या हातातील पेल्याकडं बघितलं. "तू माझा मित्र आहेस म्हणून."

"खोटं." प्रथमेश कोरडेपणाने हसला, पण त्याच्या डोळ्यांत हसू नव्हतं. "तू मला बोलावलंस कारण तुला माहीत होतं मी नाही म्हणणार नाही. मी कधीच नाही म्हणत नाही तुला. कॉलेजातपण नाही म्हणालो नाही, आणि आतापण नाही." त्यानं पेल्यातून एक मोठा घोट घेतला, आणि तो दूर अंधाऱ्या गावाकडं बघत राहिला. "तुला सगळं आधी मिळालं निलू. मार्क्स, नोकरी, बढती, नाव, चांगली बायको. आणि मी नेहमी दुसऱ्या रांगेत. तुझ्या मागं, एक पाऊल. आणि तरी मी तुझ्याबरोबर राहिलो, कारण... कारण तुझ्याबरोबर राहिलं की निदान त्या पहिल्या रांगेजवळ तरी असतो, असं वाटायचं. तुझ्या उजेडात माझीही थोडी सावली उजळायची."

निलय एकदम गप्प बसला. त्याला माहीत होतं की प्रथमेश जे बोलतोय ते अगदी खरं आहे. पण त्यानं आजवर ते कधीही बोलून दाखवलं नव्हतं, आणि प्रथमेशनंही कधीच नाही. आणि आता ते जड सत्य त्यांच्यामध्ये बोललं गेलं होतं. प्रथमेशच्या आवाजात कोणताही कडवटपणा किंवा संताप नव्हता, तिथं

फक्त एक प्रकारचा खोल थकवा होता, आणि एका जुन्या, एकतर्फी मैत्रीचं जड सत्य होतं.

"आणि आता, इथं येऊन," प्रथमेश पुढं म्हणाला, आणि त्यानं दूर त्या अंधाऱ्या देवळाकडं बघितलं, "आता मला वाटतं की पहिल्या रांगेत नसणं हेच बरं होतं. कारण इथं काहीतरी आहे निलू, जे मला कळत नाही, आणि जे तुला कळतंय, आणि तू ते मान्य करत नाहीयेस." तो थांबला आणि त्यानं थेट निलयच्या डोळ्यांत बघितलं. "मला भीती वाटतेय यार. पहिल्यांदा, इतक्या वर्षांत, मला खरंच भीती वाटतेय. आणि ती कशाची आहे हेही मला सांगता येत नाही."

निलयला त्याला खूप काहीतरी सांगायचं होतं. त्याला म्हणायचं होतं की तू अगदी बरोबर आहेस, इथं काहीतरी भयंकर आहे, मलाही भीती वाटतेय, आणि मी तुला उद्याच्या उद्या इथून पाठवून देतो, थेट नागपूरला, सुरक्षित ठिकाणी. पण त्यानं तसं काहीच म्हटलं नाही. त्याऐवजी तो व्यावहारिक सुरात म्हणाला, "उद्या आपण दोघं मिळून खाली जाऊ. नमुना घेऊ, तपासू, आणि याचं कारण शोधू. मग सगळं स्पष्ट होईल." कारण निलयला त्याच्या इंजिनिअरिंगच्या अहंकारात अजूनही वाटत होतं की यामागे काहीतरी वैज्ञानिक कारण सापडेल, आणि एकदा का कारण सापडलं की ही अंगावर येणारी भीती संपेल. आणि हीच त्याच्या आयुष्यातील सर्वात मोठी, अक्षम्य चूक

ठरणार होती. कारण त्यानं प्रथमेशला त्याच रात्री सुरक्षित परत पाठवून द्यायला हवं होतं, पण त्यानं तसं केलं नाही.

पावसाचा पहिला मोठा टपोरा थेंब ओट्यावर पडला. मग आणखी. आणि दूर डोंगरावर विजा चमकायला लागल्या.

पाऊस रात्रभर कोसळत राहिला. असा पाऊस निलयनं आयुष्यात आधी कधीही बघितला नव्हता. कित्येक दिवसांचा साचलेला आणि कोंडलेला निसर्ग एकाच रात्रीत एकदम फुटावा, तसा तो पाऊस होता. आणि सकाळी जेव्हा तो पाऊस थांबला, तेव्हा निवाळी गाव वेगळं झालं होतं.

नदीला महापूर आला होता. एका रात्रीतून. आणि गावाला बाहेरच्या जगाशी जोडणारा तो एकुलता एक लाकडी आणि लोखंडी पूल, तो पुराच्या पाण्यात संपूर्णपणे वाहून गेला होता. जणू तो पूल तिथं कधी अस्तित्वातच नव्हता. निलय काठावर उभा राहून बघत होता, आणि नदीचा पलीकडचा किनारा दूर वाटत होता. मधलं पाणी प्रचंड गढूळ, वेगवान आणि एखाद्या हिंस्त्र प्राण्यासारखं गुरगुरणारं होतं. काठावर त्या पुलाचा फक्त एक लाकडी खांब तेवढा उरला होता, अर्धा मोडलेला. आणि तो पाण्याच्या अथांग ओढीत हतबलपणे हलत होता, कधीही वाहून जाईल असा.

"डोंगरावर दरड कोसळली," बाळासाहेब चिखलातून धावत आला, प्रचंड घाबरलेला, त्याच्या हातात मोबाईल होता. "वरच्या

घाटातला रस्ता बंद झाला. पूर्ण. एवढा मोठा दगड कोसळला की जेसीबीशिवाय हलणार नाही, आणि जेसीबी यायला रस्ताच नाही. आणि हे बघा साहेब," त्यानं आपला फोन दाखवला, त्याचे हात थरथर कापत होते. "रेंज नाही. रात्रीपासून. वर घाटाच्या रस्त्यावर आणि इथे थोडीफार रेंज यायची पण आता काहीच नाही. टॉवर गेला बहुतेक, नाहीतर लाईन तुटली. फोन लागतच नाही कुणाला. मी पंचायतीच्या लँडलाईनवरून पण करून बघितलं, तीही डेड आहे."

निलयनं झटकन स्वतःचा फोन बघितला. रेंज नाही. प्रथमेशचा फोन तपासला. रेंज नाही. गाव पूर्णपणे तुटलं होतं. रस्ता बंद, पूल वाहून गेला, आणि फोन डेड. हे गाव जगापासून कापलं गेलं होतं, एकाच रात्रीत, तीन वेगवेगळ्या मार्गांनी, अगदी एकाच वेळी.

आणि निलयच्या तार्किक मनात, एक असा विचार आला जो त्याला मुळीच नको होता. हे सगळं एकाच रात्रीत घडणं. दरड, पूर, टॉवर, तिन्ही एकदम. हा निव्वळ योगायोग असू शकतो. मुसळधार पावसात दरड कोसळते, नदीला पूर येतो, जुना टॉवर पडतो, हे सगळं वेगवेगळं घडू शकतं. पण तिन्ही गोष्टी एकाच रात्री, नेमकं आत्ताच? नेमकं तेव्हाच जेव्हा ती प्राचीन शिळा फुटलीय आणि खालचं ते भयंकर काहीतरी जागं होतंय? नेमकं

यात्रेच्या दोन दिवस आधी जेव्हा हजारो लोक बाहेरून येणार होते पण आता येऊ शकणार नाहीत.

त्यानं तो अंगावर काटा आणणारा विचार बाजूला ढकलला, स्वतःला पास्कल आणि फेरमॅट प्रोबॅबिलिटीची आठवण करून दिली, स्वतंत्र घटनांची वैज्ञानिक शक्यता आठवली. पण तो विचार गेला नाही. आणि त्याला गजराबाईची ती वेडी ओवी आठवली, जी त्यानं अनेकदा ऐकली होती पण तिच्याकडे कधीच लक्ष दिलं नव्हतं. *वाट मोडे, गांव तुटे.* वाट मोडली होती. गाव तुटलं होतं. नेमकं ओवीत होतं तसं, अगदी त्याच क्रमानं.

एखादी अमानवीय शक्ती जर गावाला जगापासून तोडू इच्छित असेल, तर तिनं नेमकं हेच केलं असतं. पण अदृश्य शक्ती अशा भौतिक गोष्टी करत नाहीत, निलयनं स्वतःला बजावलं. निसर्ग करतो, आणि निसर्गाला कसलाही हेतू नसतो. तरी त्या विचारानं त्याला सोडलं नाही, कारण तो आत्तापर्यंत निसर्गाला 'हेतू' नसल्याचं गृहीत धरत होता, आणि आज आयुष्यात पहिल्यांदा त्या गृहीतकावरचा त्याचा विश्वास मुळापासून डळमळला होता.

"यात्रेला दोन दिवस उरलेत," बाळासाहेब डोक्याला हात लावून कळवळला. "भाविक कसे येणार आता? रस्ताच नाही. आणि जे दहा-वीस आधीच आलेत, तेही अडकले. साहेब, काहीतरी करा. देवीचा कोप झाला का काय?"

कोप हा शब्द ऐकून निलय आतल्या आत दचकला, कारण तो शब्द त्याच्या मते अंधश्रद्धेचा होता, आणि तरी आज तो त्याला पूर्णतः खोटा वाटला नाही. पण त्याचं लक्ष बाळासाहेबवर नव्हतं. ते देवळाकडं होतं, त्या मागच्या बाजूकडं, जिथं खाली ते काळ्या रंगाचं पाणी होतं. गाव तुटलं होतं, आणि आत जे मोजके लोक होते, पन्नास-साठ, ते आता इथंच अडकले होते. त्या पाण्याबरोबर. एका कोंडवाड्यात. आणि बाहेर पडायची कुठलीच वाट नव्हती. कुणालाही, कशालाही, आत किंवा बाहेर.

....

प्रथमेश दुपारी खाली जायला निघाला.

त्यानं स्वतःच्या बचावाची ती सगळी तयारी केली होती. जाड रबरी बूट, कोपरापर्यंत येणारे रबरी हातमोजे, तोंडाला बांधलेला घट्ट केमिकल मास्क, डोळ्यांवर सुरक्षा-चष्मा. त्याच्या हातात निर्जंतुक बाटली आणि नमुना घ्यायचं अत्याधुनिक उपकरण होतं. तो एखाद्या अतिशय धोकादायक प्रयोगशाळेत उतरणाऱ्या शास्त्रज्ञासारखा दिसत होता, आणि त्याला त्याच्या या तयारीचा अतोनात अभिमानही होता.

"बघ, हे असं करायला हवं," तो निलयला म्हणाला, आपले हातमोजे मनगटाशी घट्ट करत. "भावनेनं नाही, पद्धतीनं. तू म्हणतोस ते भूत-बीत काही नाही. त्या पाण्यात न्यूरोटॉक्सिन आहे, नाहीतर एखादा विषारी वायू, आणि तो श्वासातून किंवा

त्वचेतून शरीरात आत जातो. म्हणून हे सगळं. सेफ्टी. आज मी नमुना घेतो, आणि उद्या... " तो बोलता बोलता मध्येच थांबला, काल रात्रीचं वादळ आठवून, "एकदा रेंज आली की घाटाचा रस्ता दुरुस्त करून घेऊ आणि मग लॅबला पाठवू. एकदा रसायन कळलं, की सगळं उलगडेल."

"प्रथमेश, थांब." निलयनं त्याचा हात घट्ट धरला. "मी येतो बरोबर."

"नको. एका वेळी एकानंच जायचं. जर खाली खरंच काही विषारी असेल, तर दोघं कशाला धोक्यात? मी सेफ्टीसोबत जातो, तू वर थांब. काही झालं तर तू आहेसच ओढायला." तो हसला, त्याच्या जुन्या मोकळ्या पद्धतीने. "यावेळी मी पहिला जातो निलू. एकदा तरी पहिल्या रांगेत जाऊदे."

आणि निलयला ते थांबवता आलं नाही, कारण प्रथमेश अगदी बरोबर होता, त्याच्या तर्काने. एका वेळी एकानं जाणं हेच सुरक्षित होतं. मास्क, ग्लोव्ह्ज, हे सगळं शहाणपणाचं होतं. सगळं अगदी बरोबर होतं, आणि तरी निलयच्या पोटात काहीतरी अज्ञात असं आवळत होतं. आणि त्याला त्या भीतीचं कारण स्पष्ट शब्दांत सांगता येत नव्हतं, कारण त्याच्या भीतीचं कारण आता कोणत्याही मानवी तर्कात बसत नव्हतं.

प्रथमेश सावकाश त्या पायऱ्या उतरला. निलय वर, दारात, आपल्या टॉर्चचा प्रखर उजेड खाली धरून श्वास रोखून उभा राहिला.

खालून आवाज येत होते. प्रथमेशच्या बुटांचा, त्याच्या उपकरणांच्या हालचालींचा. "बापरे, अंधार आहे यार इथं," त्याचा आवाज आला, थोडा दबका. "थांब, नमुना घेतो. पाणी एकदम नितळ आहे. काचेसारखं. भारी दिसतंय खरं."

"प्रथमेश, पाण्यात बघू नकोस." निलयच्या तोंडून ते वाक्य आपोआप निघालं, आणि तो स्वतःच दचकला, कारण हे तर्कात बसणारं वाक्य नव्हतं. पण तो पुढं म्हणाला, जरा जास्त जोरात, "नुसता नमुना घे. खाली, पाण्यात, थेट बघू नकोस. लवकर घे आणि वर ये."

"का?" प्रथमेशच्या आवाजात हलकंसं हसू होतं. "पाणी चावत नाही निलू. आणि किती स्वच्छ आहे बघ, माझा चेहरासुद्धा दिसतोय यात, अगदी स्पष्ट..."

आणि मग तो अचानक थांबला.

निलय वर उभा होता, आणि त्याला खालचं काहीच दिसत नव्हतं, फक्त आवाज ऐकू येत होता, आणि त्या एकाएकी पसरलेल्या भयाण थांबण्यात काहीतरी असं होतं ज्यानं निलयचं रक्त शरीरातल्या शरीरात गोठलं. "प्रथमेश?"

काहीच नाही. निव्वळ शांतता.

"प्रथमेश! उत्तर दे."

"निलू," प्रथमेशचा आवाज आला, पण तो त्याचा नेहमीचा आवाज नव्हता. तो वेगळा होता. हळू. आणि आश्चर्यचकित झालेला. "निलू, माझं प्रतिबिंब... ते हसतंय. मी तर नाही हसलो, पण ते हसतंय. आणि ते... ते माझ्याकडं बघतंय, माझ्यासारखं हुबेहूब, पण तो मी नाही. निलू, ते मला काहीतरी सांगतंय. ते म्हणतंय, इथं ये. खाली ये. इथं काही ओझं नाही..."

"प्रथमेश, वर ये! आत्ता! नजर काढ त्या पाण्यावरून!" निलय पायऱ्यांवरून वेगाने धावला, खाली. त्याच्या हातातली टॉर्च वेडीवाकडी हलत होती, आणि भिंतीवरच्या सावल्या हिंस्त्रपणे नाचत होत्या.

पण तो खाली पोचला तेव्हा उशीर झाला होता.

प्रथमेश त्या काळ्या बारवेच्या काठावर गुडघ्यांवर बसला होता. तो त्या नितळ पाण्यात एकाग्रतेने बघत होता. त्याचा तोंडावरचा केमिकल मास्क बाजूला जमिनीवर पडला होता, त्यानं तो स्वतःच्या हातांनी काढून फेकला होता. त्याचे रबरी हातमोजेही काढलेले होते, कारण त्याला आता त्यांची काहीच गरज वाटत नव्हती. त्याचा सुरक्षा-चष्मा गळून पडला होता. त्यानं स्वतःच्या सुरक्षेची आपली सगळी वैज्ञानिक ढाल उतरवली होती, संपूर्णपणे स्वखुशीनं, त्या पाण्याकडं बघता बघता. आणि

त्याचा चेहरा फारच शांत होता, समाधानी होता, आणि त्याचे डोळे ओले, चमकते आणि पूर्णपणे रिकामे झाले होते.

आणि इथंच निलयला ते भयंकर सत्य कळलं, अगदी हाडांच्या पातळीवर, जे तो आजवर स्वतःच्या अहंकाराने नाकारत आला होता. मास्क, हातमोजे, चष्मा... सगळं व्यर्थ होतं. कारण धोका त्या पाण्यात नव्हता. धोका त्या पाण्याकडं *बघण्यात* होता. तो रोग श्वासातून येत नव्हता, त्वचेतून पसरत नव्हता, पाण्याच्या थेंबातून येत नव्हता. तो नजरेतून सुरू होत होता, त्या स्थिर आरशात स्वतःला बघण्यातून. प्रथमेशनं जगातली सगळी भौतिक सुरक्षा अंगावर चढवली होती, पण त्यानं त्या निषिद्ध पाण्यात डोळे भरून बघितलं होतं, आणि तेवढं पुरेसं होतं. त्याचं विज्ञान, त्याचा तर्क, त्याची सुरक्षिततेची पद्धत, हीच गोष्ट त्याला इथवर घेऊन आली होती, आणि हीच गोष्ट आता त्याचा घात ठरली होती. जर तो खरोखरच अंधश्रद्धाळू असता, जर तो खरोखरच अंधश्रद्ध असता, आणि "पाण्यात बघू नको" हे त्यानं निव्वळ एका अडाणी भीतीपोटी जरी ऐकली असती, तर आज तो नक्कीच जिवंत उभा राहिला असता. पण तो तसा नव्हता. तो 'शहाणा' होता, तर्काचा पुजारी होता; आणि नियतीचा क्रूर खेळ असा, की आज त्याच्या त्याच वैज्ञानिक शहाणपणानं थंडपणे त्याचा बळी घेतला होता.

"प्रथमेश," निलय त्याच्याजवळ गेला, त्याच्या खांद्याला घट्ट धरलं, त्याला गदागदा हलवलं. जोरात. "प्रथमेश, माझ्याकडं बघ. मी आहे. निलय. ओळखतोयस ना मला?"

प्रथमेशनं आपली मान वळवली, हळू, आणि त्यानं निलयकडं बघितलं. आणि त्याच्या चेहऱ्यावर कसलीही ओळख नव्हती. तेरा वर्षांची अतुट मैत्री, ती हॉस्टेलची खोली, ते हॉस्पिटलातले रात्रभराचे प्रहर, ती लग्नातली धावपळ... सगळं पुसलं गेलं होतं. आणि त्या डोळ्यांत आता निलयसाठी काहीच उरलं नव्हतं. तो एका अनोळखी माणसाकडं बघावं तसा बघत होता. किंवा एखाद्या दूरच्या, अंधुक आणि निरर्थक आठवणीकडं.

"किती शांत आहे इथं," प्रथमेश म्हणाला, खूप सपाट आणि निर्जीव आवाजात. "आयुष्यभर मी दुसऱ्या रांगेत होतो निलू. सतत मागं, सतत तुलना, सतत कमी. इथं रांगच नाही. इथं मागं-पुढं काही नाही. सगळे सारखे. सगळं शांत. कसलंच ओझं नाही." तो परत त्या काळ्या पाण्याकडं वळला, आणि त्याच्या आवाजात एक भयाण आणि अनैसर्गिक समाधान होतं. "मला इथंच राहायचंय. पहिल्यांदा मला कुठंतरी राहावंसं वाटतंय."

आणि मग, फक्त एका क्षणासाठी, काहीतरी बदललं. प्रथमेशच्या निर्विकार चेहऱ्यावर एक सूक्ष्म आठी आली. गोंधळाची, वेदनेची. जसं काही त्याच्या आत खोल कुठूनतरी

दबलेला तो 'खरा' प्रथमेश एक क्षण ऑक्सिजनसाठी वर आला असावा. त्याचा उघडा हात थरथरला. "निलू," तो म्हणाला, आणि यावेळी तो आवाज वेगळा होता, त्याचा स्वतःचा खराखुरा आवाज होता, अत्यंत भेदरलेला. "निलू, मला थांबवता येत नाहीये. मला माहितीय हे चूक आहे, पण मला थांबता येत नाहीये. ते मला खात चाललंय, आणि मला ते हवंहवंसं वाटतंय, हे सगळं भयानक आहे." त्याचे डोळे एक क्षण खरे झाले, पाण्याने ओले झाले, प्रचंड घाबरलेले. "मला वाचव. नाहीतर जा इथून. पळ. माझ्यासाठी थांबू नको."

आणि निलयनं त्याचा थरथरणारा हात धरला, घट्ट. पण तो मानवी क्षण निसटला, हातातून वाळू घसरावी तसा. प्रथमेशच्या डोळ्यांतली ती जिवंत भीती विरून गेली, ती चेहऱ्यावरची आठी गेली, आणि परत तीच सपाट, जड शांतता आली. त्यानं हळू आपला हात निलयच्या हातातून सोडवून घेतला, आणि परत त्या पाण्याकडं वळला, आणि तो परत अनोळखी झाला.

आणि निलय तिथं गुडघ्यांवर हतबल होऊन बसला, त्या दगडी खोलीत, आपल्या मित्राशेजारी, आणि त्याला काय करावं हे काहीच कळत नव्हतं. त्यानं प्रथमेशला हलवलं, तो ओरडला, त्यानं तावातावाने त्याचं नाव घेतलं, त्याला जुन्या आठवणी सांगितल्या, कॉलेज, तो वॉर्डन, ती परीक्षेची रात्र. काहीच नाही. प्रथमेशनं फक्त एकदा त्याच्याकडं बघितलं, त्या रिकाम्या

नजरेनं, आणि तो पुसटसा हसला. ओळख म्हणून नव्हे, तर एक अनोळखी माणूस रस्त्यात भेटल्यावर जसा कोरड्या सौजन्यानं हसावा तसा. आणि त्यानं परत पाण्याच्या दिशेनं तोंड वळवलं. तेच त्या नावाचं आणि आठवणींचं उत्तर होतं. जो माणूस तिथं बसला होता तो दिसायला हुबेहूब प्रथमेशसारखा होता, त्याचा प्रथमेशचाच आवाज होता, तो त्याच्याच आठवणी ऐकत होता, पण त्यातली एकही आठवण त्याच्या डोळ्यांत कोणताही उजेड पेटवत नव्हती. तो फक्त एक रिकामा सांगाडा उरला होता. आणि निलयला आज पहिल्यांदा त्या लहान मुलाचा प्रश्न आठवला, रघूच्या पोराचा. *खरा बाबा परत येईल ना?* आणि आता निलयला त्या प्रश्नाचं भयंकर उत्तर कळलं होतं, आणि ते उत्तर कायमचं 'नाही' असं होतं.

याला त्याच्या विज्ञानात कोणतंही उत्तर नव्हतं. आणि आता श्रद्धेतही त्याला उत्तर शोधता येत नव्हतं. आणि पहिल्यांदा त्याच्या लक्षात आलं की जगात काही गोष्टींना उत्तरच नसतं, फक्त त्यांचा एक भयानक परिणाम असतो, आणि तो परिणाम मुकाट्याने भोगावा लागतो, त्याला कधीच समजून घेता येत नाही.

त्यानं प्रथमेशला ओढत वर आणलं, कारण प्रथमेश स्वतः यायला तयार नव्हता. तो वारंवार मागं, पाण्याकडं वळण्याचा प्रयत्न करत होता. आणि हे सगळं धक्काबुक्की करताना निलय

स्वतः त्या पाण्याच्या काठावर उभा होता, त्याच्या अगदी जवळ, आणि एका क्षणी त्याची स्वतःची नजर त्या नितळ पृष्ठभागावर पडली. त्याचं स्वतःचं प्रतिबिंब त्याला स्पष्ट दिसलं. आणि काहीच झालं नाही. त्याला ती भयंकर ओढ जाणवली नाही, कोणती हाक ऐकू आली नाही, त्याचं डोकं रिकामं झालं नाही. तो प्रथमेशला ओढत राहिला, आणि त्या अथांग पाण्यानं त्याला अगदी सहज जाऊ दिलं, त्याच्या मनाला साधा स्पर्शही न करता. आणि हा प्रश्न, 'प्रथमेश का आणि मी का नाही?', तो आता त्याच्या मनात एका थंड, बर्फाळ गाठीसारखा बसला.

आणि त्या अस्वस्थ गाठीभोवती इतर गोष्टी जमा व्हायला लागल्या, त्याच्या स्वतःच्या इच्छेविरुद्ध. गजराबाईचे शब्द: *तुझ्या रगतात हाय बाळा.* त्र्यंबक घाटेचं ते ट्रंकेतलं खरवडलेलं नाव, जो खाली गेला होता आणि वेडा होऊन परत आला होता आणि तरीही जगला होता. लहानपणी म्हातारीने तळहातावर काढलेला तो अनामिक आकार. सगळे धागे एकाच दिशेनं बोट दाखवत होते, आणि ती दिशा त्याला अजिबात बघायची नव्हती, कारण ती दिशा म्हणत होती की तो वेगळा आहे. त्याच्या रक्तातच काहीतरी आहे. आणि म्हणूनच हे पाणी त्याला आत ओढत नाही, उलट त्याला राखतं. पण मग राखतं म्हणजे कशासाठी? साक्षीदार ठेवण्यासाठी? की वेगळा बळी म्हणून? या प्रश्नाचं उत्तर त्याच्या मनाच्या तळाशी कुठेतरी अंधुकपणे हलत होतं, आणि त्यानं तिकडं बघायचं साफ नाकारलं. कारण एकदा ते सत्य

बघितलं की तिथून मागं फिरता येणार नाही, हे त्याला पक्कं माहीत होतं. त्यानं तो विचार मेंदूत दाबला, जोरात, आणि प्रथमेशवर लक्ष केंद्रित केलं. आत्ता फक्त प्रथमेश. बाकीचं सगळं नंतर. जर 'नंतर' काही उरलं तर.

वर आणताना निलयनं प्रथमेशचा उघडा चेहरा झाकण्याचा, त्याला मास्क लावण्याचा किंवा त्याचे हात बांधण्याचा कोणताही प्रयत्न केला नाही. आठवडाभरापूर्वीचा निलय हे करू शकला नसता. त्याच्या इंजिनिअर-मनानं सर्वांत आधी सुरक्षा-प्रोटोकॉल आठवला असता... विषारी वायू, संसर्ग, पीपीई किट, निर्जंतुकीकरण. पण ते सगळे शब्द आता त्याच्यासाठी कायमचे अर्थहीन झाले होते. त्याला आता पक्कं माहीत होतं, थेट हाडांच्या पातळीवर, की रोग हवेत नाही, थेंबात नाही, स्पर्शात नाही. तो नजरेत आहे. डोळ्यांत आहे. आणि म्हणून मास्क, हातमोजे, निर्जंतुकीकरण, हे सगळं आता निरर्थक होतं. आणि हे निरर्थक आहे हे कळणं म्हणजेच त्याच्या आतल्या त्या अती-तार्किक इंजिनिअरचा अंतिम पराभव होता, आणि तो पराभव त्यानं आज मुकाट्याने स्वीकारला होता, एकही शब्द न बोलता.

त्यानं प्रथमेशला ओढत नेऊन संस्थानच्या एका रिकाम्या खोलीत ठेवलं, बाहेरून दार लावलं, आणि प्रथमेश आतून ते लाकडी दार नखांनी खरवडत राहिला. हळू, सतत, एकाच

लयीत, आणि तो एकसुरी आवाजात म्हणत राहिला, "मला जाऊ दे, मला खाली जायचंय, तिथं बरं वाटतं."

निलय खोलीच्या बाहेर, दाराला पाठ टेकून, थंड जमिनीवर बसला. बाहेर परत पाऊस सुरू झाला होता, आणि दाराच्या आतून प्रथमेशच्या नखांचा तो खरवडण्याचा आवाज येत होता, हळू, सतत, लयीत. आणि तो आवाज निलयच्या कानात घुसत होता, थेट हाडांत जाऊन बसत होता. आणि त्याच्या हातात प्रथमेशचा फोन होता, जो त्यानं खाली, बारवेच्या काठावरून उचलला होता, प्रथमेशच्या फेकून दिलेल्या मास्कशेजारून.

मीच त्याला इथं आणलं. हा विचार आता त्याच्या डोक्यात सतत घुमत होता, थांबत नव्हता, त्या खरवडण्याच्या आवाजाच्या तालावर. दुसरे अनेक जिओलॉजिस्ट होते, चांगले, मोठे, ओळखीचे. पण मी मुद्दाम याला बोलावलं, कारण हा मला कधीच नाही म्हणणार नाही हे मला पक्कं माहीत होतं. मी याच्या निष्पाप मैत्रीचा वापर केला, याच्या "नाही म्हणता न येण्या"चा फायदा घेतला, आणि याला इथं, या मरणाच्या तोंडात आणून उभं केलं. आणि काल रात्री, त्या ओट्यावर, यानं मला प्रामाणिकपणे सांगितलं होतं की याला भीती वाटतेय. आणि मी याला त्याच क्षणी पाठवून देऊ शकलो असतो, नागपूरला, सुरक्षित जगात. आणि मी तसं केलं नाही, कारण मला माझ्या अहंकारासाठी माझा नमुना हवा होता, मला माझ्या प्रश्नाचं उत्तर

हवं होतं. मी याला उत्तरासाठी इथं अडकवून ठेवलं. आणि आता... त्याला ते वाक्य पूर्ण करता आलं नाही, मनातही नाही, कारण ते वाक्य पूर्ण केलं असतं तर ते शंभर टक्के खरं झालं असतं.

त्यानं अतिशय जड हाताने फोन उघडला. का, ते त्याला माहीत नव्हतं. कदाचित प्रथमेशचं शेवटचं काहीतरी बघायला, त्याच्या आवाजातलं, हसण्यातलं, त्याच्या जिवंतपणातलं काहीतरी. त्यानं फोटो-गॅलरी उघडली. आणि त्यात प्रथमेशचे कितीतरी फोटो होते, गेल्या काही दिवसांतले. साईटचे, यंत्रांचे, आणि मधेच एक स्वतःचा, हसरा, कॅमेराला अंगठा दाखवणारा, त्या पहिल्या दिवशीचा फोटो, जेव्हा सगळं किती साधं आणि सोपं वाटत होतं. निलयनं तो फोटो बघितला, आणि त्याचा घसा आवळून आला.

आणि मग सर्वात शेवटचा फोटो. जो प्रथमेशनं खाली, त्या बारवेपाशी काढला होता, नमुना घेण्याआधी, फक्त काही मिनिटांपूर्वी. त्यानं तो फोटो उघडला.

फोटो उघडला, आणि तो अजिबात नीट आला नव्हता. जसा कालच्या रात्री कॅमेरा त्या पाण्याला पकडू शकला नव्हता, तसाच आताही. फोटो विकृत होता, फाटलेला होता, त्याचे पिक्सेल विस्कटलेले होते. मधेच रंगाचे विचित्र तडे, काळे आणि हिरवे पट्टे उमटले होते, जणू कॅमेरा त्या दृश्याला टिपताना आतल्या आत

बिघडला असावा. फोटोचा बहुतेक भाग नुसता काळा डाग होता, ओळखू न येणारा.

पण त्या विस्कटलेल्या, फाटलेल्या पिक्सेल्समधूनही, काही गोष्टी उमटल्या होत्या. त्या डिजिटल तड्यांमधून, अर्धवट, विकृत, पण ओळखता येईल इतकं, प्रथमेशचं प्रतिबिंब स्पष्ट दिसत होतं, पाण्यावर वाकलेलं. आणि निलय तो फोटो बघत राहिला, आणि त्याच्या पाठीच्या कण्यातून थंड लहर खाली उतरली, मणका मणका. कारण त्या फोटोतल्या विकृत प्रतिबिंबाचा चेहरा हसरा होता. रुंद, ओढलेलं, कान ते कान पसरलेलं ते अनैसर्गिक हसू, पिक्सेलच्या तड्यांतूनही स्पष्ट दिसत होतं. आणि निलयला अगदी लख्ख आठवत होतं, की त्या क्षणी प्रत्यक्ष प्रथमेश हसत नव्हता. "भारी दिसतंय खरं," तो एवढंच म्हणाला होता, अतिशय गंभीर, आपल्या कामात मग्न असताना. तो हसलाच नव्हता.

प्रतिबिंब हसलं होतं. माणूस हसला नसताना. कॅमेरा ते दृश्य धड टिपू शकला नव्हता, तो आतून बिघडला होता, पण जे टिपायला नको होतं तेवढं मात्र त्या डिजिटल तड्यांतून झिरपून आलं होतं.

निलयनं तो फोटो बोटांनी झूम करून मोठा केला. त्या हसऱ्या प्रतिबिंबावर. आणि त्याचा फोन पकडलेला हात आता जोरजोरात थरथरत होता. पिक्सेल आणखी विस्कटले, विरले. आणि त्या विरणाऱ्या तड्यांमधून, त्या हसऱ्या प्रतिबिंबाच्या

पाठीमागं, पाण्याच्या आणखी खोलात, त्याला ते दिसलं. अंधुक, धूसर, अर्धवट, पण तिथं नक्कीच काहीतरी होतं. आणखी एक आकार. एका माणसासारखा, पण तो माणूस नक्कीच नव्हता. खोल, फार खोल, त्या काळ्या पाण्याच्या अथांग तळाशी जिथं कोणताही तळ नव्हता. आणि तो आकार वर बघत होता. फोटोच्या बाहेर, कॅमेऱ्याच्या बाहेर, थेट वर, जिथं आता निलय तो फोटो हातात धरून बसला होता. तो आकार वाट बघत होता. फारच संयमानं, ज्याच्यापुढं मानवी काळ म्हणजे काहीच नाही अशा एखाद्या प्राचीन गोष्टीच्या अथांग संयमानं.

बाहेर पाऊस कोसळत होता. आत, दाराच्या पलीकडं, प्रथमेशची नखं ते लाकडी दार खरवडत होती, हळू, सतत. आणि निलयच्या हातातल्या त्या फोनच्या उजेडात, त्या शेवटच्या फोटोत, खोल पाण्यातला तो आकार वर बघत राहिला, न हलता, न मिटता.

* * *

प्रकरण आठ : विष

बाप वाहे निवाळी । रगत मागे माती ।

त्या रात्री निलयनं आजवर विखुरलेले सगळे तुकडे एका जागी मांडायला घेतले.

संस्थानच्या त्या कोंदट आणि कुबट वास येणाऱ्या खोलीत, एका जुन्या लाकडी फळकुटावर, त्यानं आपली इंजिनिअरिंगची वही उघडली आणि सगळं सविस्तर लिहायला सुरुवात केली. एका शिस्तबद्ध अभियंत्यासारखं. क्रमानं. जणू हे सगळं वेडसरपण कागदावर एका समीकरणात मांडलं, की त्यातून एखादा सुरक्षित, तार्किक आणि मानवी निष्कर्ष नक्की बाहेर निघेल, अशी त्याची वेडी धडपड सुरू होती. शिळेची ऍकॉस्टिक रचना. अभिषेकाचं अचूक कंपन. पाणी स्थिर झालं की त्याचा अथांग आरसा होणं. त्या आरशातून डोळ्यांवाटे होणारा मानसिक संसर्ग. आणि त्या संसर्गामुळे पूर्णतः सडून बदललेली ती माणसं. त्यानं हे सगळं आकड्यांत, रेषांत, बाणांत पद्धतशीरपणे मांडलं. त्यानं एक मोठी आकृती काढली. कारण आकृती काढली की कोणतीही गुंतागुंतीची आणि भयंकर गोष्ट बुद्धीच्या आटोक्यात येते, समजते, आणि तिचा काहीतरी उपाय नक्की निघतो, हा त्याचा आजवरचा अनुभव होता.

पण यावेळी ही आकृती सुटली नाही. उलट, जसजशा त्या कागदावरच्या रेषा जुळत गेल्या, तसतसं त्याच्या पाठीच्या कण्यातून मृत्यूसारखी एक थंडगार लहर खाली उतरली. त्याची आधुनिक वैज्ञानिक आकृती आणि गजराबाईची ती वेडी, गावरान ओवी... दोन्ही *एकच* भयंकर चित्र काढत होत्या. त्यानं थरथरत्या हाताने ओवीच्या त्या ओळी वहीच्या बाजूला लिहिल्या, बरोबर आपल्या आकृतीशेजारी.

जळ निवळो नेदी कदा. त्याच्या आकृतीत याचा अर्थ: पाणी कधीही स्थिर होऊ देऊ नये.

शिळा जागवी माये. त्याच्या आकृतीत: शिळेचं कंपन कायम जागं ठेवणं.

डोळां डोळां भरे. त्याच्या आकृतीत: प्रतिबिंबातून डोळ्यांवाटे होणारा अमानवीय संसर्ग.

ओळीमागून ओळ... ती जुनी आदिम ओवी आणि त्याचं प्रगत आधुनिक विज्ञान, हुबेहूब एकमेकांचं भाषांतर होते. शब्द वेगळे होते, पण अर्थ एकच अंगावर येणारा होता. शेकडो वर्षांपूर्वी कुणीतरी हेच अथांग आणि हिंस्त्र सत्य ओवीच्या भाषेत साखळदंडासारखं बांधून ठेवलं होतं, आणि आज तो तेच सत्य भौतिकशास्त्राच्या समीकरणांत हतबलपणे उकलत होता. आणि दोन्ही तंतोतंत जुळत होती. फरक फक्त एवढाच होता की, ओवीला हे सत्य शेकडो वर्षं आधीपासून माहीत होतं, आणि

त्याला, या सुशिक्षित आणि अहंकारी इंजिनिअरला ते आत्ता, सगळं हाताबाहेर गेल्यावर, फार उशिरा कळत होतं.

त्यानं पेन खाली ठेवलं. त्याच्या हाताखालच्या कागदावरच्या त्या दोन स्तंभांकडं तो सुन्न होऊन बघत राहिला. ओवी आणि समीकरण. आणि मग त्याला भयंकर जाणीव झाली की ते दोन स्तंभ नव्हतेच; तो एकच अथांग स्तंभ होता, जो फक्त दोन वेगळ्या लिपींत लिहिलेला होता. गजराबाई खरं बोलली होती, तिचा प्रत्येक शब्द खरा होता. त्याचे वडील खरं करत होते, त्यांची प्रत्येक पहाट खरी होती. आणि तो, निलय घाटे... तो एकटाच इतकी वर्षं एक भंपक आणि खोटं आयुष्य जगत आला होता. तब्बल तेरा वर्षं तो त्या दोघांनाही मूर्ख समजत त्यांच्या अडाणीपणावर हसत आला होता.

आणि हीच जाणीव त्याला तुकड्यातुकड्यांत तोडत होती. जसं काही कुणीतरी त्याला जिवंत खात होतं.

कारण आजवर तो आयुष्यात एकाच भक्कम आधारावर उभा होता: विज्ञान खरं, आणि श्रद्धा भाबडी. या एकाच भिंतीवर त्यानं आपलं सगळं आयुष्य रचलं होतं. याच भिंतीच्या आधारावर त्यानं गाव सोडलं होतं, वडिलांना नाकारलं होतं, शहरात जाऊन स्वतःला वेगळं, वरच्या पातळीचं, आणि शहाणं समजलं होतं. त्यानं आपल्या बापाकडं नेहमी तुच्छतेनं बघितलं होतं... एक पुजारी, ज्याला आपण जे करतोय त्याचा अर्थ न कळता तो फक्त

आंधळेपणाने नेम पाळतोय, असा त्याचा ठाम समज होता. त्यानं गजराबाईला वेडी मानलं होतं. त्यानं या अख्ख्या गावाला मागासलेलं ठरवलं होतं. आणि आता ती अहंकाराची भिंत त्याच्या स्वतःच्या हातांनी त्याच्या अंगावर कोसळत होती. कारण विज्ञान आणि श्रद्धा या एकमेकांच्या विरुद्ध कधीच नव्हत्या. त्या एकाच अथांग आणि हिंस्त्र गोष्टीकडं बघण्याच्या दोन वेगवेगळ्या भाषा होत्या. आणि दोघांनाही ती गोष्ट पूर्ण दिसत नव्हती, दोघांनाही तिची प्रचंड भीती वाटत होती, आणि दोघंही तिला फक्त झोपवून ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न करत होते, वेगवेगळ्या शब्दांत तीच एक थरथरणारी प्रार्थना म्हणत.

त्यानं ती वही मिटून टाकली. त्याचे दोन्ही हात एखाद्या म्हाताऱ्या माणसासारखे जोरजोरात कापत होते. त्यानं आयुष्यभर जे नाकारलं, ते 'खोटं' आहे म्हणून नाकारलं होतं. पण ते खोटं नव्हतंच. ते खूप खरं होतं, आणि तरीही त्यानं स्वतःच्या अहंकारात ते नाकारलं होतं, आणि त्याच्या त्या नाकारण्यानंच आज हे मरणाचं तांडव घडलं होतं. त्यानं शिळा उघडली, कारण त्याला ती नुसती एक निर्जीव दगड वाटली. प्रथमेश मेला, कारण निलयनंच त्याला स्वतःच्या स्वार्थासाठी इथं आणलं. हे अख्खं गाव मरणार होतं, कारण निलयला वाटलं होतं की जुनी माणसं मूर्ख आहेत. पण जुनी माणसं मूर्ख नव्हती, ती फक्त एका अशा वेगळ्या भाषेत शहाणी होती, जी वाचण्याची निलयची कधीच लायकी नव्हती.

विष, त्याला खोलवर वाटलं. घशात जळजळीत आवंढा गिळत त्याला वाटलं, *हेच ते खरं विष होतं.* त्या काळोख्या पाण्यातलं नाही. माझ्या डोक्यातलं. मी ज्याला आयुष्यभर माझं 'शहाणपण' म्हणत आलो, तोच माझा तर्कशुद्ध अहंकार, तोच माझा तिरस्कार... तेच सर्वांत भयंकर विष होतं. आणि तेच विष आता या अख्ख्या गावाच्या रक्तात उतरलं होतं, फक्त माझ्यामुळं.

पण एक प्रश्न अजून उरला होता, आणि तोच जगातला सर्वात भयंकर प्रश्न होता. तो आरसा उघडला गेला होता. आता तो परत कसा बंद करायचा?

निलयनं थरथरत्या हाताने परत वही उघडली. जर अभिषेकाचं कंपन ते पाणी हलतं ठेवायचं, आणि ती अवाढव्य शिळा ते कंपन तयार करायची, तर ती शिळा परत जागेवर बसवली, अभिषेक परत सुरू केला, की तो आरसा परत धुसर होईल. तर्काला हे अत्यंत सोपं वाटत होतं. यांत्रिक. पण त्याच्या अंतर्मनाला पक्कं माहीत होतं की आता तेवढं पुरेसं नाही. कारण आता त्या पाण्यात नुसतं 'प्रतिबिंब' उरलेलं नव्हतं. आता ते अथांग 'काहीतरी' संपूर्णपणे जागं झालं होतं. आता ते पाण्याच्या तळाशी झोपलेलं नव्हतं, ते थेट वर आलं होतं, पाण्याच्या पृष्ठभागापर्यंत, त्या बारवेच्या काठापर्यंत. आणि त्याची अदृश्य, हिंस्त्र नजर आता पूर्ण उघडी होती, थेट गावाकडं रोखलेली. ते

पाण्याबाहेर आलं नव्हतं, ते भौतिकदृष्ट्या बाहेर येऊ शकतही नव्हतं, पण त्याची अमानवीय जाग, त्याची ती मज्जासंस्थेला गोठवणारी पकड आता पाण्याच्या काठापर्यंत पसरली होती. नुसतं कुलूप परत लावून आता भागणार नव्हतं. जे जागं होऊन काठापर्यंत आलं होतं, त्याला परत खोल, त्या अथांग तळाशी, त्या झोपेत ढकलावं लागणार होतं.

आणि इथं त्याची आकृती एका ओळीशी येऊन थबकली, आणि ती ओळ त्याला कोणत्याही प्रकारे वाचवत नव्हती.

गजराबाईची ओवी.

बाप वाहे निवाळी । रगत मागे माती.

त्यानं ती ओळ पुन्हा पुन्हा वाचली, आणि सुरुवातीला त्याला तिचा अर्थ लागत नव्हता, आणि मग अचानक तो लागला. आणि तो लागल्यावर त्याच्या डोळ्यांसमोर अंधारी आली आणि त्याला अक्षरशः उलटी झाल्यासारखं वाटलं.

रक्त. *माती मागते रक्त.* ते जे काही आता काठापर्यंत जागं होऊन आलं होतं, ते परत झोपायला एक किंमत मागत होतं. एक जिवंत माणूस. कुणालातरी त्या नितळ, काळ्या पाण्यात स्वतःहून उडी मारावी लागणार होती, आत, त्या अथांग गोष्टीबरोबर, तिला परत खोल तळाशी ओढून नेण्यासाठी. एक बळी. तो आरसा आता एका जिवंत माणसाच्या बदल्यातच बंद होणार होता.

पण ओवीत "माती" म्हटलं होतं, "पाणी" नाही, आणि निलयच्या तर्कशुद्ध मेंदूला हा भाषिक फरक खटकला. *रगत मागे माती.* माती रक्त मागते. मग बळी पाण्यात का, मातीत का नाही? त्यानं क्षणभर विचार केला, की कदाचित रक्त त्या शिळेवर सांडायचं असेल, त्या यंत्रावर, किंवा आजूबाजूच्या देवळाच्या मातीत. पण मग त्याला ते अंगावर काटा आणणारं सत्य उमगलं. कारण त्या पाण्याखाली मातीच होती. ती जागा, ते अथांग, त्या पाण्याच्या तळाशी, जिथं कोणताही तळ नव्हता, तिथं मातीच होती. त्याच आदिम रानातली माती जिच्याखाली ते शेकडो शतकं वाट बघत होतं. पाणी आणि माती वेगळे नव्हतेच. त्या पाण्यात उडी घेणं म्हणजेच थेट त्या मातीत मरणं होतं. ओवी खोटं बोलत नव्हती. ती फक्त निलयला न कळणाऱ्या आदिम भाषेत जळजळीत सत्य बोलत होती, नेहमीसारखी.

निलय बराच वेळ त्या ओळीकडं सुन्न होऊन बघत बसला. त्याच्या विज्ञानानं त्याला यंत्रणा दिली होती, कारण दिलं होतं, उपायही दिला होता. पण तो उपाय 'एक खून' होता. आणि त्याचं विज्ञान त्याला हे 'सांगू' शकत होतं, पण हे 'करायला' सांगू शकत नव्हतं. कारण एका जिवंत माणसाला मरणाच्या पाण्यात ढकलणं, हे इंजिनिअरिंगच्या समीकरणात बसत असलं तरी, एका माणसाच्या काळजात बसत नाही.

तो कुणाला ढकलणार तिथं? गावातल्या एखाद्याला, जो आधीच बदललाय, जो आधीच अर्धा संपून कुजलाय? पण तो अजून जिवंत होता, श्वास घेत होता, त्याची बायको-पोरं घरी रडत त्याची वाट बघत होती. प्रथमेशला? जो त्या अंधाऱ्या खोलीत वेड्यासारखा नखं खरवडत होता? तो त्याचा मित्र होता, तेरा वर्षांचा, ज्याला स्वतः निलयनंच त्याच्या स्वार्थासाठी इथं आणलं होतं. मग स्वतःला? त्यानंच ही शिळा उघडली, ही त्याचीच चूक होती, त्यानंच किंमत भरायला हवी... पण पाण्याच्या काठावर उभं राहून, त्या अथांग आणि भयानक गोष्टीकडं बघून, स्वतःहून त्या मरणात उडी घ्यायची, ती हिंमत त्याच्यात नव्हती. त्याला मरायचं नव्हतं. आणि हे स्वतःशीच कबूल करणं, या सगळ्यात, सर्वांत लाजिरवाणं होतं.

आणि इथं तो पूर्णपणे गोठला. दोन असह्य गोष्टींच्या बरोबर मध्ये. एका बाजूला अख्खं गाव होतं, हजारो लोक, यात्रेला येणारे, सगळे मरणार होते, जर त्यानं आत्ता काही केलं नाही तर. आणि दुसऱ्या बाजूला एक खून होता, कुणाचातरी, किंवा स्वतःचा, जो त्याला करता येत नव्हता. गणिताच्या दृष्टीने हे अतिशय सोपं होतं. एक जीव, हजारो जीवांसाठी. जगातला कुठलाही अभियंता, कुठलाही तर्कशुद्ध माणूस, ते गणित सहज सोडवेल. पण निलय ते सोडवू शकत नव्हता, कारण ते निव्वळ गणित नव्हतं, ती माणसं होती. आणि माणसं कधीच आकड्यांत

मोजता येत नाहीत, हे त्याला आज, आयुष्यात पहिल्यांदा, त्याच्या सगळ्या आकड्यांच्या पलीकडं जाऊन कळत होतं.

तो नुसता तिथं फळकुटावर बसून राहिला, वही उघडी, आणि बाहेर कोसळणारा वेडा पाऊस. आणि दूर खोलीतून येणारा प्रथमेशचा तो आवाज.

...

सुरुवातीला, त्या पहिल्या रात्री, प्रथमेशनं ते लाकडी दार तोडायचा जीवघेणा आटापिटा केला होता. त्यानं दाराला धक्के मारले होते, तो एखाद्या जनावरासारखा हिंस्त्रपणे ओरडला होता, दाराला लाथा घातल्या होत्या, स्वतःच्या नखांनी लाकूड फाडायचा प्रयत्न केला होता, इतका की दारावर खोल ओरखडे उमटले होते आणि त्याच्या बोटांतून रक्त आलं होतं. त्याचे डाग दारावर वाळले होते. पण आता, दोन दिवसांनी, त्याची ती धडपड संपली होती. एकतर त्याची भौतिक ताकद संपली होती, नाहीतर ती अमानवीय गोष्ट आता त्याच्यावर पूर्ण ताबा मिळवत होती. आणि म्हणून आता तो फक्त एकसुरी, यांत्रिक पद्धतीनं ते दार खरवडत होता. हळू, सतत, एकाच लयीत. आणि तो शांत, थकलेला, न थांबणारा खरवडण्याचा आवाज त्या पहिल्या रात्रीच्या हिंस्त्र आरडाओरड्यापेक्षा हजार पटीने जास्त भयंकर होता. कारण त्या आवाजात आता कोणतीही मानवी आशा उरली नव्हती, फक्त त्या काळ्या पाण्याची ओढ उरली होती.

आणि तो नखांचा करकरीत आवाज निलयच्या मेंदूची कवटी आतून खरवडत होता, त्याला त्या भरायच्या 'किंमतीची' सतत आठवण करून देत होता.

सकाळी गावाची परिस्थिती भयानक झाली होती.

रात्रीतून गावातले आणखी दोघं बदलले होते, आणि ते आता त्या देवळामागच्या उघड्या पायऱ्यांभोवती जमा होत होते. हळूहळू, एकेक करत, कुणीतरी अदृश्य साखळदंडाने ओढल्यासारखे. आता जवळपास आठ-दहा जण तिथं बसले होते. निश्चल, त्या खाली अंधाऱ्या खोलीकडं तोंड करून. आणि गावातली बाकीची माणसं प्रचंड घाबरून घरात दडून बसली होती, दारं घट्ट लावून. कारण त्यांना अंतर्मनातून कळत होतं की काहीतरी भयंकर घडतंय, पण नक्की काय ते कळत नव्हतं. आणि गावातून बाहेर पडायची कुठलीच वाटही उरली नव्हती. हे गाव आता एका मोठ्या थडग्यासारखं आतल्या आत सडून कुजत होतं. आणि जे लोक बदलले होते ते मुळीच हिंसक नव्हते, ते आरडाओरडा करत नव्हते, कुणाला त्रास देत नव्हते, आणि तेच सर्वांत भयानक होतं. ते फक्त शांतपणे, एका अमानवीय संयमानं, त्या पाण्याकडं बघत बसून होते. वाट बघत. जणू त्यांना माहीत होतं की काळ त्यांच्याच बाजूनं आहे. जणू खालचं 'ते' ही तेच करत होतं. वाट बघत.

सरपंच बाळासाहेब चिखलातून चालत निलयकडं आला होता, हात जोडत, लहान पोरासारखा रडत. त्याचा सख्खा भाऊ त्या बदललेल्या झोम्बीसारख्या माणसांत जाऊन बसला होता. "साहेब, काहीतरी करा. माझा भाऊ... तो माझ्याकडं बघतच नाही आता. आम्ही त्याला ओढून आणायचा प्रयत्न केला, चार-पाच माणसं लावली, पण तो जागचा हलतच नाही. दगडासारखा जड झालाय, इतका की उचलताच येईना. जसं काही जमिनीनंच त्याला धरून ठेवलंय." त्याचा आवाज भीतीने कापत होता. "पंचायत बोलावली, कुणी येत नाही, सगळे घाबरलेत. देव आपल्यावर कोपलाय साहेब. काहीतरी करा, तुम्ही शिकलेले आहात."

आणि निलयकडं त्याला सांगायला एकही शब्द नव्हता. कारण जे त्याला माहीत होतं ते सांगण्यासारखं नव्हतं, आणि जे सांगण्यासारखं होतं ते त्याला माहीत नव्हतं. पण एक गोष्ट त्यानं आदल्या दिवशीच केली होती, त्याच्या आतल्या अभियंत्याच्या सवयीनं. त्या देवळामागच्या पायऱ्यांचं तोंड त्यानं बांबू आणि लाकडी फळ्या लावून पूर्णतः बंद केलं होतं. आडवे बांबू घट्ट बांधून, दोरखंड ओढून, एक तात्पुरता भौतिक अडसर तयार केला होता. जेणेकरून कुणीही सहज आत जाऊ नये. जे आधीच बदलले होते ते तो अडसर ओलांडून आधीच आत बसले होते, कारण त्यांना ती ओढ थांबवता येत नव्हती. पण निदान नव्या माणसांना तो अडसर एक क्षण तरी थांबवेल, एवढी त्याची वेडी

आशा होती. भौतिक अडथळा, भौतिक उपाय... त्याच्या इंजिनिअर-मनाला जेवढं करता येईल तेवढं त्यानं केलं होतं.

आणि नेमकं तेव्हा निलयला तिथून स्वप्नील येताना दिसला.

स्वप्नील जेमतेम एकोणीस वर्षांचा होता, गावातला कॉलेजला जाणारा पोरगा, आणि निलय या गावात आल्यापासून तो सावलीसारखा निलयच्या मागंमागं असायचा. कारण निलय त्याच्यासाठी एक जिवंत स्वप्न होता... बाहेर गेलेला, शिकलेला, या खेड्याच्या बाहेर पडलेला. "मलाही बाहेर जायचंय दादा," तो नेहमी म्हणायचा. "हे गाव, ही अंधश्रद्धा, हे सगळं मला नकोय. तुमच्यासारखं शहरात जायचंय." आणि निलयला त्याच्यात स्वतःचं तरुणपण दिसायचं. तीच पळण्याची घाई, तोच गावाचा तिटकारा, तीच बाहेर पडायची ओढ.

आणि आता तोच स्वप्नील त्या पायऱ्यांच्या दिशेनं चालला होता. आणि त्या बांबूच्या अडसरापाशी पोचून तो थांबला नाही. तो वाकून, त्या बांबूखालून आत सरकायचा प्रयत्न करत होता. हळू, एका गुंगीत आणि स्वप्नात चालल्यासारखा.

तो बदललेला नव्हता, अजून तरी नाही. त्याचे डोळे रिकामे झाले नव्हते. पण तो त्या अडसराखालून आत जात होता, एका भयंकर कुतूहलानं ओढल्यासारखा. त्याला फक्त बघायचं होतं की खाली नक्की काय आहे. आणि हे बघून निलयचं रक्त गोठलं, कारण त्याला पक्कं माहीत होतं की एकदा त्या पोरानं त्या

काळ्या पाण्यात बघितलं, की सगळं संपलं. तो बांबूचा अडसर, ज्यावर निलयनं इंजिनिअर म्हणून भरवसा ठेवला होता, तो स्वप्नीलला अजिबात थांबवत नव्हता. तो भौतिक बांबू त्या मानसिक ओढीपुढं काहीच नव्हता.

"स्वप्नील!" निलय जीवाच्या आकांताने धावला, आणि त्यानं स्वप्नीलला मागून धरलं. त्याच्या दंडाला घट्ट पकडून त्यानं त्याला त्या अडसराखालून ओढून मागं काढलं, त्या पायऱ्यांपासून दूर. "थांब! तिकडं जाऊ नको!"

स्वप्नील गोंधळून वळला. "दादा? काय झालं? मी फक्त बघत होतो, खाली काय हाय थे. सगळे तिकडंच बगताय ना, म्हणून वाटलं..."

"खाली बघू नको." निलय त्याच्याजवळ पोचला, त्याचा दंड धरला, घट्ट. "त्या पाण्यात बघू नको. कधीच. वचन दे मला."

"पण दादा, तुम्हीच त म्हणलं होत ना, ही सगळी अंधश्रद्धा हाये, भीती वगैरे काही नसतं..." स्वप्नील हसायचा प्रयत्न करत होता, पण त्याची नजर परत त्या पायऱ्यांकडं नकळत ओढली जात होती, आणि त्याला स्वतःला ते कळतही नव्हतं. "मले बघू द्या ना जरासक. फक्त येकदा."

आणि निलयनं त्याला गदागदा हलवलं. त्याच्या दोन्ही खांद्यांना घट्ट धरून, त्याचा चेहरा स्वतःकडं वळवला, त्या काळ्या पाण्यापासून दूर.

"ऐक माझं," निलय म्हणाला, आणि त्याचा आवाज कापत होता. "मी चुकलो. आजवर मी जे सांगत आलो, ते चूक होतं. इथं खरंच काहीतरी आहे, स्वप्नील, आणि ते तुला ओढतंय, आणि तू त्याला बळी पडू नको. तू माझ्यासारखा होऊ नको." त्यानं स्वप्नीलच्या डोळ्यांत बघितलं, आणि त्याला त्यात स्वतःचंच एकोणीस वर्षांचं रूप दिसलं, तेच रूप जे तेरा वर्षांपूर्वी या गावातून पळालं होतं. "मी पळालो, स्वप्नील. या गावातून, या सगळ्यापासून, माझ्या बापापासून, मी पळालो. आणि मला वाटलं मी शहाणा आहे. पण पळून मी काहीच सोडवलं नाही, फक्त लांबवलं. आज मला परत इथंच यावं लागलं, आणि आज सगळं माझ्या डोळ्यांसमोर मरतंय."

"दादा, तुम्ही मले भेवाडताय..."

"घाबर. घाबरणं बरं आहे. घाबरलास तर जिवंत राहशील." निलयनं त्याला मागं ढकललं, त्या पायऱ्यांपासून दूर, गावाच्या दिशेनं. "मी तुला सांगतो ते ऐक. मी पळालो तसा तू पळू नको. पळणं हे उत्तर नाही. पण..." आणि इथं त्याचा आवाज फुटला. कारण त्याला जे म्हणायचं होतं ते त्याला त्याच्या स्वतःच्या वडिलांनी कधीही म्हटलं नव्हतं, आणि आज तो ते या पोराला देत होता, जे त्याला स्वतःला कधी मिळालं नव्हतं. "पण तू जग. काहीही झालं तरी तू जग. जिथं आहेस तिथून लढ, पळून नको, पण जग. मला वचन दे."

स्वप्नीलच्या डोळ्यांत आता भीती होती, खरी आदिम भीती, आणि तीच भीती त्याला वाचवणार होती. त्यानं मान हलवली, थरथरत. "हो दादा. वचन."

"आता घरी जा. दार लावून घे. आणि काहीही झालं, कितीही हाका आल्या, कितीही ओढ वाटली, त्या पाण्याकडं बघायला येऊ नको. गेलास तर मी तुला माफ करणार नाही."

आणि स्वप्नील गेला. मागं वळून वळून बघत, पण गेला, त्या पायऱ्यांपासून दूर, जिवंत. आणि निलय तिथं उभा राहिला, आणि त्याला एका विचित्र गोष्टीची जाणीव झाली. त्यानं आत्ता स्वप्नीलला जे दिलं, ती हिंमत, ती माया, तो "तू जग" चा आग्रह... ते सगळं त्याला स्वतःला कधीच मिळालं नव्हतं. त्याच्या वडिलांनी त्याला कधी थांबवलं नव्हतं, कधी पाठीवर हात ठेवून "तू जग" म्हटलं नव्हतं, त्यांनी फक्त 'नेम पाळ' म्हटलं होतं. आणि आज, इतक्या वर्षांनी, निलय एका अनोळखी पोराला ते देत होता, जे त्याच्या स्वतःच्या आयुष्याच्या रिकामेपणात कधीच भरलं गेलं नव्हतं.

तो परत संस्थानच्या खोलीकडे वळला, आणि वाटेत त्याला वडील दिसले.

प्रकाश गुरुजी देवळाच्या दारात उभे होते, आणि ते निलयकडं बघत होते. त्यांच्या चेहऱ्यावर काहीतरी असं होतं जे निलयनं आधी कधी बघितलं नव्हतं. त्यांनी स्वप्नीलचा तो सगळा

प्रसंग बघितला होता, दुरून. आणि आता ते बापलेक एकमेकांकडं बघत उभे होते, आणि त्या मूक नजरेत बरंच काही होतं जे शब्दांत यायचं नव्हतं.

"तू त्या पोराले वाचवलं," प्रकाश गुरुजी हळू आवाजात म्हणाले.

"हो."

"आन स्वतःले?" त्यांनी थेट विचारलं. "स्वतःले कोन वाचवण?"

निलयनं उत्तर दिलं नाही. कारण त्याला पक्कं माहीत होतं की आता एका किंमतीचा प्रश्न आहे, आणि ती किंमत आता कुणालातरी भरावीच लागणार आहे, आणि त्याला ती कुणाकडूनही भरवत नव्हती. त्यानं वडिलांकडं बघितलं, आणि पहिल्यांदा त्याला त्यांच्या डोळ्यांत तो आंधळा नेम दिसला नाही. त्याला तिथं काहीतरी वेगळं दिसलं. एक अतिशय शांत जाणीव. जणू वडिलांना ती 'किंमत' आधीच कळली होती, त्याच्या कितीतरी आधीच, आणि ते त्या भयानक किंमतीशी हळूहळू समेट करत होते.

"बाबा," निलय म्हणाला, आणि त्याचा आवाज एखाद्या लहान मुलासारखा कातर झाला, "मला माहितीय आता हे कसं थांबवायचं. पण ते थांबवायला... कुणालातरी..." तो ते वाक्य पूर्ण करू शकला नाही.

"मला ठाऊक हाय," प्रकाश गुरुजी म्हणाले, अगदी शांतपणे, आणि त्यांच्या त्या अथांग शांततेनं निलयला त्या पावसापेक्षा, त्या नखांच्या खरवडण्यापेक्षा, त्या सगळ्यापेक्षा जास्त घाबरवलं. "मले फार पूर्वीपासून ठाऊक हाय लेकरा. फक्त तुले कळायची वाट बगत व्हतो."

"तुम्हाला... तुम्हाला कसं माहीत?" निलयनं विचारलं, आणि त्याचा आवाज थरथरत होता. "तुम्हाला तर अर्थ माहीत नव्हता. तुम्ही म्हणालात, फक्त नेम पाळायचा, अर्थ इचारायचा नाई."

"अर्थ नाई ठाऊक व्हता. पन किंमत ठाऊक व्हती." प्रकाश गुरुजींनी निलयकडं बघितलं, आणि त्यांच्या डोळ्यांत आता अश्रू नव्हते, फक्त एक अतिशय जुनी, थकलेली शांती होती. एका अशा माणसाची शांती जो फासावर जायला तयार झालाय. "माझ्या बापानं मले सांगितलं नव्हतं, पन मले दिसलं व्हतं, त्याच्या डोळ्यांत, शेवटच्या दिशी. आन त्याच्या बापाच्या डोळ्यांत त्याले दिसलं असंल. घाटेच्या घरात हे असंच चालत आलंय, बाळा. आमी नेम पाळतो, आन एक दिस, जवा येळ येते, तवा आमीच किंमत भरतो. अर्थ नाई कळत, पन जवाबदारी कळते." ते थांबले. "तू पळालास, म्हून तुले ती जवाबदारी टाळता आली, तेरा वर्सं. पन ती टळत नाई लेकरा. ती फक्त वाट बगते."

आणि ते वळून आत गेले, गाभाऱ्यात, त्यांच्या रोजच्या जागी. आणि जाताना त्यांचे खांदे जरा वाकलेले होते, एका अशा माणसाचे जो आता मृत्यूचं जड ओझं उचलायची तयारी करतोय. आणि निलय बाहेर एकटा उभा राहिला, त्या किंमतीचं ओझं हातात घेऊन. कुणालाच मृत्यूत ढकलू न शकणारा, स्वतःलाही झोकून देऊ न शकणारा. दोन्हींच्या मध्ये गोठलेला. बाहेर पाऊस थांबला होता, पण आकाश अजून काळं होतं, आणि दूर डोंगरामागं काळे ढग अजून जमतच होते, आणखी एका अंधाऱ्या रात्रीसाठी. आणि त्या ढगांच्या खाली, देवळामागच्या त्या अंधाऱ्या खोलीत, ते पाणी स्थिर होतं, नितळ, आणि वाट बघत होतं. त्याच्या संयमाला काळाचं कोणतंही बंधन नव्हतं.

* * *

प्रकरण नऊ : बळी

काळ उभा दारी । बळी विना न टळे ।

संस्थानच्या त्या अंधाऱ्या आणि कोंदट खोलीत प्रथमेशच्या नखांचा तो एकसुरी, लाकूड खरवडणारा आवाज अचानक थांबला.

तो आवाज थांबणं खरंतर एखाद्या सुटकेसारखं वाटायला हवं होतं, पण निलयला तसं अजिबात वाटलं नाही. उलट, त्या अंगावर येणाऱ्या थांबण्यानं त्याच्या नसांमधलं रक्त अक्षरशः गोठून गेलं. कारण गेले दोन अमानुष दिवस तो आवाज म्हणजे प्रथमेश अजून तिथं जिवंत आहे, त्याच्यात अजून काहीतरी मानवी अंश उरलाय याची एकमेव खूण होती, आणि आता ती खूणही कायमची पुसली गेली होती. बाहेरचा वेडा पाऊस आता ओसरला होता, आणि त्या रात्रीच्या मिट्ट काळोखात एक गुदमरवणारी, वजनदार शांतता पसरली होती. अशी शांतता जी कुठल्याही रौद्र वादळापेक्षा हजार पटीने जास्त भयंकर आणि जड होती.

निलय त्या फळकुटावरून उठला. त्याचे पाय जड शीस ओतल्यासारखे झाले होते. त्याच्या आतल्या अती-तार्किक मेंदूनं आता हार मानली होती. आता तिथं कोणतंही समीकरण उरलं नव्हतं, कुठलाही तर्क उरला नव्हता. उरलं होतं ते फक्त एकच

जुनं, आदिम सत्य. माती रक्त मागत होती. तो अथांग आरसा एक बळी मागत होता. आणि त्याचे म्हातारे वडील ती भयानक किंमत भरायला गाभाऱ्यात गेले होते.

"नाही," तो स्वतःशीच पुटपुटला, क्षीण आणि कातर आवाजात. "मी हे होऊ देणार नाही."

तो वेगाने बाहेर पडला आणि चिखलातून धावत देवळाच्या मुख्य दाराकडं गेला. पण आवारात त्याला जे दृश्य दिसलं, त्यानं तो जागच्या जागी थिजून थांबला.

जे लोक बदलले होते... रघू, विठ्ठल, नामा, सरपंचाचा भाऊ आणि आणखी काही... जे सकाळपासून देवळामागं एखाद्या निर्जीव दगडांसारखे बसून होते, ते आता तिथून उठले होते. ते फारच संथपणे, एखाद्या मूक आणि हिंस्त्र जनावरांच्या कळपासारखे, एका रांगेत नाही पण एकाच दिशेनं, गाभाऱ्याच्या दिशेनं चालत होते. त्यांची पावलं जमिनीवर फरफटत आणि घासत होती, त्यांचे डोळे संपूर्णपणे रिकामे आणि पांढरे फटक पडलेले होते. ते गाभाऱ्याच्या उघड्या दाराबाहेर, अंधारात एका अर्धवर्तुळात उभे राहिले. पूर्णपणे निश्चल. वाट बघत. आणि त्यांचं ते शांत, संयमी उभं राहणंच जगातलं सर्वांत भयंकर दृश्य होतं. कारण त्यांच्यात कोणतीही मानवी हिंसा नव्हती, कोणतीही घाई नव्हती. तिथं फक्त एक थंडगार, अमानवीय खात्री होती. जणू

त्यांना पक्कं माहीत होतं की आता जे घडणार आहे ते ठरलेलं आहे, आणि त्यांना फक्त ते बघण्यासाठी इथं उभं राहायचं आहे.

निलय छातीवर हात ठेवून धापा टाकत गाभाऱ्याच्या उंबरठ्यापाशी पोचला. त्या बदललेल्या, झोम्बीसारख्या माणसांनी त्याला अडवलं नाही. त्यांनी त्याच्याकडं साधं वळून बघितलंही नाही. ते फक्त त्याच्या आजूबाजूला मूकपणे उभे राहिले, कशाची तरी वाट बघत.

निलयनं गाभाऱ्यात आत पाहिलं, आणि त्याचा श्वास घशातच अडकला.

आत, त्या मिणमिणत्या आणि पिवळसर दिव्याच्या उजेडात, प्रकाश गुरुजी उभे होते. त्यांनी अंगावरचे सगळे कपडे उतरवले होते, फक्त कमरेला एक स्वच्छ पांढरं धोतर नेसलेलं होतं. त्यांच्या उघड्या, म्हाताऱ्या आणि रापलेल्या अंगावर त्यांनी भस्माचे जाड पट्टे ओढले होते. कपाळावर, दंडांवर, छातीवर. ते रोजची साधी पूजा करत नव्हते. ते स्वतःला एका अंतिम आणि परतीच्या प्रवासासाठी तयार करत होते. त्यांच्या चेहऱ्यावर कोणतीही भीती नव्हती, कोणतीही अस्वस्थता नव्हती. तिथं फक्त एक जुनी पोलादासारखी अभेद्य शांतता होती.

"बाबा!" निलय जीवाच्या आकांताने ओरडला, उंबरठा ओलांडून आत गेला. "बाबा, थांबा. मला माहितीय आता काय करायचंय. आपण दोघं मिळून ती शिळा आत्ताच परत ढकलू, तो

नाद परत सुरू करू. आणि जर त्यानं भागणार नसेल, जर किंमत भरावीच लागणार असेल, तर ती मी भरतो. माझी चूक होती. मला जाऊ द्या."

प्रकाशनं त्याच्याकडं वळून बघितलं. आणि त्यांच्या त्या खूप शांत आणि भेदक नजरेसमोर निलयचा तो आवाज, त्याचा तो सगळा आधुनिक तर्क, एखाद्या कोरड्या पानासारखा हवेत विरून गेला.

"तू समुद्राचं पानी बादलीनं उपसू शकत नाई, लेकरा," प्रकाश म्हणाले, अत्यंत खर्जातल्या, शांत आवाजात. "ते पानी नाईये. ते एक तोंड हाय. आन ते आता उघडलंय."

"पण तुम्ही का?" निलयच्या डोळ्यांतून आता अश्रू वाहत होते. आयुष्यात पहिल्यांदा तो आपल्या बापासमोर एका लहान, हतबल मुलासारखा धाय मोकलून रडत होता. "ही माझी चूक होती, बाबा. मी शिळा उघडली. मी सगळ्यांवर हसलो, तुमच्यावर, गजराबाईवर, अख्ख्या गावावर. मग किंमत तुम्ही का भरायची? मला भरू द्या."

आणि निलयनं पुढं व्हायचा प्रयत्न केला, वडिलांना बाजूला सारून स्वतः त्या मागच्या दाराकडं जायचा. पण त्याचे पाय जमिनीवरून उचललेच नाहीत. तो जागच्या जागी थिजला, जसं काही त्या प्राचीन जमिनीनंच त्याचे पाय घट्ट धरून ठेवले असावेत. त्यानं पूर्ण जोर लावला, स्वतःच्या शरीराशी झुंजला,

पण त्याचं शरीर त्याला साथ देईना. त्याला त्या पाण्याकडं जायचं होतं, स्वतःला बळी द्यायचं होतं, आणि तरीही काहीतरी प्रचंड ताकदीचं त्याला तिथं थांबवत होतं, त्याच्या इच्छेच्या पूर्ण विरुद्ध. आणि ते काय होतं हे त्याला मुळीच कळत नव्हतं. फक्त एवढं अंगावर येण्यासारखं जाणवत होतं की त्याला तिकडं जाऊ दिलं जात नव्हतं, त्याची तिथं गरज नव्हती, त्याच्यासाठी वेगळं काहीतरी राखून ठेवलं होतं.

प्रकाश चालत त्याच्याजवळ आले. त्यांनी आपला तो खरखरीत, भस्मानं माखलेला हात निलयच्या खांद्यावर ठेवला. तो स्पर्श अनपेक्षितपणे खूप उबदार होता, आणि त्या एका स्पर्शानं निलयच्या आतलं सगळं बांधून ठेवलेलं पाणी अचानक फुटलं.

"तुझी चूक नाई बाळा. चूक माझी होती." प्रकाशच्या आवाजात आता तो कडक पुजारी नव्हता, फक्त एक बाप होता. "माझ्या बापानं मले फक्त नेम शिकवला, अर्थ नाई, आन मी तर तुले तेबी शिकवलं नाई. तुझी आय गेली तवा तू लहान व्हतास, आन मी तुले जवळ घ्यायच्या ऐवजी या देवळात बुडून ऱ्हायलो, कारन मले भ्या व्हतं, या जागेचं, या जवाबदारीचं. तुले वाटलं मी दगड हाय, प्रेम नसलेला. पन मी दगड नव्हतो लेकरा. मी भ्यालेलो व्हतो. आन भ्यालेला बाप लेकराले दूर लोटतो, जवळ नाई घेत." त्यांनी एक दीर्घ श्वास घेतला, आणि त्यांचे म्हातारे

डोळे क्षणभर ओले झाले, आणि परत कोरडे पडले. "मी तुले या गावापासनं दूर पाठवलं, हे टळंल म्हून. मले वाटलं, तू शहरात गेलास, शिकलास, इंजिनिअर झालास, तर हे रक्त तुले सोडंल. पन जे टाळायचं म्हणून तू पळालास, ते तुझी वाट बघत हितंच व्हतं, संयमानं." त्यांनी निलयच्या चेहऱ्याकडं बघितलं. "घाटेच्या रक्ताले ती जागा ओळखते, लेकरा. दर पिढीत एकाले. आन आपन नेम पाळतो, आन येळ आली की आपनच किंमत भरतो. ही किंमत या म्हाताऱ्या हाडाइची हाय, तुझ्या रक्ताची नाई. अजून नाई."

"बाबा, नाही..." निलय त्यांना घट्ट मिठी मारायला पुढं झाला, आणि यावेळी त्याचे पाय उचलले. पण प्रकाशनं त्याला हळुवारपणे, पण एका न कळणाऱ्या अमानवीय ताकदीनं मागं ढकललं. आणि तरी, ढकलण्याआधी, फक्त एक क्षण, त्यांनी निलयला जवळ घेतलं. घट्ट. तेरा वर्षांचं सगळं कोरडं अंतर त्या एका मिठीत मिटवून टाकत. आणि त्या क्षणी निलयला त्यांच्या उघड्या अंगावरच्या त्या भस्माचा वास आला, आणि त्याखालचा घामाचा, म्हातारपणाचा, त्याच्या 'बापाचा' वास आला, जो त्याला लहानपणापासून ओळखीचा होता, आणि जो तो गेली तेरा वर्षं शहरात विसरून गेला होता.

"तुले जगायचं हाय. आन तुले लय काही बघायचं हाय," ते म्हणाले, एक पाऊल मागं होत. आणि त्यांच्या आवाजात आता

एक अंतिम आदेश होता, बापाचा नव्हे, तर शेकडो वर्षांच्या परंपरेच्या राखणीचा. "घाटेच्या रक्तात बघनं हाय. तू डोळे मिटायचे नाई. आज जे घडंल ते तू उघड्या डोळ्यांनी बघायचं. आन उद्या, ही शिळा तू तुझ्या विज्ञानानं परत बसवायची, कायमची. तो नाद परत सुरू करायचा. हेच तुझं काम हाय. मी माझं करतो, तू तुझं कर."

आणि निलयला त्यात त्याच्या आयुष्यभराच्या प्रश्नाचं ते भयंकर उत्तर मिळालं, जे त्याला अजिबात नको होतं. तो का वाचला, तो का वेगळा, याचं पूर्ण उत्तर नाही, पण त्याची दिशा मिळाली होती. त्याला बघायचं होतं. त्याला राखायचं होतं. त्याला जगायचं होतं, या सगळ्या विनाशाचा एकमेव साक्षीदार म्हणून. वडील का जात होते आणि तो का उरत होता, या दोन्हींचं कारण एकच होतं, आणि ते कारण त्याला पूर्ण कळत नव्हतं, फक्त हाडांतून जाणवत होतं.

प्रकाश वळायच्या अगदी आधी थांबले. त्यांनी आपल्या गळ्यातली ती रुद्राक्षाची जुनी माळ काढली, जी निलयनं लहानपणापासून त्यांच्या गळ्यात कायम बघितली होती. जी त्यांच्या बापाच्या गळ्यात होती, आणि त्याच्याही बापाच्या. ती माळ त्यांनी निलयच्या थरथरणाऱ्या हातात ठेवली, आणि त्याची मूठ त्यावर बंद केली, आपल्या दोन्ही राठ हातांनी.

"ही सांभाळ," ते एवढंच म्हणाले. "आन जवा तुझी येळ येईल, तवा ती पुढं दे. घाटेच्या घरात हे असंच चालत आलंय, आन असंच चालत ऱ्हाईल."

निलयनं ती माळ घट्ट धरली, आणि तिचा तो उबदारपणा, वडिलांच्या अंगाचा तो शेवटचा उबदारपणा, त्याच्या मुठीत खोलवर जाणवला. आणि त्याला कळलं की हा त्याच्या वडिलांचा जिवंतपणीचा शेवटचा स्पर्श आहे, या माळेतून त्याच्यापर्यंत कायमचा पोचणारा.

प्रकाश वळले, आणि गाभाऱ्याच्या मागच्या त्या छोट्या, अंधाऱ्या दाराकडं चालू लागले.

ते उंबरठ्याबाहेर येताच, बाहेर उभ्या असलेल्या त्या बदललेल्या माणसांच्या घोळक्यात एक सूक्ष्म हालचाल झाली. रघू, विठ्ठल, नामा, त्या सगळ्यांनी आपली पावलं यांत्रिकपणे मागं घेतली. त्यांनी प्रकाशसाठी एक मूक वाट मोकळी करून दिली. ते कुणीही त्यांना साधा स्पर्शही करत नव्हते. ते फक्त माना झुकवून उभे राहिले, एका शेवटच्या बळीला अतिशय आदराने वाट देत असल्यासारखे. आणि हे दृश्य इतकं भयंकर होतं की निलयच्या नसांतलं रक्त गोठलं. कारण त्या रिकाम्या माणसांना, ज्यांना स्वतःचं नावही आठवत नव्हतं, त्यांना हे मात्र अचूक कळत होतं, की समोरून जो माणूस चाललाय, तो त्यांच्यासाठीच चाललाय.

आणि त्या घोळक्याच्या अगदी मागं, अंधारात, एका कोपऱ्यात, गजराबाई उभी होती. ती बदललेली नव्हती. तिचे डोळे स्वच्छ होते, आणि ते प्रकाशवर खिळले होते. आणि जेव्हा प्रकाश तिच्यासमोरून गेले, तेव्हा तिनं हळूच आपले दोन्ही सुरकुतलेले हात जोडले, आणि फारच आदराने मान झुकवली. वेडी म्हणून जन्मभर हाकललेली ती म्हातारी, जिनं आयुष्यभर हे संकट येणार म्हणून ओरडून सांगितलं आणि कुणी ऐकलं नाही, ती आता त्या माणसाला अंतिम निरोप देत होती जो तिचं सगळं आयुष्य खरं करत होता. तिच्या ओठांतून ओवीची तीच एक ओळ बाहेर पडली, हळू, आणि मग ती कायमची थांबली. कारण आता कोणत्याही शब्दांची गरज उरली नव्हती.

निलय एखाद्या प्रेतासारखा वडिलांच्या पाठोपाठ गेला, पण त्याच्यात आता त्यांना थांबवायची कोणतीही ताकद उरली नव्हती. देवळामागच्या त्या उघड्या, अंधाऱ्या पायऱ्यांजवळ प्रकाश थांबले. त्यांनी खाली, त्या काळ्या बारवेकडं बघितलं.

त्या खोलीतला तो गोडसर, कुबट वास आता इतका उग्र आणि गुदमरवणारा झाला होता की तिथं श्वास घेणंही कठीण होत होतं. निलय पायऱ्यांच्या अगदी वर, थंडीने थरथरत उभा होता. वडिलांची ती रुद्राक्षमाळ छातीशी घट्ट धरून. त्याच्या हातातली प्रखर टॉर्च अचानक खाली निसटली. ती अरुंद पायऱ्यांवरून घरंगळत थेट खाली पाण्याच्या काठावर गेली,

आणि तिथं जाऊन थांबली. आणि तिचा तो प्रखर उजेड आता आडवा, थेट त्या काळ्या पाण्याच्या पृष्ठभागावर पडला, तो अथांग पृष्ठभाग एखाद्या मंचासारखा उजळत.

प्रकाश सावकाश त्या अरुंद पायऱ्या उतरून खाली गेले. एकेक पायरी. न घाबरता, न थांबता. अशा माणसासारखे जो ही वाट आधीच मनात कितीतरी वेळा चालून आलाय. ते त्या काळ्या पाण्याच्या काठावर जाऊन उभे राहिले. पाणी स्थिर होतं, खूप नितळ, एका अथांग काळ्या आरशासारखं. आणि प्रकाश गुरुजींनी, आयुष्यात पहिल्यांदा, त्या आरशात बघितलं.

निलयला वरून ते दृश्य नीट दिसलं नाही. पण त्याला वडिलांच्या पाठमोऱ्या आकृतीत एक क्षणिक आणि अंगावर येणारी ताठरता जाणवली. जणू खाली त्यांना काहीतरी असं दिसलं होतं, ज्यानं जगातल्या कुठल्याही माणसाचं मन फुटावं. आणि त्या टॉर्चच्या आडव्या उजेडात, त्या स्थिर पाण्याच्या पृष्ठभागावर, वडिलांचं स्पष्ट प्रतिबिंब उमटलं. पण ते प्रतिबिंब हसत होतं. रुंद, ओढलेलं, अमानवीय हसू. आणि खरे प्रकाश अजिबात हसत नव्हते. ते तिथं काय होतं, कोण त्या प्रतिबिंबातून त्यांच्याकडं बघत होतं, हे निलयला दिसलं नाही, आणि त्याला ते कधीच बघायचंही नव्हतं, कारण त्या न दिसणाऱ्या गोष्टीची नुसती जाणीवही त्याच्या मेंदूला असह्य होती.

पण प्रकाश हसले नाहीत. त्यांचे डोळे रिकामे झाले नाहीत. ते एकटे असे होते जे त्या भयंकर पाण्यात थेट बघत होते आणि तरी स्वतःच्या पूर्ण शुद्धीवर होते. कारण ते तिथं 'पाहुणे' म्हणून गेले नव्हते, कुतूहलानं डोकावायला गेले नव्हते. ते स्वतःला 'द्यायला' गेले होते. आणि जे स्वतःहून दिलं जातं, त्यावर त्या आदिम गोष्टीची पकड चालत नव्हती.

त्यांनी आपले दोन्ही राठ हात जोडले. आणि ओवीची ती शेवटची ओळ, अत्यंत खणखणीत आणि पोलादी आवाजात, त्या दगडी खोलीत घुमवली:

"बाप वाहे निवाळी । रगत मागे माती ।"

आणि त्यांनी त्या काळ्या पाण्यात आपलं पहिलं पाऊल टाकलं.

पाणी उडालं नाही. 'छपक्क' असा कोणताही आवाज झाला नाही. ते पाणी अस्वाभाविकपणे शांत राहिलं, आणि प्रकाश त्यात उतरत गेले. हळू, जणू ते पाणी नव्हे तर ते खाली एका पायरीवरून दुसऱ्या पायरीवर उतरत असावेत. आणि ते पाणी विचित्र जड वाटत होतं, आणि बर्फासारखं थंड. आणि जिथं त्यांचं अंग त्या पाण्याला भिडत होतं, तिथं ते पाणी त्यांना घट्ट धरत होतं, आत ओढत होतं. खाली. पण अशा भयानक संयमानं की त्यात कोणतीही घाई नव्हती, हिंसा नव्हती... फक्त एक न थांबणारी, अटळ ओढ होती.

गुडघ्यांपर्यंत. मग कंबरेपर्यंत. आणि प्रकाशची कोणतीच धडपड नव्हती. बुडणारा कोणताही माणूस जीवाच्या आकांतानं हातपाय मारतो, ओरडतो, वाचवा म्हणून धडपडतो. प्रकाश गुरुजी तसं काहीच करत नव्हते. ते अतिशय शांतपणे, मूकपणे, हात जोडून, खाली खाली जात होते. डोळे मिटलेले, त्यांचे ओठ काहीतरी पुटपुटत हलत होते. कदाचित तीच ओवी, कदाचित देवीचं नाव, कदाचित निलयच्या आईचं. निलयला ते काहीच ऐकू आलं नाही.

छातीपर्यंत. आणि मग अचानक निलयच्या लक्षात आलं की तो नुसता बघत उभा आहे. मेंदू गोठलेला. आणि त्याच्या बापाचं अंग त्या काळ्या पाण्यात कायमचं विरत चाललंय. आणि त्याचं शरीर एकदम परत जागं झालं.

"बाऽऽबाऽऽ!" निलयच्या घशातून एक आवाज फुटला, जो माणसाचा उरला नव्हता. तो एका जखमी जनावरासारखा अमानुषपणे ओरडला आणि पायऱ्यांवरून खाली धावला. दोन-दोन पायऱ्या ओलांडत, पडत, सावरत.

पण तो काठापर्यंत पोचायच्या आतच, प्रकाशचं डोकं पाण्याखाली गेलं. आणि शेवटचं जे निलयला दिसलं, ते फक्त त्यांचा चेहरा होता. पाण्याखाली उतरताना, अजून शांत, अजून हात जोडलेला, डोळे घट्ट मिटलेले. एका अशा माणसाचा चेहरा ज्यानं आयुष्यभर एक जड ओझं वाहिलं होतं, अर्थ न कळता.

आणि शेवटी, अर्थ कळल्यावरही, ते ओझं कोणतीही तक्रार न करता खाली ठेवलं होतं. कोणतीही भीती नाही, पश्चात्ताप नाही. फक्त एक अथांग आणि शांत सुटका, अशा माणसाची जो शेवटी स्वतःच्या घरी चाललाय.

आणि मग ते काळं पाणी त्यांच्यावर कायमचं मिटलं. आणि पृष्ठभाग परत आरशासारखा स्थिर झाला. आणि क्षणभर, फक्त एका श्वासभर, त्या स्थिर काळ्या पाण्यात निलयला स्वतःचाच चेहरा दिसला, वरून खाली बघणारा. आणि त्या चेहऱ्यामागं वडिलांचा चेहरा नव्हता, कुणाचाच नव्हता... तिथं फक्त अथांग काळं पाणी होतं.

आणि मग, त्या पाण्याच्या खोल आतून, अथांग तळावरून एक आवाज आला. तो स्फोट नव्हता, गडगडाट नव्हता. ती एक खोल, थेट हाडांत घुसणारी थरथर होती. जसं काही फार खोल कुठंतरी काहीतरी अवाढव्य असं हललं असावं. आणि त्या स्थिर पाण्याच्या पृष्ठभागावर एक तडा गेला, एखाद्या आरशाला तडा जावा तसा. आणि मग आणखी एक, आणि पाण्याची ती अमानवीय नितळता तडकायला लागली, शंभरावर तुकड्यांत विरायला लागली.

निलय काठाजवळ पोचला होता, हात पुढं करून, वडिलांना पाण्याबाहेर ओढून काढायला. पण त्याचा हात पाण्याला भिडायच्या आतच, ती भयानक थरथर एका शॉकवेव्हच्या

लाटेसारखी वर आली. हवेतून. आणि तिनं निलयला प्रचंड ताकदीने मागं ढकललं, जोरात. आणि तो मागच्या ओल्या दगडी भिंतीवर जाऊन आदळला. त्याचं डोकं भिंतीवर जोरात आपटलं, आणि क्षणभर त्याच्या डोळ्यांसमोर मिट्ट अंधारी आली. तो खाली घसरला, आणि त्या धक्क्यानं त्याला काही क्षण हलताही येईना.

आणि जेव्हा त्याची नजर परत साफ झाली, तेव्हा सगळं संपलं होतं. पाणी शांत झालं होतं. पण आता तो 'आरसा' उरला नव्हता. ती अमानवी नितळता कायमची गेली होती. आता ते फक्त एक काळं, गढूळ, साधं पाणी होतं, कुठल्याही जुन्या आणि घाणेरड्या विहिरीतल्यासारखं. त्यात आता कोणतंच प्रतिबिंब पडत नव्हतं. त्यात आता खालून 'काहीच' बघत नव्हतं. आणि त्याच्या वडिलांचा कुठलाही मागमूस तिथं उरला नव्हता. ना शरीर, ना आवाज, ना पाण्याचे तरंग. ते पाणी त्यांना पूर्ण गिळून, परत साधं होऊन बसलं होतं. जणू काही तिथं कधी घडलंच नव्हतं.

नेमकं त्याच क्षणी, देवळाबाहेर, त्या बदललेल्या माणसांच्या घोळक्यातून एकदम आवाज यायला लागले.

रघू, जो इतके दिवस पुतळ्यासारखा उभा होता, तो अचानक गुडघ्यांत मोडून खाली बसला, आणि मग बेशुद्ध होऊन जमिनीवर कोसळला. त्याच्या पाठोपाठ विठ्ठल, नामा, सरपंचाचा

भाऊ, सगळे एकेक करून जमिनीवर धबकन पडले. त्यांच्या डोळ्यांतली ती ओली, अनैसर्गिक चमक कायमची विझली होती. ते जिवंत होते, श्वास घेत होते. पण जेव्हा त्यांचे डोळे उघडतील, तेव्हा ते परत 'पूर्ण माणूस' होणार नव्हते, हे निलयला त्यांच्या चेहऱ्याकडं बघूनच जाणवलं. त्यांनी खाली त्या पाण्यात जे पाहिलं होतं, ज्या अथांगात ते डोकावले होते, त्याचा एक कायमचा, भयंकर ओरखडा त्यांच्या आत उमटला होता. ते चालतील, बोलतील, जेवतील, पोरांना जवळ घेतील, पण त्यांच्या नजरेच्या तळाशी आता एक शून्यता कायमची राहणार होती. अशी शून्यता जी फक्त त्यांनाच दिसेल, आणि जी ते कुणालाच सांगू शकणार नाहीत, कारण त्या शून्येतेला शब्दच नव्हते. ते वाचले होते, पण फुकट नाही.

दूर, संस्थानच्या बंद खोलीत, प्रथमेश जमिनीवर कोसळला होता. आणि त्याचा श्वास आता सुरू होता, संथ. पण त्याचे डोळे उघडे होते, थेट छताकडं रोखलेले, आणि त्यात काहीच उरलं नव्हतं. तो जिवंत होता, पण त्याचा एक भाग अजूनही खाली, त्या अंधाऱ्या पाण्यात, कुठंतरी कायमचा हरवलेला होता. आणि तो आता कधीच पूर्णतः परत येणार नव्हता.

बळी स्वीकारला गेला होता. मातीला तिचं रक्त मिळालं होतं. आणि जे काठापर्यंत आलेलं होतं, ते परत आपल्या तळाशी, त्या न संपणाऱ्या झोपेत उतरलं होतं. तात्पुरतं. पुढच्या वेळेपर्यंत.

निलय त्या काळोख्या, कोंदट खोलीत, त्या गढूळ पाण्याच्या काठाजवळ, ओल्या दगडी जमिनीवर एकटाच बसून होता. भिंतीवर आपटल्यानं त्याच्या डोक्यामागं एक असह्य कळ मारत होती, आणि त्याचे दोन्ही हात त्या ओल्या फरशीच्या चिखलानं माखले होते. एका मुठीत अजूनही वडिलांची ती रुद्राक्षमाळ घट्ट धरलेली होती. इतकी घट्ट की तिचे मणी त्याच्या तळहातात खोल रुतले होते. डोळ्यांतले अश्रू केव्हाच आटले होते, आणि त्या जागी एक जड, बर्फासारखा थंड रिकामेपणा उरला होता.

बराच वेळ तो तसाच शून्यात बसून राहिला. मग, फारच हळू, त्यानं ती रुद्राक्षमाळ उघडली. बघितली. वडिलांच्या घामानं गुळगुळीत झालेले ते जुने मणी. आणि मग, कुठलाही विचार न करता, जणू त्याचे हात त्याच्या मनाच्या आधी हे शिकले असावेत, त्यानं ती माळ आपल्या स्वतःच्या गळ्यात घातली. ती त्याच्या छातीवर स्थिरावली. वडिलांच्या अंगाचा तो उरलेला उबदारपणा घेऊन. आणि त्या क्षणी, कुणीही न बघता, कुठलाही विधी न होता, ती अथांग राखणदारी एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडं हस्तांतरित झाली.

त्याला आता कळत होतं की तो आता नुसता एक इंजिनिअर उरला नव्हता. आणि तो आता या जगात एकटा होता. या सगळ्याचा एकमेव जिवंत साक्षीदार. उद्या, सूर्य उगवल्यावर, त्याला त्याच्या स्वतःच्या तर्काने ती अवाढव्य काळी शिळा परत

त्याच जागी, त्याच कोनात, त्याच मापात अचूक बसवायची होती. तो नाद, तो अनुनाद परत सुरू करायचा होता. जो त्याच्या वडिलांनी आणि त्यांच्या वडिलांनी पिढ्यानपिढ्या सुरू ठेवला होता, अर्थ न कळता. फरक एवढाच की आता निलयला त्याचा खरा अर्थ कळत होता, आणि तो अर्थ कळणं हीच त्याची खरी शिक्षा होती. जे त्याच्या वडिलांना भाबड्या श्रद्धेनं करता आलं, ते त्याला आता त्याच्या ज्ञानानं करावं लागणार होतं. आणि ज्ञान हे श्रद्धेपेक्षा खूप जड ओझं आहे, कारण श्रद्धेला निदान आशा असते... आणि ज्ञानाला फक्त नग्न सत्य!

त्यानं शेवटचं एकदा त्या गढूळ पाण्याकडं बघितलं. त्यात आता कोणतंच प्रतिबिंब पडत नव्हतं. त्याचे वडील त्यात कुठंच नव्हते. फक्त काळं, साधं पाणी, आणि त्याखाली, फार खोल, माती. आणि त्या मातीत आता त्याचे वडील होते, त्या न संपणाऱ्या राखणीचाच एक भाग होऊन.

तो या शापाचा नवा राखणदार झाला होता. वडिलांसारखा. आजोबांसारखा. त्र्यंबकसारखा. आणि एक दिवस, त्याच्याही रक्तातलं कुणीतरी, दूर कुठंतरी शहरात, हे सगळं टाळता येईल असं समजून आधुनिक आयुष्य जगत असेल. आणि एक दिवस त्यालाही इथं परत यावंच लागेल, याच पाण्याकडं, याच किंमतीकडं. ती माळ घायला आणि पुढं द्यायला.

बाहेर पाऊस पूर्ण थांबला होता. आणि देवळाच्या कोपऱ्यात कुठंतरी, गजराबाईची ती वेडी ओवी, जी शेकडो वर्षं कधीच थांबली नव्हती, ती आता कायमची शांत झाली होती. तिचं काम आता संपलं होतं. आता राखणारा जागा होता, त्याला अर्थ कळलेला होता. आणि तोच अर्थ घेऊन त्याला उरलेलं आयुष्य या अंधाऱ्या खोलीच्या राखणदारीत एकट्यानं काढायचं होतं.

* * *

प्रकरण दहा : राखण

पुन्हा जळ ढळे । पुन्हा राखण चाले । आई हांसे तळीं । कल्प कल्प न सुटे ॥

बरोबर तीन दिवसांनी रस्ता खुला झाला.

प्रशासनानं बाहेरून युद्धपातळीवर काम केलं. वरच्या घाटातली ती महाकाय दरड मोठ्या जेसीबी यंत्रांनी फोडून बाजूला सारली गेली, दुथडी भरून वाहणाऱ्या नदीवर रातोरात एक तात्पुरता लोखंडी आणि लाकडी पूल टाकला गेला, आणि मोबाईल कंपनीनं पडलेला टॉवर परत उभा करून दुरुस्त केला. मोबाईलची रेंज परत आली, खिशातले बंद पडलेले फोन अचानक मेसेजच्या आवाजांनी वाजू लागले, आणि बाहेरचं ते गजबजलेलं, आधुनिक जग परत एकदा निवाळी गावाशी जोडलं गेलं. हे सगळं इतक्या वेगाने आणि यंत्रवत घडलं, जणू ते तीन अंगावर येणारे, मरणप्राय आणि गुदमरवणारे दिवस इथं कधी घडलेच नव्हते. जसं काही निसर्गाला फक्त एक छोटीशी उचकी आली होती, आणि आता सगळं परत 'नॉर्मल' झालं होतं.

आणि देवीची यात्रा भरली, ठरलेल्या तारखेपेक्षा काही दिवस उशिरा का होईना.

निलय हे सगळं एका विचित्र, दूरच्या आणि कोरड्या नजरेनं बघत होता. भक्त आणि भाविक आले, हजारोंच्या संख्येनं. रंगीबेरंगी एसटी बसनं, ट्रॅक्टरनं, आणि पायी चालत. त्यांनी त्या

नव्या डांबरी रस्त्यावरून चालत येऊन खूप श्रद्धेने देवीचं दर्शन घेतलं. गावात नव्यानं सुरू असलेलं भक्तनिवासाचं भव्य बांधकाम बघून लोक खूश झाले, त्यांनी प्रसाद घेतला, हसत-खेळत सेल्फी काढले. देवळाच्या आवारात भोंगे वाजत होते, प्रसादाचा आणि उदबत्तीचा गोडसर वास हवेत भरून राहिला होता. सरपंच बाळासाहेब मोठ्या अभिमानानं आमदारांसोबत फिरत होता, नव्या विकासाचं आणि रस्त्यांचं कौतुक करत होता. आमदारांनी मोठ्या थाटात फिती कापल्या, आणि टाळ्यांचा कडकडाट झाला. गाव संपूर्णपणे आनंदात आणि उत्साहात बुडालं होतं. यात्रा शंभर टक्के यशस्वी झाली होती. पुढच्या वर्षी नक्कीच दुप्पट गर्दी येणार होती.

आणि त्या हजारो लोकांपैकी एकालाही, साध्या एका जीवालाही हे कळलं नाही की बरोबर तीन दिवसांपूर्वी हे अख्खं गजबजलेलं गाव विनाशाच्या एका भयंकर आणि अथांग काठावर उभं होतं. आणि एका म्हाताऱ्या, भस्मानं माखलेल्या माणसानं त्या काळ्या, अथांग मृत्यूच्या पाण्यात उतरून त्यांचा जीव वाचवला होता. त्यांना तो पूल का वाहिला होता, रस्ता का बंद झाला होता, फोन का मेले होते, हे कधीच कळलं नाही, आणि त्यांना ते कधीच कळायचंही नव्हतं. 'निसर्गाचा प्रकोप होता', एवढंच ते भाबडे लोक सहजपणे म्हणाले, आणि तो पाऊस थांबला म्हणून 'देवीची मोठी कृपा' म्हणून त्यांनी तो विषय तिथंच संपवून टाकला. जे लोक वाचले होते, त्यांना आपण

नक्की कशापासून वाचलो आहोत हेच माहीत नव्हतं. आणि हीच त्या गोष्टीची अंगावर येणारी किंमत होती. राखणदार जगाला वाचवतो, आणि ज्यांना वाचवलं ते कधी साधं वळून आभारही मानत नाहीत, कारण त्यांच्या अंधळ्या आणि सुखी डोळ्यांना तो अमानवीय धोका कधीच दिसत नाही.

रघू परत घरी गेला.

तो शारीरिकदृष्ट्या चालत होता, बोलत होता, आणि मजुरीच्या कामावर परत रुजूही झाला होता. पण तो आता जिवंत माणूस उरला नव्हता; तो फक्त एक चालता-बोलता रिकामा सांगाडा होता. तो एखाद्या यंत्रासारखा काम करायचा. तो हाताने हातोडा चालवायचा, जड ओझं उचलायचा, पण त्याच्या डोळ्यांत तो पूर्वीचा सळसळता जीव नव्हता. तिथं फक्त एक अथांग आणि अंधारी शून्यता भरून राहिली होती. तो बोलत होता, पण त्याचा आवाज एखाद्या रिकाम्या आणि सुकलेल्या विहिरीतून आल्यासारखा यांत्रिक आणि भावनाविरहित वाटायचा. त्याचं ते मोकळं, गावरान हसू कायमचं मरण पावलं होतं. त्याच्या डोळ्यांच्या तळाशी आता अशी एक भयाण शांतता होती जी आधी कधीच नव्हती... एक अत्यंत दूरचा, रिकामा भाव. जणू त्याचं शरीर इथं वर उन्हात काम करत होतं, पण त्याचा एक भाग अजूनही कुठंतरी त्या अमानवीय काळ्या अंधारात कायमचा अडकून राहिला होता.

त्याची बायको खूश होती की आपला नवरा परत आला, त्याची पोरं परत त्याच्या मागंमागं फिरायला लागली होती. पण कधीकधी, संध्याकाळच्या उतरत्या उजेडात, रघू एकटाच देवळामागच्या त्या उघड्या दिशेनं एकटक बघत बसायचा. तासन् तास. पापणीही न मिचकावता. काहीच न बोलता. आणि मग अचानक भानावर येऊन परत मुकाट्यानं आपल्या कामाला लागायचा. त्याला खाली पाण्यात नक्की काय आठवत होतं, किंवा असं काय होतं जे त्याला विसरता येत नव्हतं, हे त्यानं कधीच कुणाला सांगितलं नाही. आणि कदाचित ते भयानक सत्य सांगायला मानवी भाषेत शब्दच तयार झाले नव्हते.

आणि प्रथमेश.

प्रथमेशला त्याचे घरचे न्यायला आले, थेट नागपूरहून. तो स्वतःच्या पायावर चालू शकत होता, घरच्यांना ओळखतही होता, पण तो आता बोलत फार कमी झाला होता. डॉक्टरांनी त्याच्या घरच्यांना सांगितलं की त्याला काहीतरी मोठा मानसिक ट्रॉमा बसलाय, आणि यातून सावरायला खूप वेळ लागेल. निलय त्याला शेवटचा निरोप द्यायला त्याच्या गाडीपर्यंत गेला. प्रथमेशनं संथपणे त्याच्याकडं बघितलं, आणि एक क्षण, फक्त एक क्षण, त्याच्या त्या रिकाम्या डोळ्यांत ओळखीची एक जुनी, जिवंत चमक आली.

"निलू," तो हळू आणि कातर आवाजात म्हणाला. "ते पाणी... ते अजून तिथंच आहे ना?"

निलयला काय बोलावं हेच कळलं नाही. तो फक्त मूकपणे उभा राहिला.

"मला अजून ऐकू येतं ते," प्रथमेश म्हणाला, आणि त्याचा आवाज पालापाचोळ्यासारखा कापला. "रात्री. ते मला बोलावतं. म्हणतं, परत ये. इथं शांत आहे." त्यानं निलयचा हात धरला, अतिशय घट्ट, आणि त्याच्या डोळ्यांत आता भीती होती... तीच आदिम भीती. "मला इथून घेऊन जा यार. लांब. जिथून ते ऐकू येणार नाही." आणि मग ती ओळखीची चमक अचानक विझली. तो परत मागं सरकला, गाडीच्या सीटवर जाऊन बसला, त्या रिकाम्या आणि थंड शांततेत. गाडी धूळ उडवत निघून गेली. निलय तिथंच उभा राहिला, आणि त्याला खोलवर पक्कं माहीत होतं की प्रथमेश कितीही लांब गेला, तो जगाच्या पाठीवर कुठंही लपून बसला, तरी त्याला तो आवाज ऐकू येतच राहणार होता, आयुष्यभर. कारण ज्या माणसानं एकदा त्या अथांग पाण्यात डोकावलं, त्याला ते पाणी कधीच पूर्णपणे सोडत नव्हतं. तो भौतिकदृष्ट्या वाचला होता. पण तो परत आला नव्हता, कधीच नाही.

....

निलय गेला नाही.

तो जाऊ शकला असता. यात्रा संपली होती, त्याचा तो सरकारी प्रोजेक्ट पूर्ण झाला होता, त्याचा तांत्रिक अहवाल तयार होता. त्याची शहरातली नोकरी त्याची वाट बघत होती, त्याचं आधुनिक, स्वच्छ, तर्कशुद्ध आयुष्य त्याला खुणावत होतं. तो आपल्या गाडीत बसून निघून जाऊ शकला असता, आणि हे सगळं वेडसरपण नेहमीसारखं मागं सोडू शकला असता, अगदी जसं तो तेरा वर्षांपूर्वी सोडून गेला होता.

पण तो गेला नाही. कारण आता त्याला सत्य माहीत होतं. आणि सत्यापासून पळून जाता येत नाही, हे त्याला त्याच्या बापाने शिकवलं होतं.

यात्रेनंतर, गर्दी ओसरल्यावर, जेव्हा गाव परत आपल्या रोजच्या सुस्तीत आणि अज्ञानात बुडालं, तेव्हा निलयनं ते काम हाती घेतलं जे त्याला कोणत्याही परिस्थितीत टाळता येत नव्हतं. ती अवाढव्य काळी शिळा हलवणं हे एकट्या माणसाचं काम नव्हतं. त्यानं गावातून चार-पाच धडधाकट मजूर बोलावले, मोठ्या लोखंडी कप्पी, जाड साखळ्या आणि लीव्हर आणले. आणि त्याच्या इंजिनिअरिंगच्या अचूक मापांनी, विज्ञानाच्या भौतिक नियमांचा वापर करून त्यानं ती टनभर वजनाची काळी शिळा परत तिच्या जागी अचूक बसवून घेतली. मजुरांना वाटलं की साहेब नुसती देवळाची डागडुजी करतायत. पण निलय स्वतः त्या शिळेचा 'अँगल' तपासत होता. तो रेसोनन्स साठी आवश्यक

अचूक कोन, जो शेकडो वर्षांपूर्वी कुणीतरी अतिशय बारकाईने घडवला होता. त्यानं देवीच्या मुर्तीजवळील बारवेच्या छतातला तो झरोका साफ केला, जेणेकरून वरून पडणारं पाणी थेट खाली शिळेवर, बरोबर त्या खोबणींवरच पडेल. त्यानं ते सगळं परत सुरू केलं, जे त्यानं स्वतःच्या अहंकारात काही दिवसांपूर्वी मोडलं होतं. ते प्राचीन ध्वनिक यंत्र परत चालू झालं. शिळेवरच्या त्या अथांग दाबामुळे खालचं पाणी परत हलायला लागलं, आणि त्याची ती अमानवी, आरशासारखी नितळता परत जाऊ लागली, आणि तो मृत्यूचा आरसा परत धुसर आणि गढूळ होत गेला.

...

आणि मग एकच अंतिम प्रश्न उरला. रोजचा अभिषेक कोण करणार?

मुख्य पुजारी गेला होता. आणि आता घाटे घराण्यात या जगात फक्त एकच माणूस उरला होता.

पहिल्या दिवशी, पहाटे... निलय फारच शांत पावलांनी गाभाऱ्यात गेला. समोर देवीची मूर्ती अंधारात शांत उभी होती. त्यानं तांब्यात ताजं पाणी घेतलं. आणि तो त्या मूर्तीसमोर उभा राहिला. मूर्तीच्या पायाशी, हुशारीने लपवलेला तो दगडी झरोका होता. शेकडो वर्षांपूर्वीच्या त्या प्राचीन रचनाकारांनी विज्ञानाला श्रद्धेचं किती अचूक रूप दिलं होतं! गावाला वाटायचं मूर्तीला अभिषेक होतोय, पण मूर्तीवरून ओघळणारं पाणी थेट त्या

झरोक्यातून खाली काळ्या बारवेत पडणार होतं. पाणी ओतण्याआधी, त्यानं स्वतःच्या छातीवर रुळणाऱ्या त्या जुन्या रुद्राक्षमाळेला एकदा हळूच हात लावला. त्या मण्यांमधला तो उबदारपणा, त्याच्या वडिलांचा तो शेवटचा स्पर्श, त्याच्या बोटांतून थेट काळजात उतरला.

त्याला मंत्र येत नव्हते. त्याला पूजेची कोणतीही रीत येत नव्हती. आयुष्यभर त्यानं या सगळ्याला केवळ 'अंधश्रद्धा' म्हटलं होतं, आणि आता त्याला त्यातलं काहीच येत नव्हतं. पण त्याला 'यंत्र' येत होतं. त्याला आता पूर्णतः कळत होतं की हा तांब्या, हे पाणी, हा नाद, ही रोजची कृती म्हणजे नक्की काय आहे. ती भाबडी पूजा नव्हती. ती राखण होती. आणि कोणत्याही राखणीला मंत्रांची गरज नसते, तिला फक्त सातत्य लागतं.

तो रोज हे करू लागला.

रोज पहाटे, न चुकता, सूर्याच्या पहिल्या किरणाआधी. उन्हाळ्यात, पावसात, कडाक्याच्या थंडीत. जेव्हा संपूर्ण गाव गाढ झोपलेलं असायचं, तेव्हा निलय एकटा त्या अंधाऱ्या गाभाऱ्यात उभा राहून तांब्यातलं पाणी त्या झरोक्यात ओतायचा. आणि ते पाणी खाली जाऊन त्या शिळेवर आदळायचं, आणि तो नाद खालच्या त्या काळ्या पाण्यात उतरायचा. आणि त्या पाण्याखालचं जे काही अमानवीय आणि अथांग होतं, ते परत

त्याच्या न संपणाऱ्या झोपेत ढकललं जायचं. आणखी एका दिवसासाठी.

गावाला वाटायचं निलय अचानक बदलला. तो शहरी इंजिनिअर, जो कालपर्यंत सगळ्याला हसायचा, तो अचानक गावातच राहिला, पुजारी झाला, त्यानं वडिलांची जागा घेतली. लोकांना वाटलं, बाप गेल्याच्या दुःखानं त्याला मोठी उपरती झालीय, त्याची देवावर श्रद्धा बसलीय. ते त्याला आता आदरानं बघायला लागले, 'घाटे गुरुजी' म्हणायला लागले. आणि निलय ते सगळं मुकाट्यानं ऐकून घ्यायचा. कारण त्यांना खरं सांगण्यात कोणताही अर्थ नव्हता. जर त्यानं त्यांना ते खरं आणि भयानक सत्य सांगितलं असतं, तर त्यांनी त्यालाही वेडा ठरवलं असतं, जसं त्यांनी शेकडो वर्षांपूर्वी त्र्यंबकला ठरवलं होतं, जसं त्यांनी गजराबाईला ठरवलं होतं. म्हणून तो गप्प राहायचा, आणि रोज पहाटे मुकाट्याने त्याचं काम करायचा.

....

गजराबाई त्या यात्रेनंतर काही दिवसांनी गेली. शांतपणे, झोपेत. जणू तिचं काम संपलं होतं, आणि आता तिला या जगात थांबायचं कोणतंच कारण उरलं नव्हतं. गावातल्या कुणीही, एका साध्या माणसानंही तिच्या अंत्यसंस्काराला पुढं येण्याची तसदी घेतली नाही, कारण त्यांच्यासाठी ती फक्त एक वाळीत टाकलेली, 'वेडी' म्हातारी होती. पण निलयनं स्वतः पुढं होऊन,

सर्व विधी करत तिला अग्नी दिला. तो एकटाच तिच्या चितेसमोर राख होईपर्यंत उभा राहिला. कारण या जगात आता फक्त त्यालाच माहीत होतं की ती वेडी नव्हती, ती खऱ्या अर्थाने एका अथांग सत्याची राखणदार होती. ती एका अखंड साखळीतली शेवटची कडी होती... वेड्या ठरवलेल्या बायकांची साखळी, ज्यांनी शेकडो वर्षं ते भयंकर सत्य जिवंत ठेवलं, ज्याची कुणालाच पर्वा नव्हती. आणि आता ती साखळी कायमची संपली होती. कारण आता राखणदार वेगळा होता, आणि त्याला ओवीची गरज नव्हती. त्याला यंत्र कळत होतं.

....

कधीकधी निलयला वाटायचं की तो एकटा आहे, या जगात पूर्ण एकटा. या अथांग सत्याचा एकमेव जिवंत जाणता माणूस. आणि मग त्याला जाणवायचं की तो एकटा नाहीये. त्याच्या आधी त्याचे वडील होते, आणि त्यांच्या आधी त्यांचे वडील, आणि मागं, फार मागं, तो त्र्यंबक होता, जो पहिल्यांदा खाली गेला आणि ज्याचं सत्य कुणीच ऐकलं नाही. ते सगळे या एकाच अंधाऱ्या खोलीचे राखणदार होते, पिढ्यानपिढ्या, आणि निलय आता त्यांच्यातलाच एक होता. त्या अभेद्य साखळीतली पुढची कडी.

....

एका पहाटे, कितीतरी महिन्यांनंतर, निलय नेहमीसारखा गाभाऱ्यात उभा होता.

बाहेर अजून मिट्ट अंधार होता, पूर्वेला क्षितिजावर फक्त एक फिकट उजेडाची रेघ आली होती. संपूर्ण गाव गाढ झोपलेलं होतं. फक्त एखाद्या कोंबड्याची बांग, आणि दूर कुठंतरी कुत्र्याचं भुंकणं ऐकू येत होतं. निलयनं तांब्यात ताजं, थंड पाणी घेतलं. त्यानं तो देवीच्या माथ्यावर धरला. आणि खाली पाणी ओतायच्या आधी, फक्त एका क्षणासाठी, तो थांबला.

तो मागे गेला. झरोक्याजवळ. खाली त्या झरोक्यातून किंचित बघू शकत होता, खोल, थेट त्या बारवेच्या पाण्यापर्यंत. आणि आज पाणी खूप विचित्रपणे स्थिर होतं. रात्रभर कोणताही अभिषेक झाला नव्हता, म्हणून ते जरा जास्त शांत झालं होतं. आणि त्या मंद पहाटेच्या उजेडात, त्या झरोक्यातून येणाऱ्या अंधुक कवडशात, ते एका काळ्या आणि अथांग आरशासारखं चमकत होतं.

आणि त्या आरशात निलयला अचानक एक चेहरा दिसला.

तो मुळीच घाबरला नाही. तो आता कशालाच घाबरत नव्हता. त्यानं शांतपणे खाली नीट बघितलं. आणि तो चेहरा त्याच्या वडिलांचा होता. प्रकाश गुरुजींचा. शांत, थकलेला, समाधानी. तो चेहरा हसत नव्हता. तो फक्त बघत होता, वर, निलयकडं, एका बापाच्या प्रेमळ नजरेनं. आणि त्या नजरेत कोणतीही भीती नव्हती, वेदना नव्हती, तिथं फक्त एक शांत

स्वीकार होता, आणि कदाचित थोडासा अभिमान होता. जसं काही ते मुकाट्याने म्हणत होते, *तू थांबलास. तू पळाला नाहीस.*

निलयला पक्कं माहीत होतं की ते त्याचे खरे वडील नव्हते. ते फक्त पाणी होतं, प्रकाश होता, आणि त्याच्या स्वतःच्या मनानं त्यात भरलेला तो अर्थ होता. त्याचं भौतिक विज्ञान त्याला नेमकं हेच सांगत होतं. पण आयुष्यात पहिल्यांदाच, त्याचं विज्ञान आणि त्याचं मन एकमेकांशी भांडत नव्हते. दोघांनाही तो चेहरा खाली दिसत होता, आणि दोघांनाही तो तिथे हवा होता.

"बघतोय बाबा," तो अत्यंत हळू आवाजात म्हणाला, त्या अथांग पाण्याकडं बघत. "डोळे मिटले नाहीत. राखतोय."

आणि मग त्यानं स्वतःच्या हातातला तो तांब्या देवीच्या माथ्यावर कलता केला.

पाण्याचा पहिला थेंब त्या झरोक्यातून खाली पडला, त्या स्थिर काळ्या पृष्ठभागाच्या दिशेनं, त्या शांत चेहऱ्याच्या दिशेनं. तो खाली पडत गेला, संथपणे, आणि तो पृष्ठभागाला भिडायच्या अगदी शेवटच्या क्षणी, वडिलांचा चेहरा शेवटचं एकदा शांतपणे निलयकडं बघत राहिला.

आणि मग तो थेंब पडला.

पाण्यावर तरंग उठले. तो चेहरा विरला. तो आरसा हलला, धुसर झाला, आणि त्या पाण्यात आता कोणताच चेहरा उरला नाही, कोणतंच प्रतिबिंब उरलं नाही. तिथं फक्त हलणारं, जिवंत,

साधं पाणी उरलं. आणि वरून पडणारं पाणी त्या अवाढव्य शिळेवर आदळत राहिलं, आणि तो जुना नाद त्या दगडी खोलीत घुमत राहिला. खोल आणि न थांबणारा. जसा तो शेकडो वर्षं आजवर घुमत आला होता, आणि जसा तो यापुढेही असाच घुमत राहणार होता, कल्पकल्प, न सुटणारा.

बाहेर, पूर्वेला, सूर्याचं पहिलं किरण देवळाच्या उंबऱ्यावर पडलं.

(समाप्त)

कथा कथा म्हणजे असं असतं तरी काय?

कथा कथा म्हणजे असं असतं तरी काय?
खरं थोडं खाली, वर खऱ्यावरची साय!
थोडं मीठ, थोडी मिर्ची, खरं लपवत नाही.
ज्याचं जळतं त्याला कळतं, पाणी थांबत नाही.
एकीकडे कथा म्हणजे पडद्याआडची आग
दुसरीकडे कथा म्हणजे लपवलेला राग
थोडं प्रेम, थोडा द्वेष, थोडी धाय धाय धाय
कथा म्हणजे तुम्ही-आम्ही दुसरं-तिसरं काय?

ई साहित्यवर दर्जेदार कथा/कादंबऱ्या.
आनंद घ्या. आनंद द्या.

फ़्री ई बुक्स Whatsapp- 9987737237
www.esahity.com
esahity@gmail.com